|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्षमणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : २ | सोमवार दि. ०४ जानेवारी २०२१ ते रविवार दि. १० जानेवारी २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पालकमंत्री अमित देशमुखांनी फिरवली पाठ कंत्राटदार लावत आहेत शेतकऱ्यांची वाट



लातूर/राम पाटोळे

सार्वजनिक बांधकाम खात्याकडून होणारी रस्त्याची कामे म्हणजे सरकारी बाबुंसाठी एक मोठे कुरण असते. कारण रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनींचे अधिग्रहण करण्यापासून ते रस्त्याच्या कामांची कंत्राटे देवून प्रत्यक्षात रस्ते बांधण्यापर्यंत प्रचंड भ्रष्टाचार झालेला असतो आणि या भ्रष्टाचारात राजकीय नेत्यांपासून प्रशासकीय तसेच पोलीस यंत्रणेतील लोकांपर्यंत सगळ्यांनीच हात धुवून घेतलेले असतात. त्यामुळे रस्त्याची कामे तर निकृष्ट दर्जाची होतातच, पण या रस्ते बांधणीच्या कामात रस्त्या लागत जमिनी असलेल्या शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होते आणि काहीही संबंध नसताना त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येते.

लातूर जिल्ह्यात असाच प्रकार उघडकीस आला आहे. निलंगा ते शहाजानी औराद या २० किमी अंतराच्या रस्त्याच्या कामात असाच घोटाळा झाला आहे. कारण या रस्त्याचे बांधकाम करणाऱ्या शिंदे डेव्हलपर्स प्रा.ली.तर्फे विवेक भुजबळ या कंत्राटदाराने रस्त्याचे काम तर निकृष्ट दर्जाचे केलेच आहे. शिवाय या कामात रस्ते बांधकामासंबंधीचे सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले आहे आणि सर्वात धक्कादायक म्हणजे या रस्त्यालगत असलेल्या ६ गावातील शेतकाऱ्यांनाही या कंत्राटदाराने चुना लावलाय. त्यामुळे फसवणूक झालेल्या एका शेतकऱ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता.



लातूरचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी या गंभीर घोटाळ्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा लातूर सारख्या दुष्काळग्रस्त जिल्ह्यात अगोदरच निसर्गाचे बळी ठरलेल्या शेतकऱ्यांना कंत्राटदारही फसवायला लागले, तर शेतकऱ्यांवर आत्महत्येची पाळी येईल. सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण हे सुद्धा मराठवाड्यातले आहेत, असे असताना त्यांनी सुद्धा डोळे बंद केलेले आहेत का? असा सवाल इथला शेतकरी विचारात आहे. दुष्काळग्रस्त जिल्ह्यात कोणतीही विकास कामे करताना सर्वात प्रथम तिथल्या शेतकऱ्याचा विचार करायला हवा. पण मागील भाजपा सरकारने जिल्ह्यातील रस्त्याची ...पान ७ वर

## मजुरी मागितली म्हणून मालक चिडला गरीब कामगाराचा त्याने मुडदा पाडला

उल्हासनगर/रामेश्वर गवई



मयत मनोज

**प्रत्येक माणूस कोणतेही काम पोटासाठी करतो. त्यामुळे त्याला केलेल्या कामाचा मोबदला हा मिळायलाच हवा, पण काही लोकं एखाद्याकडून काम करून घेतात. मात्र त्या कामाचा मोबदला देण्याची जेंव्हा वेळ येते तेंव्हा मात्र टाळाटाळ करतात. उल्हासनगरात अशाच एका गरीब मजुराने केलेल्या कामाचे बाराशे रुपये देण्यास मालक टाळाटाळ करीत होता. मात्र त्या मजुराला पैशाची गरज असल्याने तो मालकाच्या घरी गेला आणि याचाच राग मालकाला आला आणि त्यांनी त्या मजुराला बेदम मारहाण केली. यात त्या मजुराचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

मालक आणि कामगारात मजुरीच्या बाराशे रुपयांवरून वाद झाला. हा वाद एवढा विकोपाला गेला की, दोघा मालकांनी मिळून त्या कामगाराचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना भाटिया हॉस्पिटल जवळ उल्हासनगरच्या कॅम्प नं ५ भागातील लालसाई गार्डन परिसरात घडली आहे. याप्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून दोघाही खुनी मालकांना अटक केली आहे. बंटी साबळे आणि राहुल घाडगे असे खुनाच्या गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपी मालकांचे नावे आहेत. तर मनोज हटकर असे खून झालेल्या कामगाराचे नाव आहे. मृतक मनोज हटकर हा रंगकाम काम करणारा कामगार होता. गेल्या काही दिवसांपासून आरोपी बंटी व राहुल मृतक मनोज एका ठिकाणी रंगकाम करीत होते. मात्र रंगकाम संपल्यावर मृतक मनोजने केलेल्या रंगकामाच्या मजुरी चे बाराशे रुपये आरोपी बंटी आणि राहुल यांच्या कडे होते. खबळजनक बाब म्हणजे मृत मनोजची आर्थिक तंगी असल्याने वारंवार पैशांची मागणी तो दोघां मालकाकडे करत होता , मात्र आरोपी बंटी ...पान २ वर

## थकीत पगाराचा वाद प्राणावर बेतला नोकराने मालकाचा जीवच घेतला

जांबोटी/क्राईम रिपोर्टर

नोकर आणि मालक यांच्यात कधी ना कधी कामाच्या मोबादल्यावरून वाद होताच असतो. त्यातच लॉकडाऊनच्या काळात बऱ्याच लोकांच्या धंद्यावर परिणाम झाला होता. जांबोटी येथे राहणाऱ्या विजय अवल्लक्की याच्या फोटोग्राफीच्या धंद्यावरही लॉकडाऊनचा परिणाम झाला होता. त्यामुळे एका नोकराचा दोन महिन्याचा पगार थकला होता. अगोदरच पगारावरून त्या दोघांमध्ये वाद होता. त्यात दोन महिन्याचा पगार थकतच त्या नोकराने आपल्या मित्रांच्या मदतीने सरळ मालकाची हत्या केली. या घटनेमुळे जांबोटीमध्ये खळबळ माजली असून पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली.



विजय अवल्लक्की याचे जांबोटी बस्थानकजवळ फोटोचे दुकान आहे. ते जांबोटी परिसरातील एक उमदे तरूण व्यवसायीक फोटोग्राफर म्हणून परिचित आहेत. आपल्या पत्नी, मुलीसह जांबोटी येथेच ...पान २ वर

## बाईलवेडा विवाहितेच्या मागे लागून फसला पण तिने रचता सापळा जीव गमावून बसला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

आजकालच्या तरुण मुलांना मुलींपेक्षा आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या विवाहित महिलांचे अधिक आकर्षण असते. अशावेळी ज्या चंचल असतात त्या तरुणांच्या जाळ्यात अडकतात किंवा त्याला आपल्या जाळ्यात ओढतात. पण ज्या घरंदाज असतात त्या मात्र अशा बाईलवेड्या तरुणांसाठी अक्षरशः काळ ठरतात. जळगाव जिल्ह्याच्या रावेर तालुक्यातील एका सुंदर विवाहितेच्या मागे गावातलाच एक तरुण लागला होता. त्याने तिचे आंघोळी करतानाचे फोटो काढून तिला ब्लॅकमेल करायला सुरवात केली. मात्र हि गोष्ट तिने तिच्या पतीला सांगताच पतीने आपल्या दोन मेव्हण्यांसह सापळा रचला. त्यासाठी पत्नीला त्याच्याशी प्रेमाचे नाटक करायला लावून पत्नीच्या माहेरी बोलावून घेतले आणि तिथे त्याचा गेम केला व त्याचा मृतदेह रेल्वे रुळत टाकून अपघात झाल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्यांचे हे कारस्थान हाणून पडले आणि सर्व आरोपींना अटक केली.





मयत दिपक

विस वर्षाची विवाहीत कंगना (काल्पनिक नाव) ग्रामीण भागात तिच्या पतीसह रहात होती. तारुण्याच्या लाटेवर स्वार असलेली कंगना एका मुलाची आई देखील होती. जळगाव जिल्ह्याच्या टोकावर असलेल्या रावेर तालुक्यात ती आपल्या पतीसह रहात होती. विवाहीत कंगनाचे रुप आणि वागणे एखाद्या कुमारीकेसमान होते. कंगना रहात असलेल्या गावात दिपक भगवान सपकाळे हा चोवीस वर्षाचा तरुण देखील रहात होता. कंगनाच्या रुपाने घायाळ झालेला दिपक तिचा दिवाना झाला होता. त्याची चोरटी नजर नेहमीच कंगनाच्या ...पान ६ वर

## वासनेच्या मोहापायी मातृत्व कलंकित झाले प्रियकरासाठी आईने मुलालाच ठार केले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



**वासनेच्या आहारी गेलेला पुरुष असो कि स्त्री असो त्यांना समाजाची किंवा नात्या गोत्याची अजिबात परवा नसते. अशावेळी त्यांच्या अनैतिक संबंधाच्या आड येणाऱ्या रक्ताच्या नात्याचाही ते विचार करीत नाहीत. कारण शरीरसुखाच्या आनंदाच्या डोहात ते आकंठ बुडून गेलेले असतात. त्यामुळे आपल्या या सुखाच्या आड कुणीही येऊ नये अशी त्यांची इच्छा असते, अशावेळी त्यांच्या अनैतिक संबंधाच्या आड येणाऱ्याचा जीव घ्यायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. सोलापूर जिल्ह्यातील परितेवाडी येथे एक जन्मदात्या आईनेच अनैतिक संबंधाच्या आड येणाऱ्या आपल्या तरुण मुलाचा प्रियकराच्या मदतीने खून करून मायलेकाच्या पवित्र नात्याला डांबर फासले. या प्रकरणी आरोपी आई आणि तिच्या प्रियकराला पोलिसांनी अटक केली आहे.**

अनैतिक संबंधात आड येणाऱ्या मुलाचा आईनेच प्रियकराच्या मदतीने खून केल्याची घटना माढा तालुक्यातील ...पान २ वर

## अनैतिक संबंधाचा भयानक शेवट झाला विवाहित प्रेयसीचा प्रियकराने खून केला



मयत सुधाराणी





आरोपी इराण्णा

बेलगाव/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंध हे प्रेमातून नव्हे तर वासने पोटी निर्माण झालेले असतात. त्यामुळे अशा संबंधाना कोणतेही भविष्य नसते. जोवर परस्परांविषयी आकर्षण असते तोवर हे संबंध टिकतात. पण वासनेपोटी गळाला लागलेली बाई जेंव्हा गळ्यात पडण्याचा प्रयत्न करते, तेंव्हा मात्र तिला तिचा प्रियकर कायमचा मार्गातून हटवतो. मुगबसव येथे राहणारी पण पतीपासून विभक्त राहणाऱ्या एका महिलेचे इराण्णा बाबु जगजंपी नावाच्या इसमाशी सुत जुळले आणि दोघांची रासलीला सुरु झाली. मात्र इराण्णाने आपल्याशी लग्न करावे अशी त्या महिलेची इच्छा होती. पण त्याला मात्र हे लोढणे गळ्यात बांधून घ्यायचे नव्हते. त्याला फक्त तिच्याशी मौजमज करायची होती. पण ती गळ्यात पडण्याचा प्रयत्न करीत आहे हे लक्षात येताच त्याने तिच्या कामाच्या ठिकाणी जाऊन तिची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

२७ वर्षीय सुधाराणी ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. ती मुळची बैलहोंगल तालुक्यातील मुगबसव येथील होती. गेल्या सात वर्षपूर्वी कितूर येथील एका तरूणाशी तिचा विवाह झाला आणि त्या दोघांना एक मूल ही झाले. परंतु एका अपघाती घटनेत तिच्या मुलाचा मृत्यु झाल्याने त्या दोघा नवरा बायकोत त्या कारणाने भांडण होऊ लागले होते. हे भांडण विकोपाला गेल्याने तिने नवऱ्याच्या विरोधात कित्तूर येथील कोर्टात दावा दाखल केला. तेव्हापासून ती त्याच्यापासून विभक्त राहत होती. ती नवऱ्यापासून ...पान २ वर

## विवाहितेचा सहवास त्याला चांगलाच भोवला अल्पवयीन मुलगा भलत्याच संकटात गावला

सांगली/क्राईम रिपोर्टर

**माणसाला जशी पोटाची भूक असते तशी शरीराची सुद्धा भूक असते. किंबहुना शारीरिक भूक अधिक तीव्र असते. अशावेळी एखाद्या जोडप्याच्या संसारात पत्नीला तिच्या मनासारखे शरीरसुख मिळाले नाही कि तिचा पाय घसरतो आणि मग ती दुसरा जोडीदार शोधू लागते. सांगलीतील एका विवाहितेला तिच्या पतीकडून मनासारखे शरीर सुख मिळत नव्हते, तर दुसरीकडे तिचे शरीर तिला स्वस्थ बसू देत नव्हते. म्हणून तिने टिकटॉकवर ओळख झालेल्या एका कोवळ्या तरुणाला आपल्या जाळ्यात ओढले आणि त्याच्याकडून हवे तसे सुख घेऊ लागली. मात्र पतीने दोघांना रंगेहात पकडताच तो तिला टाळू लागला. पण ती मात्र त्याच्याकडून मिळणाऱ्या सुखाला चटावलेली असल्याने तिने त्याला ब्लॅकमेल करायला सुरवात केली आणि त्याच्या विरुद्ध अश्लील फोटोद्वारे तो ब्लॅकमेल करीत असल्याचा गुन्हा दाखल केला. मात्र पोलीस तपासात सारे काही उघड होताच त्याच्यासह तिलाही अटक करण्यात आली.**

सांगलीतील एका शहरात मोहिनी (काल्पनिक नांव) ही आपल्या नवऱ्या, मुलासह राहत होती.तसे तिचे आरसपाणी ...पान २ वर

## सोशल मिडियावरच्या मैत्रीमुळे नशिबच फुटले मित्राने ब्लॅकमेल करून तिचे सर्वस्व लुटले



आरोपी नासेर

जालना/क्राईम रिपोर्टर

**सोशल मिडीयावर आजकाल चांगल्या लोकांपेक्षा भामट्यांचाच अधिक सुळसुळाट आहे आणि हे भामटे आपली अपडेट प्रोफाईल बनवून सोशल मिडीयावर सावज हेरत असतात. दुर्दैवाने चांगल्या घरातल्या मुली अशा भामट्यांच्या जाळ्यात पटकन अडकतात आणि आपले सर्वस्व गमावून बसतात. जालन्यातील एका भामट्याने इन्ट्राग्रामवर एका मुंबईतल्या तरुणीला पटवले आणि तिला लग्नाचे वचन देवून शारीरिक संबंध तर ठेवलेच पण तिचे आपत्तीजनक फोटोकाढून ते सोशल मिडीयावर टाकण्याची धमकी देवून तिला ब्लॅकमेल करू लागला. अखेर तिने या प्रकरणी पोलिसांकडे फिर्याद नोंदवतच पोलिसांनी सापळा रचून या भामट्याला अटक केली.**

जालना शहरातील हिंदनगर भागातील नवीन मोढा परिसरात नासेर खान अफसर खान हा तरूण राहतो. तो ईगल ब्रॉडबॅन्ड सर्व्हिसेसमध्ये ऑपरेटर म्हणून नोकरीला आहे. ब्रॉडबॅन्ड इंटरनेट सेवेचे कार्यालय असल्याने या ठिकाणी वायफाय फ्री आहे. कार्यालयीन कामासाठी हे वायफाय आवश्यक असले तरी नासेरसारखे काही तरुण मात्र त्याचा गैरफायदा घेतात. मोफत इंटरनेट वापरायला मिळत असल्यामुळे नासेर त्याचा भरमसाठ वापर करत होता. त्याने अनेक सोशल मीडीया प्लॅटफार्मवर त्याची प्रोफाईल सुरु केली होती. त्यावर तो स्वत:चे फोटो एखाद्या मॉडेलप्रमाणे अपलोड करत होता. श्रीमंत असल्याचा तो बनाव करत होता.... पान ७ वर

## नराधमाची वासना उफाळून आली चिमुकलीवर अत्याचार करून हत्या केली

पेन/क्राईम रिपोर्टर

**वासनेने पछाडलेला माणूस हा सैतानापेक्षाही भयंकर असतो. वास्तविक अशा नराधमाला त्याच्या पहिल्याच गुन्ह्यात जर कठोर शिक्षा झाली तर भविष्यात तो तसाच गुन्हा करण्याचे धाडसच करू शकणार नाही. पण दुर्दैवाने आपल्या इथले कायदे आरोपींना सुधारण्याची संधी देतात. त्यामुळे त्याच्या सुरवातीच्या गुन्ह्याकडे समजही दुर्लक्ष करतो आणि कायदाही त्याला कठोर शिक्षा करण्याइतपत सक्षम नसतो. मात्र त्याचवेळी अशा गुन्हेगाराचा एकदा का धीर चेपला कि मग तो सराईत बनतो आणि समाजासाठी घटक बनतो. पेनमध्ये अशाच एका सराईत गुन्हेगाराची पेरोलवर सुटका होताच त्याच्यातला सैतान जागा झाला आणि त्याने अवघ्या दोन वर्षांच्या बालिकेवर बलात्कार करून तिची हत्या केली. या घटनेने संपूर्ण रायगड जिल्हा हादरला असून त्या नराधमाला पोलिसांनी अटक केली आहे.**

रायगड जिल्ह्यातील पेण इथं ३ वर्षाच्या आदिवासी मुलीवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आलीय . पेण इथल्या प्रायव्हेट हायस्कुलच्या मागील बाजूस वडगाव इथं रात्री हा प्रकार घडलाय. तिथंच तिचा ...पान २ वर

## नववर्ष साजरे करण्यासाठी नवी मुंबईत आली रिक्षा चालकाने बलात्कार करून कलंकित केली







पोउनि तारमाळे

नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

**ग्रामीण भागातील तरुण तरुणींना मुंबई सारख्या शहरांचे खूप आकर्षण असते. त्यामुळे ते कधी कधी घरच्यांच्या परवानगीने तर कधी घरातून पळून मुंबईला येतात. मात्र तरुण मुलीने एकटीने मुंबई किंवा नवी मुंबई सारख्या शहरात येणे किती धोकादायक आहे हे नुकत्याच नवी मुंबईत घडलेल्या एका घटनेवरून उघडकीस आले आहे. छातीसगड वरून नवी मुंबईत नववर्ष साजरे करायला आलेल्या एका तरुणीला पनवेल येथून एका रिक्षा चालकाने आपल्या रिक्षात बसवून निर्जनस्थळी नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी पोलिसांनी अवघ्या बारा तासात त्या रिक्षा चालकाला अटक केली.**

ती तरूणी उत्तर प्रदेशातून जिल्हा जसपूर राज्य छत्तीसगढ येथून नवी मुंबईत न्यू इयर साजरा करण्यासाठी आली होती. प्रथम ती झारखंडवरून दिल्ली शहरात पोहचली. तिकडे ती एक दिवस एका हॉटेलमध्ये मुक्काम करून पश्चिम एक्सप्रेसने बांद्रा रेल्वे स्टेशनवर उतरली होती.बांद्रा रेल्वे स्थानकावर तिकीट तपासनिसला (टिसी) तिचा ...पान ७ वर

04 JAN TO 10 JAN 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 02/01/2021 9:24 PM Page 1



## पान १ वरून....

### मजुरी मागितली म्हणून मालक ...

आणि राहुल त्याकडे दुर्लक्ष करायचे. त्यातच सोमवारी रात्री साडे अकराच्या सुमारास मनोज आपली मजुरी मागण्यासाठी पुन्हा एकदा या दोघांच्या घरी गेला. त्यामुळे पैसे मागण्यासाठी मनोज घरी आल्याने याचा दोघांना राग आला. त्यामुळे त्या दोघानी मनोजला दांडक्याने बेदम मारहाण करीत त्याचा खूनच करुन टाकला . याप्रकरणी उल्हासनगर हिललाईन पोलीस ठाण्यात बंटी आणि राहुलच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांनाही अटक करण्यात आली आहे. आता पोलीस नक्की मजुरीच्या पैश्याच्या वादातून खून झाला की खुना मागे आणखी काही कारण आहे, याचा शोध घेत आहेत.

### थकीत पगाराचा वाद प्राणावर ...

राहयला आहेत. त्याचा फोटोग्राफरचा व्यवसाय हा अतिशय चांगल्या पध्दतीने ते चालवत होते. ते आपल्या हाताखाली दोन, तीन कामगार घेऊन काम करत होते. त्यामुळे त्याचा व्यवसाय हा जांबोटी, खानापूर परिसरात चांगलाच भरभराटीला आला होता. या व्यवसायातील नव नवे तंत्रज्ञान त्यांनी शिकून घेतल्याने या परिसरातील त्याचे एकमेव असे फोटोग्रापरचे दुकान होते. जेथे सगळ्या सुविधा मिळत होत्या. गेल्या १५ ते २० वर्षापूर्वी त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरवात केली होती. या अगोदर या परिसरातील लोकांना फोटो डेव्हलपिंगसाठी बेळगावला यावे लागत होते.परंतु आता जांबोटी परिसरातच विजय अवल्लक्की याचें फोटो ग्राफरचे अद्यावत दुकान झाल्याने लोकांची गैरसोय दूर झाली होती. संपूर्ण देशात कोरोनाचा कहर झाल्याने लॉकडाऊन करण्यात आले होते. या काळात विजय अवल्लक्की यांनी आपल्या व्यवसायाच्या माध्यामातून सामाजिक बांधिलकी ही जपली होती. त्यांनी या काळात समाजासाठी सामाजिक काम ही केले होते. याच दरम्यान लॉकडाऊनमुळे प्रत्येक व्यवसायला झळ बसली असल्याने त्याचा थोडा फार परिणाम प्रत्येक व्यवसायावर जाणवत होता. तसा परिणाम विजय अवलक्की यांच्या फोटो ग्राफरच्या व्यवसायावरही झाला होता. त्याच्या फोटो स्टुडिओमध्ये रामचंद्र कांबळे हा तरूण गेल्या दोन-तीन वर्षापासून तो त्याच्याकडे कामाला होता. तो ही जांबोटी येथीलच असल्याने त्याला ही गावातील गावातच काम मिळाले म्हणून तो आनंदात होता.तसे विजय अवल्लक्की देखील त्याला कामाच्या बाबतीत सांभाळून घेत होते. पण तरीही तो कामाच्या बाबत काही तरी चुका करायचा.फोटो इंडिटींग त्याला करता येत नव्हते. तरीही त्याला काम शिकण्याची त्याला ते संधी देत होते. रामचंद्र कांबळे याचे शिक्षण फारसे झालेले नव्हते.त्यामुळे तो कामात तसा कच्चाच होता. त्याच्या बरोबरचे इतर कामगार काम व्यवस्थीत करीत होते.परंतु तेच काम रामचंद्र यांच्या हातून होत नव्हते. त्यामुळे मालक या नात्याने विजय त्याला कधी समजावत होते. तर कधी कामात सुधारणा कर.बाकीच्या इतर गोष्टीकडे लक्ष देत जावू नकोस असा सल्ला देत होते. तर कधी त्या दोघात कामावरून वादावादी ही होत होती. मालक या नात्याने कामात काही चुक झाली तर विजय त्याला बोलत होते. याचा त्याला राग येत होता.विजय त्याला काम करण्याची संधी देत होते.परंतू त्याच्या कामात काहीच सुधारणा होत नव्हती. आणि तो सांगूनही त्याचे काही एक ऐकत नव्हता.त्यामुळे विजय यांनी त्याला कामाच्या बाबतीत काही सांगण्याचे सोडूनच दिले होते. त्यातच कोरोनाच्या महामारीने संपूर्ण देशात लॉकडाऊन पुकारण्यात आल्याने त्याचा परिणाम सर्वच व्यवसायावर झाला होता. परिणामी फोटो ग्राफर विजय अवल्लक्की यांचा धंदा ही बसलेला होता. त्यातच कुठलेही धार्मिक कार्यक्रम,लग्न सोहळे यावरती बंदी घालण्यात आल्याने फोटो व्यवसायीकांचा धंदा पूर्णता : कोलमडला होता. विजय अवल्लकी यांना सामाजिक कामाची आवड असल्याने या महाभंयकर संकाटात ते आपल्या परीने सामाजिक काम करत होते. त्यांनी या काळात आपल्या धंदयाकडे पूर्णता:दुर्लक्ष केले होते.आणि कोरोना काळात सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी सामाजिक कामात लक्ष घातले होते.याचा परिणाम जो काही त्याचा धंदा होत होता.तो ही पूर्णपणे बंद पडला होता.त्याची घरची परिस्थिीती सधन असल्याने त्याचे त्यांना विषेश असे काही वावगे वाटत नव्हते.व्यवसायाला फटका बसल्याने त्यांनी आपल्याकडील कामगार ही कमी केले होते. त्यांना लॉकडाऊननंतर परत कामावर येण्यास सांगून त्याचा पगार, व हिशोब त्यांनी दिलेला होता.परंतु रामचंद्र याला त्यांनी या काळातील पगार दिलेला नव्हता.कारण ते देत असलेला पगार रामचंद्र याला मान्य नव्हता.तो ठरलेल्या पगाराची त्यांच्याकडे मागणी करू लागला होता.त्यातच त्याचे काम समाधानकारक नसल्याने विजय यांनी ही त्याला दोन महिन्याचा पगार दिलेला नव्हता. त्यामुळे त्या दोघात नेहमी वादावादी आणि भांडण होत होते.तो काम ही व्यवस्थीत करीत नाही,म्हणून त्यांनी त्याला इतर कामगाराच्या बरोबर कामावरून कमी केलेले होते. पगार ही नाही, आणि काम ही नाही म्हणून रामचंद्र त्याच्यावर चिडून होता.तो सारखा विजय याच्या घरी येवून त्यांना धमकी देत होता. परंतु विजय हे सरळ मार्गी असल्याने त्यांनी त्याच्या धमकीकडे दुर्लक्ष केले होते.तो सारखा त्याच्याकडे येवून भांडण काढीत असल्याने त्यांनी त्याला तु कुणाला घेऊन येतोस ते ये जा.असे सांगितले होते. त्याचे भांडण काही मिटत नव्हते.त्याने मागणी केलेली पगाराची मागणी विजय यांना देणे शक्य होते.परंतु तो त्याना धमकी देत असल्याने ते ही तो काय करतो हे बघण्यासाठी थांबलेले होते.बाब किरकोळ रक्कमेची होती.पण त्याचा बाऊ रामचंद्र याने मोठा केला. त्याने विजय अवल्लक्की यांच्या विषयी आपल्या मित्रांना वेगळेच सांगून त्याचा गेम करायची आहे त्या कामासाठी मला तुमची मदत पाहिजे मी तुम्हाला त्यासाठी दहा हजार रूपये देतो असे सांगितले.त्याचे मित्र ही या कामाचे पैसे मिळणार म्हणून तयार झाले होते.ते ही जांबोटी परिसरातील असल्याने ते विजय यांना ओळखत होते.त्यात रामचंद्र याचे तीन अल्पवयीन मित्र ही होते.आता या पाच जणांनी विजय यांना कायमचा धडा शिकवायाचा असे ठरवले होते.रामचंद्र याने या कामाचे दहा जहार रूपये देऊन वरून दारूची आणि जेवणाची पार्टी देण्याचे कबुल केले होते.म्हणूनआता त्यांनी तशी योजना आखलेली होती. २५ डिसेंबर२०२० रोजी संपूर्ण देशात ख्रिसम्स साजरा होत होता.या दिवशी संध्यकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास रामचंद्र याने आपल्या दोघा मित्रांना विजय याच्या घराकडे पाठवून दिले.त्या दोघा अल्पवयीन मित्रांनी विजय यांना गावातच एक कार्यक्रम असून त्या कार्यक्रमाचे फोटो काढायाचे आहेत असे सांगून त्याला घरातून बोलावून नेले होते.आता फोटो काढायचे असल्याने विजय ही त्याच्याबरोबर त्याच्या दुचाकीवरून गेले.त्यावेळी त्या दोघांनी विजय याना चिखले जंगलात नेले होते.तेथे एका निर्जनस्थळी त्यांनी गाडी थांबवली. तेथे अगोदरच रामचंद्र कांबळे,त्याचा मित्र नारायण मेंडीलकर आणखी एक अल्पवयीन मित्र असे तिघे होते.रामचंद्र याला समोर बघून विजय यांनी काय ओळखायचे ते ओळखले होते.ते त्या पाच जणांनाही ओळखत होते.तरीही त्यांनी धाडस दाखवत मला आशा पध्दतीने येथे का आणले? मला कार्यक्रम आहे,फोटो काढायचे आहे म्हणून फसवून येथे कशासाठी आणले.मी काय तुम्हाला घाबरत नाही.मला तुमच्याशी काही बोलायचे नाही म्हणून ते एकटेच निघून जात होते.त्यावेळी त्या पाच जणांनी दारूच्या नशेत असल्याने त्यांनी त्यांना वाटेत आडवून त्याच्याबरोबर भांडण काढायला सुरूवात केली.त्यावेळी त्याच्या हातात धारदार चाकू सारखे शस्त्र होते.त्या पाच जणांनी त्याला मारहाण करीत खाली पाडले.तसे ते गयावया करू लागले.तरीही ते मारहाण करीत होते.त्यातच ते अर्धमेले झाले होते.ते त्याच्या तावडीतून सुटून जीव वाचविण्यासाठी अंधारातून पळून जात असताना त्यांनी त्याचा पाठलाग करून त्याना पकडले.आणि लगेचच आपल्याकडील चाकूने त्याच्या गळयावर वार करीत त्याचा गळा चिरला.त्यासरशी त्यांच्या गळ्यात रक्ताची धार लागली होती.ते तसेच तडफडत खाली पडले.त्यातच त्या पाचजणांनी परत त्याच्यावर वार केले होते.त्यातच त्याचा जागीच मृत्यु झाला होता.आपल्या हातून खून झाल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर त्या पाचजणांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरविले. त्यावेळी त्यांनी आपल्याकडील त्याच धारदार चाकूने त्याचे शीर आणि धड वेगळे करून टाकले.ते दोन्ही त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी खड्डा करून पुरून टाकले.त्याचे शीर त्यांनी त्या जंगलात एक रिसोर्ट होते.त्याच्या मागील बाजूस खड्डा काढून पुरले तर धड त्यांनी चिखले जंगलातील दुसऱ्या बाजुला नेऊन पुरले.त्याचे काम तमाम करून ते पाचही जण रात्रीच्या अंधारात आपपल्या गाडीवरून जंगलातून जांबोटी येथे परतले. त्या रात्री कामासाठी गेलेले विजय हे रात्री उशिरा पर्यत परत आले नाहीत.दुसऱ्या दिवशी ही ते सकाळपर्यत परत आले नाहीत म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला होता.त्याचा मोबाईल त्यावेळी स्विच ऑफ येत होता.त्यामुळे त्याची मुलगी आणि पत्नी या दोघी चिंतेंत होत्या.त्यांनी त्याचा शोध घ्यायला सुरवात केली.परंतु संध्याकाळ पर्यत त्याचा शोध लागला नसल्याने त्याची मुलगी वैदही हिने आपले वडिल विजय अवल्लक्की हे दि.२५ डिसेंबर २०२० च्या रात्री साडेसात वाजल्यापासून बेपत्ता असल्याची तक्रार खानापूर पोलीसात नोंदवली होती.पोलीस ही बेपत्ता विजय याचा शोध घेत असताना ते त्याच्या मोबाईलचा ट्रेस काढत होते.त्यावेळी पोलीसांना त्यांचा शुक्रवार दि.२५ डिसेंबर संध्याकाळ मोबाईलचा ट्रेस चिखले जंगलात दाखवत पोलीस त्या अनुषंगाने तपास करत होते. त्याचवेळी त्याचे कुणाबरोबर कसले भांडण, पैशाचा व्यवहार होता का?याची माहिती घेत असताना त्याची मुलगी वैदही हिने जांबोटी येथील आपल्या दुकानात कामाला असणाऱ्या रामचंद्र कांबळे याच्याबरोबर पैशाचा वाद झाला असल्याचे सांगून तो आपल्या वडिलांना धमकी ही देत असल्याचे सांगितले.यावरून पोलीसांनी संशयावरून रविवार दि.२७ डिसेंबर रोजी रामचंद्र कांबळे याला ताब्यात घेतले.त्याच्याकडे पोलीसांनी बेपत्ता विजय अवल्लक्की याच्या विषयी चौकशी केली असता.तो पोलीसांना ताकास तूर लागू देत नव्हता.त्यावेळी पोलीसांनी त्याला आपल्या खाकीचा प्रसाद दिल्यावर त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला? याची माहिती देवून आपल्या इतर चार मित्रांची नावे पोलीसांना सांगून विजय याचा खून करून त्याचा मृतदेह त्यांनी चिखले जंगलात वेगवेगळ्या ठिकाणी पुरला असल्याची माहिती दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याच्या इतर चार मित्रांना ही ताब्यात घेतले होते.त्यौपकी नारायण मेंडीलकर हा होता.इतर तिघेजण अल्पवयीन होते.त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी रविवार दि.२७ डिसेंबर२०२० रोजी चिखले जंगलातून विजय अवल्लक्की याचा मृतदेह जेसीबीच्या सहाय्याने वेगवेगळ्या खड्डातून बाहेर काढला होता.त्याचे शीर आणि धड त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पुरले असल्याने पोलीसांनी त्याच्या मृतदेहाचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून तो बेळगाव येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. मयत विजय अवल्लकी यांची मुलगी वैदही अवल्लकी हिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी विजय चंद्रकांत अवल्लकी (वय ५२).रा.जांबोटी याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी पोलीसांनी रामचंद्र बाबुराव कांबळे (वय २१) रा.जांबोटी,त्याचा मित्र नारायण ज्ञानेश्वर मेंडीलकर (वय२०) रा.कोलमणी खानापूर आणि अन्य तिघे अल्पवयीन यांच्या विरोधात खानापूर पोलीस स्टेशनमध्ये आय.पी.सी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. तर अल्पवयीन तिघा जणांची रवानगी बालसुधारगृहात केली. पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि दोन मोटार सायकली जप्त केल्या होत्या. या घटनेचा तपास मंडल पोलीस निरीक्षक सुरेश शिंगी,आणि गुन्हे विभागाचे पोलीस निरीक्षक कार्जोळी यांनी केला. विजय अवल्लकी यांचा खून आरोपींनी पैशाच्या व्यवहारातून केला की, त्याला अन्य कोणत्या कारणातून केला याचा तपास ही पोलीस करत होते. त्याचबरोबर विजय अवल्लकी याचा खून अनैतिक संबंधातून झाला असल्याचीही चर्चा जांबोटी परिसरातून दबक्या आवाजात होत असल्याने पोलीसांनी त्या अनुषंगानेही आपला पुढील तपास चालविला होता.खरे काढून पोलीस तपासता कळेल ही पण पैशाचा व्यवहार हा कधीही जपूनच करावा लागतो. हल्ली किरकोळ पैशाच्या व्यवहारातूही खूनाच्या घडत आहेत. तर आजची तरूण पिढी ही खटक्यावर बोट जागेवर पलटी या नात्याने वागत असल्याचे या घटनेवरून दिसून येते.

### वासनेच्या मोहापायी मातृत्व कलंकित...

परितेवाडी येथे उघडकीस आली आहे. अनैतिक संबंधात अडसर ठरत असलेल्या माढा तालुक्यातील परितेवाडी येथील २२ वर्षीय युवकाचा जन्मदात्या आईने व तिच्या प्रियकरानेच कट रचून, डोक्यात दगड घालून खून केल्याचे उघड झाले असून फरार प्रियकराला टेंभुर्णी पोलिसांनी शिफातीने अटक केली आहे. या खुनाच्या घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेले आहे. सिद्धेश्वर सुभाष जाधव (वय २२ रा.परितेवाडी ता. माढा जि सोलापूर) असे खून झालेल्या युवकाचे नाव असून, मुक्ताबाई सुभाष जाधव (वय ४५) व तिचा प्रियकर तात्या महादेव कदम (वय ३५) अशी आरोपीचे नांवे आहेत. २५ रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास सिद्धेश्वर याचा खून झालेला मृतदेह परितेवाडी शिवारात एका चारीत मिळून आला होता. यानंतर टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित शितोळे व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवून परिस्थितीजन्य पुराव्यावरून व गुप्त माहितीच्या आधारे मुलाचा जन्मदात्या आईनेच प्रियकराच्या मदतीने खून केल्याचे तपासात निष्पन्न होताच पोलिसांनी आई मुक्ताबाई हिला तातडीने अटक केली आहे. तसेच हा खून कट रचून केल्याचे तपासात समोर आले आहे. गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास दोघांनी सिद्धेश्वर यास झोपेत असताना डोक्यात दगड घालून त्याचा खून केला. तो मयत झाल्याची खात्री होताच त्यास झोळी करून काठीच्या सहाय्याने अर्ध्या किमी अंतरावर नेऊन माळातील निर्जन ठिकाणी चारीत फेकून दिले. यानंतर रक्ताने माखलेले कपडे जाळून टाकले व रक्ताळलेली जागा शेणाने सारवून जणू काही झालेच नाही. या अविर्भावात प्रियकर जोडपे शांतपणे घटनेची माहिती घेत होते. मात्र तपासात मुक्ताबाई हिस पोलिसांनी ताब्यात घेताच प्रियकर तात्या फरार झाला. त्यास पोलिसांनी उंबरे पागे येथून सायबर सेलच्या मदतीने अटक केली आहे.

### अनैतिक संबंधाचा भयानक शेवट..

विभक्त राहत असल्याने काही काळाने ती आपल्या मुळगावी मुगबसव येथे येऊन राहू लागली होती.परंतु तिच्या माहेरची परिस्थिीती गरीबीची असल्याने आणि आई वडिलांना आपला भार वाटू नये म्हणून नोकरीच्या शोधात होती. जेणेकरून आपला उदरनिर्वाह आपण करू आणि आई वडिलाना ही आधार देवू अशी तिची इच्छा होती.ती नोकरीच्या शोधात असताना तिच्या एका मैत्रीणीच्या ओळखीने ती सुरक्षा रक्षकाचे काम करू लागली होती. तिला एकाच्या वशिल्याने बेलगाव सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हे काम मिळाल्याने ती नेहमी मुगबसव बैलहोंगल येथून बेळगाव येथे ये जा. करत होती. सिव्हिल हॉस्पिटलमधील सुरक्षा गार्डचे महिलांचे काम हे दोन शिफ्टमध्ये होते. सकाळी ७ ते संध्याकाळी ७ आणि रात्री ८ ते सकाळी ८ अशा दोन शिफ्टमध्ये तेथे महिला सुरक्षा गार्डचे काम करीत होत्या. त्यातच गेल्या तीन वर्षापूर्वी बैलहोंगल येथील इराण्णा जगजंपी हा उळवी येथील श्रीकृष्ण मंदिराला गेला होता.त्यावेळी सुधाराणी ही त्या मंदिराला गेली होती. तेथेच त्या दोघांची ओळख झाली होती.त्याने तिची पहिल्या भेटीतच माहिती घेऊन मैत्री केली होती. त्यावेळेपासून तो तिच्याशी लाडीगोडी लावत बोलत होता. ती ही त्याच्याशी हसत गप्पा मारत बोलत असायची यातूनच त्या दोघांनी एकमेकांच्या मोबाईलच्या नंबरची देवाण घेवाण केली होती. ते दोघे ही मोबाईलवरून एकमेकांशी चॉटिग करू लागले. त्यातून त्या दोघांचे प्रेम बहरत होते. तिला ही तो आवडू लागल्याने कधी कधी ती बैलहोंगलहून बेळगावला त्याच्या गाडीवरून येऊ जावू लागली होती. याच दरम्यान त्याने तिच्याशी कळत नकळतपणे त्या कामासाठी होकार मिळविलेला होता. तिला नोकरी लागल्याने व तिला चार पैसे भेटू लागल्याने तिच्या पोटापाण्याची तर सोय झालेली होती.परंतु ती जवान आणि तरूण असल्याने तिच्या पोटाखालची आग तिला स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून तिने त्याला नाही होय म्हणत होकार दिला.त्याला ही तेच पाहिजे असल्याने संधी मिळताच तो तिला घेऊन एका लॉजच्या रुमवर गेला. तेथे ते दोघे गप्पा मारत असताना त्याने तिला मिठी मारताच ती ही त्या भावनेने तडफडत असल्याने लगेच त्याच्या पॅन्टवरती आपला हात ठेवला. त्याला तेच पाहिजे असल्याने दोघे ही रोमान्स करीत असताना दोघे ही कधी एकमेकांच्या नग्न अंगावर पडले हे त्याचे त्यांनाच कळले नाही. तिची कमसीन जवानी बघून तो चेकाळलाच होता.ती ही बऱ्याच दिवसापासून त्या सुखाला पारखी असल्याने तिने त्याला आपल्या अंगावरती घेतले होते. तो दाबादाबी करत घुसमळत असताना त्याने तिला आपल्या अंगाखाली घेऊन चांगलेच लोळवले होते.तिला स्वर्ग सुखाचा आनंद मिळवून दिला होता. त्यादिवसापासून त्या कामासाठी ते सारखे एकत्र येवू लागले होते. त्या दोघांनाही त्या सुखाची चटकच लागलेली होती. त्या दोघांचे ते संबंध गेल्या दीड दोन वर्षापासून चालू होता. वासनांधतेला ते प्रेम समजत होते. आलिकडे तर सुधाराणी तर त्याला आपण दोघे लग्न करून एकत्र राहूया असे सांगत होती. तो मात्र तिचे शरीर उपभोगून तिला सोडून देणार होता. एक तर अजून तिने तिच्या नवऱ्यापासून घटस्फोट घेतलेला नव्हता. त्या दोघा नवरा बायकोची केस कित्तुर कोर्टात अजूनही चालूच होती. मग तो तिच्याशी कसे काय लग्न करू शकणार होता. म्हणून तो एका अर्थी तिला लग्नासाठी नकार देत होता. ती मात्र त्याच्याबरोबर भांडण काढून तुला माझे शरीर पाहिजे आणि मी नको झाले का म्हणून विचारत होती. त्या दोघांचे भांडण विकोपाला गेले होते. अलिकडे तर ती त्याच्याबरोबर संपर्क ही साधत नव्हती. पण इराण्णाला ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिला सारखे फोन करत होता. भेटायला बोलवत होता. ती त्याला लग्नाचा तगादा लावत होती. तेवढयापुरते तो तिला लग्नाचे आश्वासन देत होता. हे तिला ही माहित होते. त्याला तिची चटक लागल्याने तो तिच्या मागेच लागला होता. सुधाराणी त्याला आधी आपण लग्न करूया, मग पाहिजे त्यावेळी तु माझ्याबरोबर मजा मारू शकतोस असे सांगत होती. तिने लग्नाचा तगादा लावल्याने आणि ती भेटायला बोलवले तरी ती येत नाही म्हणून तो तिच्यावर चिडून होता. आता ती आपले काहीच ऐकत नाही, शिवाय ते सुख ही देत नाही हिला कायमचा धडाच शिकवूया असे इराण्णाला मनात येत होते. त्याने तसा विचार ही पक्का केला होता. दारूच्या नशेत तिची गेमच करायची या विचारापर्यत तो आला. बेळगाव सिव्हिल मध्ये ती कधी कामाला जाते आणि कधी कामावरून परत येत याची त्याला माहिती होती. म्हणून त्याने थंड डोक्याने विचार करून तिच्या हत्येचा प्लॅन केला. मंगळवार दि.२६ रोजी नेहमी प्रमाणे रात्री कामावर गेली होती. तिच्याबरोबर तिची मैत्रीण गायत्री कलमठ ही डयुटीवर होती. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या दोघी डयुटी ८ वाजता संपणार होती. पण त्यापूर्वीच म्हणजे सकाळी ७.३० वाजता त्या दोघी काम संपवून घरी चालल्या होत्या. त्यावेळी तिला भेटायला म्हणून इराण्णा हा रूग्ण विभागाच्या पाठीमागील बाजूस आपल्या मोटर सायकल क्र के.ए.२२एक्स ७३००वरून आला होता. त्याच्या मनात त्यावेळी नेमके वेगळेच होते. हे तिला ही माहित नव्हते.सुधाराणी व गायत्री या दोघी रुग्ण विभागाच्या बाजूने बोलत येत असताना सुधाराणीने त्याला बघितले होते. त्याने ही तिला खूणने बोलवून काम आहे हे सांगितले. तो बोलवत असल्याचे बघून सुधाराणीने मैत्रिण गायत्री हिला तू पुढे चल, माझ्या ओळखीचा एक जण मला भेटायला आला आहे.' असे सांगून तिला पुढे जाण्यास सांगून ती इराण्णा थांबला होता त्या ठिकाणी गेली. गायत्री ही थोडे पुढे गेल्यावर तिला कुणाच्या तरी किंचाळण्याचा आवाज ऐकू आला.तिने मागे वळून बघितले तर सुधाराणीवर तिला भेटायला आलेला तरूण तलवारीने वार करत होता.त्याने तिच्यावर मानेवर, शरीरावर वार केले होते. ती रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. हे बघून गायत्री पळत त्या ठिकाणी तिला वाचविण्यासाठी आली असता, तिला ही इराण्णाने तलवार दाखवून पुढे आलीस तर तुझा ही जीव घेऊन. अशी धमकी दिली. म्हणून ती धावत पळत जावून त्याचे कंत्राटदार चेतन राजेंद्र हवालदार यांना ही घटना सांगितली. त्याने ही घटना आपल्या वरिष्ट आधिकाऱ्याना सांगून या घटनेची माहिती एपीएससी पोलीस ठाण्याला दिली. तो पर्यत घटनास्थळावरून इराण्णा हा पळून गेला होता. सकाळ सकाळी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये खूनाची घटना घडल्याचे ऐकून वाहतूक व गुन्हे विभागाचे चंद्रशेखर निलगार, मार्केटचे एसीपी सदाशिव कट्टीमनी, पो.निरी.जावेद मुशापुरी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. इराण्णाने केलेल्या तलवार हल्ल्यात सुधाराणीचा जागीच मृत्यु झाला होता. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह तेथील शवागरात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. पोलिसांना मयत सुधाराणीची मैत्रीण गायत्री कलमटी हिने प्रत्यक्ष पाहिलेली घटना सांगून संशयीत आरोपीच्या दुचकी गाडीचा नंबर दिला. त्यावरून पोलीसांनी तपास करून या घटनेतील आरोपी इराण्णा जगजंपी याला बैलहोंगल मधून ताब्यात घेतले आणि त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्यकडे या घटनेची चौकशी केली असता, त्याने आपला या घटनेशी आणि मयत सुधाराणी हिच्याशी कोणताही आणि कसलाही संबंध नसल्याचे सांगत होता. ही घटना बाह्य रूग्ण विभागाच्या सीसटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. तसेच त्याला मयत सुधाराणी हिची मैत्रीण गायत्री हिने पाहिलेले होते. तिला पोलीसांनी त्याची ओळख परेड पटविण्यासाठी बोलवले असता तिने त्याला ओळखले होते. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. सुधाराणी बसाप्पा हडपद (वय २७.रा.मुगबसव. बैलहोंगल) हिच्या खून प्रकरणी तिचा प्रियकर इराण्णा बाबु जगजंपी (वय २४ रा.जनता प्लॉट, आश्रय कॉलनी) याच्या विरोधात आय.पी.सी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा. कोर्टाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली असल्याने पोलीसांनी त्याची रवानगी हिडलंगा जेलमध्ये केली. न्यायालयी कोठडीत असताना पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली तलवार आणि त्याची दुचाकी जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास, एपीएसी पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

### विवाहितेचा सहवास त्याला चांगलाच ...

सौंदर्य हे नावाप्रमाणेच होते.ती मदमस्त आणि सेक्सी होती.तसे तिचे कुंटूंब सधन म्हणून परिचीत होते.तिचा नवरा एका चांगल्या कंपनीत नोकरी करत होता.सकाळी लवकर कामाला गेला की,रात्री उशिराच तो घरी परतत होता.दिवसभर मुले शाळेत गेली असल्याने व नवरा नोकरीनिमित्य बाहेर जात असल्याने मोहिनीला दिवस खायला उठत होता.ती आपला दिवसाचा रिकामा वेळ आपल्या मोबाईलवर व्यतीत करीत होती.तशी ती ही सुशिक्षीत असल्याने तिला मोबाईलमधील व्हॉट्सअप आणि टिकटॉक हे कळत होते. वयाच्या तिशीतील मोहिनी ही सेक्सच्या बाबत जरा उदासिनच दिसत होती. तिच्या आणि तिच्या नवऱ्याच्या वयात कमीत कमी १५ वर्षाचे अंतर होते. तो दिवसभर थकून भागून रात्री घरी आला की लगेच झोपी जात होता. त्यातच मोहिनीची जवानी तिला खायला उठत होती. नवरा बेडवर ढाराढरू झोपला की हिची जवानी हिला स्वस्थ बसू देत नव्हती. ती त्याच्या शेजारीच झोपली असली तरी कामभावनेच्या तळमळीने ती आपली कुस नेहमी बदलत असे. याचे तिच्या नवऱ्याला काहींच वाटत नव्हते. तो कामावरून थकून भागून घरी येत असल्याने आणि वयोमानपरत्वे त्याची कामभावना थोडी शिथील झाल्याने तो तिच्याकडे लक्ष देत नव्हता. महिन्यातून एकदा किंवा दोनदाच तिचा नवरा तिला आपल्या अंगावर घेत होता. तो लगेचच ढेपाळत असल्याने त्यातून तिची ती इच्छा पूर्ण होत नव्हती. असेच दिवसामागून दिवस जात होते. हल्ली तिने मोबाईलमधील टिकटॉकवर आपले लक्ष जास्त केंद्रित केल्याने टिकटॉवरतीच तिला एक मित्र भेटला होता.त्यादोघांची ही ओळख त्या माध्यमातून झालेली होती.ते दोघे दररोज चॅटिंग करू लागले होते.परंतु या अभासी दुनियेत कोण कसा भेटेल हे सांगता येत नाही. तरीही मोहिनी त्याच्या नादाला लागून त्याच्याशी चॅटिग करीत बोलत होती.तो ही तिच्याशी चॅटिग करत अश्लिल बोलत होता.यातून या दोघांना काय पाहिजे हे त्यांनी बरोबर ओळखले होते. चॅटिग करता करता त्याने तिला आपली ओळख सांगितलेली होती.तो मराठवाडयातील एक १७ वर्षीय तरूण होता. शिक्षणाच्या आणि कामाच्या निमित्याने तो सांगलीत आला होता. त्याने तिला आपले नाव रोहन (काल्पनिक नांव) सांगितले होते .त्याचे हॅन्डसम प्रोफाईल बघून मोहिनी ही त्याच्या प्रेमात पडली होती. एकदा चॅटिग करता करता रोहनने तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. तिने ही त्याला तशी संमती दिली.त्या दोघांनी ही भेटीचा दिवस ठरवला आणि सांगली जवळील एका हायवे वरील लॉजवरती ते दोघे भेटले. त्या दोघांनी ही त्यावेळी मनसोक्त गप्पा मारल्या.पिणे आणि जेवण खाणं झाल्यावर रोहनने मुळ विषयाला हात घालत तिच्याशी शारीरिक संबंध करण्याची इच्छा व्यक्त केली. ती ३०शीतील तर तो १७ वर्षाचा तिने ही आयतेच पाखरू आपल्या जाळ्यात सापडले म्हणून नाही, होय म्हणत त्याला तशी संमती दिली. तो तिच्या सौंदर्यावर भाळलाच होता.ती कमसीन आणि सेक्सी, मदमस्त होती. त्याने तिला मिठी मारत बेडवर आडवे करत तो तिच्या अंगावर पडला. ती ही त्याच्या देखणेपणावर भाळली असल्याने तिने ही त्याला आपल्या अंगावर ओढून घेतले होते. ते दोघे ही रोमान्स करत असताना त्या दोघांना ही कामभावना अनावर झाली होती. मोहिनी तर त्या सुखासाठी तडफडत असल्याने तिने त्याला आयतीच संधी दिली होती. त्याने तिची साडी बाजूला करत तिला रगडायला सुरूवात केल्यावर बघता बघता दोघेही नग्न होऊन ते सुख ओरबाडत होते. तो तरणाबांड असल्याने कुठेही कमी पडत नव्हता. तिच्यावर तो तटूनच पडला होता. ती ही त्याच्याकडून आपली जवानी ओरबाडत होती. त्यावेळी त्याने तिच्याबरोबर मस्तपैकी शारीरिक सुख घेत तिला ही स्वर्गसुखाचा आनंद दिला होता. त्यावेळी त्याने तिच्याबरोबर तीन वेळा ते सुख लुटले. मोहिनीही तृप्त झाली होती. तर त्याला ही त्यावेळी जवानी दिवानी म्हणजे काय असते? हे माहित झाले होते. त्यानंतर ही त्या दोघांची मैत्री घट्ट होत गेल्याने गेल्या दीड दोन वर्षापासून त्याचा तो खेळ चालला होता. मोहिनी ही विवाहिता आणि दोन मुलांची आई असल्याने तिला कशाचे ही भय नव्हते.तशी ती बिनधास्त होती. टिकटॉकवरून झालेली मैत्री कुठल्या कुठे गेली होती. तो ही तिच्याबरोबर शारीरिक सुख लुटत होता. परंतु किती ही झाले तरी विवाहबाहय संबंधात अडकलेली महिला ही पतीपेक्षा आपल्या प्रियकरालाच जास्त भाव देत असते. तसे मोहिनीचे ही झाले होते. ती आता नवऱ्याला किंमतच देत नव्हती. ती जास्ती जास्त वेळ रोहनबरोबर व्यतीत करत होती. त्याच्याशी व्हाट्अप, टिकटॉकवरून बोलत, गप्पा मारत होती.याचा परिणाम व्हायचा तोच झाला होता. मोहिनीचे आणि तिच्या नवऱ्याचे दररोज कुठल्या ना कुठल्या तरी कारणातून भांडण होऊ लागले होते. तिच्या नवऱ्याला आता तिच्याविषयी वेगळीच शंका येऊ लागली होती. आपली पत्नी दुसरीकडे कुठे तरी गुंतली असल्याचा त्याचा अंदाज होता. पण त्याने तिला तसे बोलून दाखवले नव्हते. मोहिनीचे बिनधास्त वागणे बोलणे बघून त्याची सटकतच होती. पण तिच्यापुढे त्याचे काही चालत नव्हते. म्हणून तो भांडणात माघार घेत होता. याचाच गैरफायदा ती घेत होती.. तिचे ही आता धाडस वाढले होते. तिला रोहनकडून पाहिजे तसे सुख भेटत असल्याने ती त्याच्यावर पैसे खर्च करत होती. अशातच तो एकदा गावी गेला होता. त्यावेळी मोहिनीने त्याला फोन करून मला तुझ्यावाचून करमत नाही. तू परत नाही आलास तर मी माझ्या जीवाचे बरेवाईट करून घेईन अशी धमकी दिली होती.त्याला ही तिच्याकडून ते सुख घेण्याची चटक लागली असल्याने तो तिच्या सांगण्या वरून परत सांगलीला आला.परत त्या दोघांचा तो इष्काचा खेळ सुरू झाला होता.याचाच तो आता गैरफायदा घेऊ इच्छित होता. तो आता तिच्याबरोबर शारीरिक सुख घेत असतानाचे मोबाईलमध्ये व्हिडीओ शूट करणार होता.त्या अधारे त्याची तिला ब्लॅकमेल करण्याची योजना होती.पण हे करत असताना त्याला तिला अंधारात ठेवायचे होते.तिचा त्याच्यावर विश्वास होता.याचाच तो गैरफायदा घेणार होता.कारण त्याला पुढे मागे कोणताही धोका पत्करायचा नव्हता. त्यातच तिने त्याला आता रात्रीच्या वेळी आपल्या घरी बोलावले होते.तिच्या नवऱ्याची रात्र पाळी होती.तो रात्री गेला की सकाळीच परत येणार याची तिला खात्री होती. म्हणून तिने त्याला बोलवले होते.मुलांना ही तिने जेवणखान करून दुसऱ्या रूमध्ये झोपले होते.रोहन आल्यावर घरातील बेडवर त्या दोघांचा नग्न हैदोस चालू झाला.त्यावेळी नकळतपणे त्याने तिच्याबरोबर शारीरिक संबंध करत असतानाचे नग्न व्हिडीओ आणि फोटो शूट केले होते.त्यानंतर त्यांच्या आशा क्रित्येक रात्री तिच्या घरातच रंगू लागल्या होत्या. एकदा तिचा नवरा कामावर गेला असताना परत तिने त्याला त्या कामासाठी बोलवले होते. परंतू त्या दोघांचा तो कार्यक्रम चालू असताना तिचा नवरा अचानकपणे घरात आला. त्यावेळी रोहन तिच्या नागडया अंगावर पडून ते सुख ओरबाडत होता. तर ती ही त्याला आपल्या अंगावर ओढून घेत होती. नवरा आल्याचे त्या दोघांना ही कळाले नव्हते.त्या दोघांच्यावर तो ओरडत असताना ते दोघे ही भानावर आले होते.त्यावेळी तिच्या नवऱ्याने तिला व त्याला समज देत त्यावर पडदा पाडला होता. कारण त्याचीच इज्जत जाणार होती.म्हणून तो गप्प बसला होता. रोहनही मुकाटयाने निघून गेला होता.तिच्या बरोबर तो तिच्या नवऱ्याला रंगेहात सापडल्याने तो तिला टाळू लागला होता.ती त्याच्याकडून मिळणाऱ्या शारीरिक सुखाला चटावलेली असल्याने तो भेटायला येत नाही म्हणताच तिने आता त्याच्या विरूध्द सांगलीतील पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. तिच्या तक्रारीवरून पोलीसांनी त्याला अटक करून ताब्यात घेतले होते. तिने त्याच्यावर आरोप लावला होता. की त्या दोघांचे संबंध ४ ऑगस्ट २०१९ पासून ते ६ सप्टेंबर २०२०या कालावधीत झाले असून त्याच्याकडे तिचे अश्लिल फोटो असून त्या अधारे तो तिला ब्लॅकमेल करत आहे. अशी तक्रार दाखल केली होती. पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता, पोलीस तपासात तो विधी संघर्ष बालक असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलिसांनी त्याला मा.न्यायालयासमोर उभे केले होते. मा. न्यायालयाने त्याची रवानगी बालसुधारगृहात केली. त्यांनतर दोन महिन्यांनी त्याची जामीनावर सुटका झाल्याने त्याने ही मोहिनी विरूध्द सांगली पोलीसात तक्रार दाखल केली. त्याच्या तक्रारीवरून तिच्या विरोधात बाल लैंगिक अपराध यापासून संरक्षण आधिनियम गु,रजि.नं.२०३/२०२० भा.दं.वी.कलम ४,८,१२, अशा कलमान्वे गुन्हा दाखल करून पोलीसांनी तिला ही ताब्यात घेऊन तिच्याकडे ही चौकशी केली असता तिने ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेचा पुढील तपास पो.उप.निरी.महेश डोंगरे हे करत आहेत. विवाह बाहय संबंधात महिला जर भरकटत गेली की ती कोणाचीच राहत नाही. तिला आपल्या प्रियकरा शिवाय कुणीच नको असतो, म्हणून तर तिची त्याच्यासाठी काहीही करण्याची तयारी असते. मोहिनीचे ही तसेच झाले. ती या संबंधात भरकटत गेली. टिकटॉकवरून अल्पवयीन मुलाबरोबर झालेली मैत्री शरीरिक संबंधात बदलली, त्याला ते दोघे ही चटावल्याने दोघेही वाहवत गेले. पण असे संबंध कितीही झाकले तरी ते एक ना एक दिवस उघड होतातच तसेच त्याचे ही झाले होते. नवऱ्याने त्या दोघांना ही समज देऊन ही ते दोघे ही ऐकत नसल्याने त्याची परिणीती गुन्हयात झाली होती.

### नराधमाची वासना उफाळून आली...

मृतदेह आढळून आलाय. प्राथमिक चौकशीत तिच्यावर बलात्कार झाल्याचं समोर आलंय. तिचा मृतदेह वैद्यकीय तपासणीसाठी पेण ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आलाय. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलंय.. तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून अलिबाग जेलमध्ये शिक्षा भोगत आहे. सध्या तो पॅरोलवर बाहेर आहे. या घटनेनंतर आदिवासी समाजात संताप व्यक्त होत आहे.. पेण पोलीस स्टेशन आणि सरकारी रुग्णालयाबाहेर आदिवासी बांधवांनी गर्दी केलीये. महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केलाय. दरम्यान कोणतीही अनुचीत घटना घडू नये यासाठी धडक कृती दलाची तुकडी दाखल झालीये.

04 JAN TO 10 JAN 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 02/01/2021 9:24 PM Page 1



# मुढवी येथील बेकायदा वाळू उपशावर महसूल प्रशासनाची कारवाई

## ३ लाख ५० हजाराचा मुद्देमाल केला जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मुढवी येथील माण नदीपात्रातून होडीच्या माध्यमातून बेकायदा वाळू उपसा होत असल्याची माहिती महसूल प्रशासनास मिळताच जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी पोलिस प्रशासनाच्या मदतीने नवीन वर्षाच्या प्रारंभी कारवाई करून ३ लाख ५० हजार रुपये किमतीचा वाळू साठा जप्त केला आहे. दरम्यान, वाळू तस्करावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे महसूल सुत्रांकडून सांगण्यात आले. सोलापूर जिल्हयात शासकीय वाळूचा लिलाव कोठेही झाला नाही. परिणामी मंगळवेढा तालुक्यातील भिमा व माण नदीपात्रातून वाळू तस्कर रात्रभर शासकीय मालमत्ता (वाळू) चोरी करीत असल्याने शासनाचे मोठे नुकसान होत आहे. माण व भिमा नदीत सध्या पाणी असल्यामुळे वाळू तस्कर बोटीच्या सहाय्याने वाळू उपसा करीत त्याचे साठे करून रात्रीच्यावेळी रात्रभर वाहने भरून त्याची विक्री करीत आहेत.माण नदीपात्रातून होडीच्या माध्यमातून दिवसभर वाळू उपसा करून नदीकाठावर वाळू साठा करीत असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढयाचे तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी पोलिस निरिक्षक जोतीराम गुंजवटे यांनी मुढवी येथील माण नदीपात्राला १ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वा. प्रत्यक्ष भेट दिली असता नदीपात्रात चार होडी अनधिकृतपणे वाळू उत्खनन करीत असल्याचे निदर्शनास आले. नदीकाठावर जवळपास वाळू तस्करांनी ३ लाख ५० हजार रुपये किमतीचा ५० ब्रास वाळू साठा केला होता. हा वाळू साठा महसूल प्रशासनाने जप्त करून तहसील कार्यालय आवारात आणून ठेवला आहे. पोलिस प्रशासन सध्या त्या वाळू तस्कारांचा शोध घेत आहे. वाळू तस्करावर दंडात्मक कारवाई व गुन्हे दाखल अशा दोन्ही पध्दतीने कारवाई केली जाणार असल्याचे महसूल प्रशासनाकडून सांगण्यात आले.वाढती वाळू चोरी रोखण्यासाठी तहसीलदार यांनी तलाठयाची पथके तयार केली आहेत. दरम्यान, मुढवी येथे गेल्या अनेक दिवसापासून भर दिवसा होडीव्दारे बेकायदा वाळू उपसा सुरु असताना सदर सजेमध्ये कार्यरत असलेले तलाठी व मंडल अधिकारी यांच्या नजरेस वाळूचोरीची घटना इतके दिवस कशी आली नाही. असा सवाल आजच्या घटनेवरून नागरिकांतून विचारला जात आहे. जिल्हाधिकारी यांनी वाळू तस्करांची पाठराखण करणाऱ्या संबंधित जबाबदार तलाठयाची चौकशी करून कारवाई करावी अशी आग्रहाची मागणी नागरिकांतून पुढे येत आहे. या कारवाईत महसूल व पोलिस प्रशासनाचे कर्मचारी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

## थोडक्यात वृत्तांत

### राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी घेतली शहीद जवान लोभे कुटूंबियांची भेट

निलंगा : मौजे उमरगा (हाडगा) , ता. निलंगा येथील सियाचीन येथे कर्तव्यावर वीरमरण आलेले शहीद जवान नागनाथ अभंगराव लोभे यांच्या घरी राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शहीद जवान नागनाथ लोभे यांच्या कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे चौकशी करून सांत्वन केले. तसेच कर्तव्यावर मरण पावलेल्या जवानांच्या कुटुंबीयांना शासन स्तरावरून सर्वोतपरी मदत करण्याचे निर्देश निलंगा तहसीलदार यांना दिले आणि वैयक्तिक पातळीवर ही वरिष्ठ स्तरावरून शासन मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी काँग्रेसचे नेते अभय साळुंखे, सरपंच अमोल बिराजदार, माजी पं. स.सदस्य विलास लोभे, तंटामुक्ती अध्यक्ष ,जगदीश लोभे, ग्रा.पं.सदस्य अरविंद कांबळे, आत्माराम लोभे, दिनकर दिवे,नामदेव लोभे, पोलीस पाटील अनंतराव पाटील वसंत कौडगावे, वसंत वाडीकर, राजाराम जाधव, माधवराव वाडीकर, वसंत सुरवसे, रणधीर लोभे, बालाजी कोडगावे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १ जानेवारी २०२१ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. १५ जानेवारी २०२१ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### बदनामी सहन न झाल्यामुळे महिलेची आत्महत्या

अहमदपूर : अहमदपूर शहरातील इंदिरा नगर परिसरातील ६० वर्षीय महिलेवर बलात्कार करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने महिलेने वाकी नदीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली असुन आरोपी विरुद्ध गु.र.न. ४२२,२० कलम ३७६, ३६६, ३०६, ३२३, ५०६ भादवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला व पोलीसांकडून आरोपीस तात्काळ अटक करण्यात आले आहे. याबाबत पोलिस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार आरोपी किशन रेनुकादास उगाडे (वय४० रा.इंदिरा नगर अहमदपूर) याने फिर्यादीची ६० वर्षीय सासु (रा.इंदिरा नगर, अहमदपूर) दि.२८ डिसेंबर वेळ २३.३० ते २९ डिसेंबर वेळ ११.३० वाजन्याच्या दरम्यान आरोपी किशन उगाडे याने जबरी बलात्कार केला व त्या वयोवृद्ध महिलेस मारहान करुन घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. पिडीत वयोवृद्ध महिलेला हा प्रकार सहन न झाल्याने शहरा जवळील वाकी नदितील पाण्यात उडी मारून आपली जिवन यात्रा संपविली. माणुसकीला काळीमा फासनाऱ्या या कृत्यामुळे प्रवृत्त होऊनच महिलेने आत्महत्या केली असावी असे फिर्यादीच्या जबाबावरुन दि. २९ डिसेंबर वेळ १४.१६ वा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. व पुढील तपास पो.नी.सुनिल बिर्ला हे करत आहेत.

### बेपत्ता रामचंद्रचा मृतदेह सापडला विहिरीत!

देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी येथील बेपत्ता असलेले रामचंद्र मोहनराव पिंजरे वय ४२ वर्षे यांचा गावशेजारी असलेल्या विहिरीतील पाण्यात पडल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवार दि.२६ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. मयत रामचंद्र पिंजरे हे दि.२० डिसेंबर पासून बेपत्ता होते. कुटुंबीय त्यांचा सर्वत्र शोध घेतला मात्र शनिवार रोजी वलांडी येथील प्रवीण स्वामी यांच्या गावशेजारी असलेल्या शेतातील विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे आढळून आले. या प्रकरणी मल्हारी श्रीमंतराव पिंजरे राहणार वलांडी यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात आक्समिक मृत्यू नंबर ७९/२०२० कलम १७४ सीआरपीसीप्रमाणे नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार डप्पडवाड हे करीत आहेत.




### देवणी तालुक्यात मतदार जनजागृती मोहिमेचा तहसील कार्यालयातून शुभारंभ

देवणी : सध्या होऊ घातलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकींच्या पार्श्वभूमीवर देवणी तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूक असलेल्या सर्व ३४ गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी व तसेच सर्व महिला व पुरुष मतदार यांनी उस्फूर्तपणे व जबाबदारीने मतदान करावे यासाठी गुरुवार दि.३१ डिसेंबर रोजी मतदार जनजागृती मोहिमेचा शुभारंभ तहसील कार्यालयातून करण्यात आला. या मोहिमेत श्रीमती दुरुगकर महिला व बालविकास अधिकारी, श्रीमती मुंडे श्रीमती गुरव, मास्टर ट्रेनर गोडबोले हे प्रत्येक गावात जाऊन मतदारामध्ये जनजागृती करणार आहेत. या सोबत जनप्रबोधनासाठी एक लाऊडस्पीकरसह मोबाईल वाहन असणार आहे व तसेच ईव्हीएम मशीनवर मतदान कसे करावे? याबाबतचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येणार आहे. अशी माहिती देवणी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी दिली.

# सिंधिकामठ येथील गिर्यारोहकदीपक कोनाळे यांनी वजीर सुळक्यावर फडकविला तिरंगा!

**देवणी/शकिल मनियार**



देवणी तालुक्यातील सिंधिकामठ येथील गिर्यारोहक दीपक कोणळे यांनी अखेर २८० फूट उंच असलेला वजीर सुळका सर करून भारतीय तिरंगा ध्वज फडकावून आपल्या गिर्यारोहणाच्या कार्यात पुन्हा एक मानाचा तुरा रोवला आहे. लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील सिंधिकामठ येथील दीपक कोनळे यांनी यापूर्वी आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखर व युरोप खंडातील सर्वोच्च शिखर माऊंट एल्ब्रस सर करून आपले नाव इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये व रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदविल्यानंतर परवा ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या माहुली किल्ला परिसरातील वजीर सुळका सर करून तेथे तिरंगा फडकवण्याचा मान पटकावला आहे. सदर वजीर सुळका हा उंच उंच टेकड्या, घनदाट जंगल अणि त्या मधोमध असलेला ९० अंशतील सरळ सुळका असून. कोणाच्याही अंगावर शहारे येतील असा तो सुळका आहे, ही जागा पाहूनच जिथे सर्वसामान्य च्या काळजाचा ठोका चुकतो तिथे या वजीर सुळकेची चढाई करणे याची कल्पना ही अशक्य. मात्र ते धाडस लातूरचा आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक दिपक कोनाळे यांनी वजीर सुळका सर करून तिरंगा फडकवला असून ही अभिमानाची बाब आहे. निसरडी गवताळ पाउल वाट ९० अंशातील सरळ उभी अतिकठीण चढाई. सुळके च्या पूर्वेकडील दरीचा उतार जवळपास ६०० फुट अणि पाण्याची प्रचंड कमतरता आहे. त्या मुळे या सुळके वर ट्रेकिंग करायचे ठरवले अणि इकडचा पाय तिकडे पडला तर थेट दरीच्या जबड्यात विश्रांती. मात्र नाशिक च्या पॉईंट ब्रेक ॲडव्हेंचर टीम च्या साथीने अशक्य ते शक्य करून दाखवले आहे. गिर्यारोहक दीपक कोनाळे यांनी आपले काही सहकारी अणि पॉईंट ब्रेक ॲंडव्हेंचर टीम मधील जॉकी साळुंके अणि चेतन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वजीर सुळका वर यशस्वीपणे चढाई केली तसेच त्यांनी सह्याद्री मधील अतिकठीण श्रेणीतील गडकिल्ले व अनेक गिरीशिखरे या आधी यशस्वी सर केले आहे आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक दिपक कोनाळे यांनी जुलै २०१८ ला आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखर माऊंट किलीमंजारो तसेच युरोप खंडातील सर्वोच्च शिखर माऊंट एलब्रुस सर करून भारतातील सर्वात मोठा तिरंगा फडकावून व राष्ट्रगीत गाऊन विश्व विक्रम केला आहे. दिपकची इंडिया बूक ऑफ रेकॉर्ड व हाय रेंज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. तसेच दिपक कोनाळे यांचा बेसिक माऊंटेनअरींग कोर्स अणि ॲंडव्हन्स माऊंटेनअरींग कोर्स झाला आहे.

## लक्ष्मनाथ भिमनाथ मठातील दानपेटीची चोरी

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोरोळ येथील लक्ष्मनाथ भिमनाथ मठातील दानपेटी फोडून अज्ञात चोरट्यांनी हजारो रुपये पळविल्याची घटना मंगळवारी दि.२९ डिसेंबर रोजी सायंकाळी उघडकीस आले. गेल्या वर्षभरापासून भाविक भक्तांनी कुलूप बंद दानपेटीत टाकलेली हजारो रुपयांची रक्कम मंगळवारी दि.२९ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दानपेटीचे कुलूप तोडून चिल्लर नाणी सोडून रोख रक्कम पळविल्याचे संबंधित पुजारी गजानन गिरी महाराज यांनी गावातील मारुती मंदिराच्या सप्ताहातून परतल्यानंतर लक्ष्मनाथ भिमनाथ मठातील दानपेटीची चोरी झाल्याची घटना निदर्शनास आली.घटनेची माहिती मिळताच मठ संस्थानचे पदाधिकारी माधव बालूरे, बाबु शेंडगे, अशोकराव देशमुख, काशिनाथ शेंडगे यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन पहाणी केली. दरम्यान घटनास्थळी देवणी पोलीस ठाण्यातील पोलिसांनी भेट देऊन घटनेची पहाणी करून माहिती घेतली. अशी माहिती लक्ष्मनाथ भिमनाथ मठ संस्थानचे अध्यक्ष माधवराव बालूरे यांनी बोलताना सांगितले. सदरील मठात आत व बाहेर दोन दानपेट्या असून चोरी झालेल्या दानपेटीत मोठ्या प्रमाणावर रक्कम चोरीस गेली आहे. कारण बाहेरील दानपेटी उघडून रक्कम तपासणी असता २६ हजार २१६ रुपये इतकी रक्कम निघाली आहे तर आतील दान पेटीत त्यापेक्षा अधिक रक्कम गोळा होत असते. व या मंदिरात दानपेटी फोडून रक्कम पळविल्याची घटना पहिल्यांदाच घडली आहे. असे मठ संस्थानचे पदाधिकारी अशोकराव देशमुख यांनी बोलताना सांगितले. यासंदर्भात देवणी पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार मगबुल शेख यांच्याशी आमच्या प्रतिनिधी नि मोबाईलवरती घटनेची माहिती विचारली आसता माहिती सांगण्यात ठाणे अमंलदार व इतर दोन ते तिन पोलीसानी सदर घटनेची माहिती दिली नाही व हा प्रकार आम्हाला माहितच नसल्याचे उडवुन टाकले आहे.

# देवणीतील २१ वर्षीय तरुणी ग्रामपंचायत निवडणूक रिंगणात



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक रणधुमाळीत नामनिर्देशन अर्ज भरलेल्या एकुण उमेदवारात सर्वात लहान तथा कमी वयाची असलेली मुस्लिम तरुणी शाजतमकनत पिता निहाल सौदागर हीने वलांडी ग्रामपंचायत प्रभाग ५ मध्ये इतर मागास प्रवर्गातील महिला सदस्यासाठी आपली उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. शाजतमकनत सौदागर हीचे २१ वर्षे ४ महिने इतके वय झाले असून शाजतमकनतच्या उमेदवारीने निवडणुकीच्या लढतीत मुस्लिम महिलांसह मुस्लिम तरुणीही मागे राहिले नसल्याचे ज्वलंत उदाहरण हे या मुस्लिम तरुणीच्या उमेदवारी वरुन दिसून येते. देवणी तालुक्यात दाखल झालेल्या एकुण ७३६ नामनिर्देशन अर्जाच्या तुलनेत पुरुष उमेदवारां पेक्षा स्त्री उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यात ३४७ पुरुष उमेदवार तर ३८९ स्त्री उमेदवारांचा समावेश आहे.

# पोलीस शिपाई हर्षल लेकुरवाळेच्या मृत्यूस जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करा -आमदार देवेंद्र भुयार

**वरुड/प्रतिनिधी**



पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांचे कुटुंबियास तात्काळ आर्थिक मदत देवुन मयताचे पत्नीला शासकीय सेवेत समाविष्ट करून घेण्याची मागणी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी गृह मंत्री अनिल देशमुख यांच्याकडे केली.

पोलीस शिपाई हर्षल लेकुरवाळे यांनी दि.१९.१२.२०२० रोजी स्वतःचे पोलीस क्वार्टर मध्ये सहा.सब इन्सपेक्टर सुधिर बघेल.नाईक पो.कॉ.मनिष मोरे व हे.कॉ.राजेश चंदेल यांचे त्रासाला कंटाळुन गळफास घेवुन फाशी घेतली. त्यावेळेस पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे हे कर्तव्यावर कार्यरत होते तसेच वरिष्ठांचे त्रासाला कंटाळुन पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांनी आत्महत्या केली. पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांचे पश्चात त्यांची पत्नी व नुकतेच जन्मलेले दिड महिण्याचा मुलगा व अपंग वडील असे सामाईक कुटुंब असून पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांनी आत्महत्या केल्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब उघडयावर पडलेले असुन त्यांचेवर उपासमारीची पाळी आलेली आहे. पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांचे घरात दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे हा घरातील एकमेव कर्ता व्यक्ती असल्यामुळे पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांच्या आत्महत्येमुळे त्याचे कुटुंबावर मोठे संकट कोसळले असल्यामुळे आमदार देवेंद्र भुयार, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी गृह मंत्री अनिल देशमुख यांची भेट घेऊन पोलीस शिपाई हर्षल केशव लेकुरवाळे यांचे कुटुबियांना त्वरीत शासकीय आर्थिक मदत मिळण्यात यावी. व मयताची पत्नी ही निराधार झाल्यामुळे तिला शासकीय सेवेत समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी केली. तसेच हर्षलच्या घरात सुसाईड नोट सापडली. पोलिसांनी ती नोट जप्त केली असून. त्यात त्याला त्याच्या सिनियरकडून होणाऱ्या त्रासाचा उल्लेख असल्यामुळे आत्महत्या करण्याची हर्षलवर वेळ आणणारे दोषी पोलीस कोण याचा शोध घेणे महत्वाचे आहे . पोलीस शिपाई हर्षल लेकुरवाळे यांचे मृत्युला बरेच दिवस उलटुन सुध्दा दोषी अधिकाऱ्यांवर आजपर्यत कसलेही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे आमदार देवेंद्र भुयार, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी गृह मंत्री अनिल देशमुख यांची भेट घेऊन पोलीस शिपाई हर्षल लेकुरवाळे यांचे मृत्युची सखोल तपासणी करुन दोषींना शिक्षा देण्यात यावी व पोलीस शिपाई हर्षल लेकुरवाळे यांचे आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे अधिकाऱ्यांवर त्वरीत निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आमदार देवेंद्र भुयार यांच्या मागणीची दखल घेऊन गृह मंत्री अनिल देशमुख यांनी पोलीस महासंचालक यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

# देवणी शहरातील कामे सुरू करण्यासाठी नगरपंचायतीसमोर उपोषण




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरात नगर पंचायती अंतर्गत चालु असलेले विकास कामे थांबविण्यात आली असुन ती कामे तातडीने चालु करण्यात यावे या मागणीसाठी बुधवार पासुन देवणी नगरपंचायत समोर भाजपाचे माजी गटनेते मच्छींद्र नरवटे यांनी उपोषणाला बसले आहेत. देवणी शहरात कांही दिवसापुर्वी नगरपंचायत अंतर्गत रस्त्याचे व नाली बांधकाम करण्यात आले व चालु होते. परंतु सदर कामे निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याचे त्याची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी रासपाचे मराठवाडा संपर्क प्रमुख अनंद जिवणे उर्फ पृथ्वीराज पाटील यांनी तक्रार देऊन नगर पंचायती समोर आठ ते दहा दिवस अमरण उपोषण केले होते. दरम्यान जिल्हाअधिकारी यांच्या आदेशाने एक समिती नेमण्यात आली होती व स्थानिक प्रशासनाने नगर पंचायती अंतर्गत होणारे शहरातील सर्व कामे बंद केली आहे, ती कामे तातडीने सुरू करावेत. तसेच रासपाने केलेले उपोषण हे राजकीय दबाव वापरून देवणी नगरपंचायतीच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकीय व अर्थिक स्वार्था पोटी विरोधास विरोध म्हणून सदरचे कामे थांबावुन देवणीकरांना विकासापासुन वंचित ठेवण्याचे काम रासपाने केले आहे. उपोषणकऱ्यांच्या दबावाला बळी पडुन प्रशासनाने शहरातील कामे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, असे अरोप उपोषणकर्ते माजी नगरसेवक मच्छिंद्र नरवटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.

## प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर होणार दंडात्मक कारवाईचे

**वाडा** : महाराष्ट्र शासनाने ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर राज्यात बंदी आणली आहे. तरीही वाडा तालुक्यात फळ, भाजी विक्रेते, लहान मोठे हॉटेल व्यावसायिक, मटण, मच्छी, चिकन विक्रेते हे सर्रासपणे ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या वापरतांना दिसून येत होते. ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांचे विघटन होत नसल्याने या पिशव्या वापरण्यास बंदी आणली आहे, अशा पिशव्या वापरणारे दुकानदार व विक्रेत्यांवर या अगोदरही दंडात्मक कारवाई करण्यात आली होती मात्र कोरोना काळात नगर पंचायचे अधिकतर कर्मचारी आरोग्य विभागात काम करत सल्याने व त्या काळात संचारबंदी व कोरोनाच्या संसर्गाची भीती होती. त्यामुळे कोणी बाहेर पडत नव्हे, मात्र आता अनलॉक प्रक्रिया शिथिल जेल्याने बाजारात पुन्हा या पुसव्यांचा वापर जोरात सूरु असल्याचे दिसून आल्याने नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी बाजारात फिरून अशा पिशव्यां वापरणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

04 JAN TO 10 JAN 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 02/01/2021 9:25 PM Page 1



# नवे वर्ष तरी सुख समाधानाचे जावो!

जीवनात पुढे जात असताना प्रत्येक माणूस नेहमीच मागे वळून बघत असतो. कारण त्याला भूतकाळातील उणीवा पुढे वर्तमान आणि भविष्य काळासाठी भरून काढायचा असतात. झालेल्या चुका सुधारून पुढे जायचे असते म्हणून तो मागे वळून बघत असतो. पण २०२० हे वर्ष इतके भयानक होते की जगातल्या कुठल्याही माणसाची त्याकडे मागे वळून २०२० कडे पाहण्याची हिम्मत होणार नाही. जणू काही गत वर्ष म्हणजे जगासाठी एक भयानक असे काळेकुट्ट स्वप्न होते. त्यामुळे त्याचा आता विचारही नको. २०२० हे कोरोना ईयर म्हणूनच ओळखले गेले. कारण या कोरोना वर्षाने जगभरातील ६ कोटी लोकांना आपल्या राक्षसी पंजात जखडले होते. त्यातील जवळपास एक कोटी लोकांचा मृत्यू झाला. आजवर दोन महायुद्धात सुद्धा इतकी माणसे मेली नसतील, जितकी कोरोनाने मेली. आणि अजूनही म्हणजे २०२१ मध्येही त्याचा प्रकोप संपलेला नाही. फक्त मागील वर्षांच्या तुलनेत त्याचा प्रभाव काही प्रमाणात ओसरलेला आहे आणि आता कोव्हीड शिल्ड म्हणजेच कोरोना प्रतिबंधक लस आल्यामुळं कदाचित कोरोनाचे दृष्टचक्र संपुष्टात येईल. पण कोरोनाने जगात जो हाहाकार माजला होता तो जग कदापि विसरणार नाही. त्यामुळे २०२१मध्ये प्रवेश करताना जणू काही काळाच्या जबड्यातून आपण बाहेर पडत आहोत ही भावना प्रतेकाच्या मनात आहे. त्यामुळे २०२१ तरी सुख समाधानाचे असेल का असा प्रश्न सुद्धा मनात निर्माण होतोय. आश्चर्याची गोष्ट अशी की माणसाने विज्ञानात प्रचंड अशी प्रगती केली आहे. माणसाने चंद्रा सारख्या परग्रहावर पावूल ठेवले. १२ ते १५ हजार किमी पर्यंतची टार्गेट गाठणारी खतरनाक क्षेपणास्त्रे बनवली. इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजीच्या माध्यमातून संपूर्ण जगाला जवळ आणले. पण कोरोना समोर मात्र हात टेकले होते. कारण कोरोनावर लस शोधायला जगभरातील सर्व शास्त्रज्ञांना तब्बल एक वर्ष लागले. त्यामुळे विज्ञानाच्या सुद्धा मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. कोरोनाची भयानकता जगाने अनुभवल्यानंतर आता काही देश त्याला जैविक हत्यार बनवण्याचा प्रयत्न करून त्याच्या माध्यमातून जगात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे भविष्यात जैविक अस्त्रांवर बंदी घालण्यासाठी जगातील शांतताप्रिय लोकांनी आतापासूनच आवाज उठवण्याची गरज आहे. आणि विस्तार वादाच्या स्पर्धेत जगातले काही देश संपूर्ण जगाचाच सर्वनाश करतील, अशी आता भीती वाटायला लागली आहे. कारण चीनने त्याची सुरुवात केली आहे. पण कोरोनामुळे येवढं प्रचंड नुकसान होऊनही जगाने चीनचा बाल ही बाका केलेला नाही. पण आता मात्र अशा संकटातून मार्ग काढण्याची आणि ज्यांच्यामुळे अशी भयंकर संकटे येऊ शकतात. त्यांना रोखण्याची आवश्यकता आहे. युनोने यावर गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण अजूनही लोकांमध्ये कोरोनाची प्रचंड दहशत आहे. त्यातच ब्रिटनमध्ये नव्याने निर्माण झालेल्या कोरोना सदृश्य रोगाने जगाची चिंता आणखी वाढवली आहे. त्यामुळं २०२१ साल तरी जगासाठी सुरक्षित असेल का? याची प्रत्येकालाच चिंता आहे. कारण कोरोनाने केवळ एक कोटी लोकांचा बळीच घेतला असे नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडून टाकले. आणि त्याचा सर्वाधिक परिणाम भारता सारख्या गरीब देशांवर झाला आहे. कोरोना काळात त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जो लोकडाऊनच पर्याय निवडण्यात आला, तो तितकासा काही परिणामकारक ठरला नाही. उलट त्याने अर्थचक्र थांबवले आणि लोकांना अक्षरशः भिकारी करून टाकले. या लॉकडाऊनमुळे जगातल्या निम्म्या लोकांचा रोजगार गेला आणि त्यांच्यावर उपाशी मरण्याची पाळी आलीय. त्यामुळेच २०२१मध्ये ही परिस्थिती सुधारावी असे प्रत्येकाला वाटतेय. कोरोनाचा विनाश करण्यात भलेही या वर्षी जगाला यश आले तरी कोरोनाने अर्थव्यवस्थेत जो खड्डा निर्माण केलाय तो भरून काढण्यात बरीच मेहनत घ्यावी लागणार आहे. कदाचित २०२१या एका वर्षांत ते शक्य होणार नाही. त्यामुळे विस्कटलेली आर्थिक घडी बसवण्यात आणखी काही वर्ष जातील. पण त्याला आता इलाज नाही. त्यातल्या त्यात जमेची बाजू म्हणजे भारता सारख्या देशाने कोरोनाशी संघर्ष करीत काही महिन्यांनी कोरोनाची मानसिक भीती झुगारून अनलॉकची प्रक्रिया सुरू केली होती आणि त्याचा बऱ्यापैकी फायदा झाला. देशाची आर्थिक स्थिती हळूहळू रुळावर येऊ लागली. उद्योग धंदे हळूहळू सुरू होत असल्याने लोकांनाही काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. पण अजूनही परिस्थिती पूर्वपदावर यायला काही काळ लागेल आणि हा काळ अत्यंत कसोटीचा असेल. हे वेगळे सांगायची गरज नाही. तेंव्हा लोकांनीही आपली जबाबदारी ओळखायला हवी. पुढच्या आठवड्या पासून कदाचित कोरोना प्रतिबंधक लस बाजारात येईल असे सांगितले जातेय. पण कोरोनाने माणसाला खूप काही शिकवले आहे. त्यातील पहिला धडा म्हणजे कोणतेही संकट हे काही सांगून येत नाही. त्यामुळे अशा संकटाचा मुकाबला करण्यासाठी ज्या काही गोष्टी स्वतःकडे असाव्या लागतात त्याची उपयुक्तता ओळखून त्या जपून ठेवणे. पैसा हा त्यापैकीच एक आहे. कारण काही लोकांकडे पैसा आला की त्याची वारेमाप उधळपट्टी केली जाते. नको त्या गोष्टीवर पैसा उधळला जातो आणि जेंव्हा संकट येते आणि पैशाची आवश्यकता असते. तेंव्हा मात्र झोळी रिकामी असते. कोरोनाच्या संकट काळात बऱ्याच लोकांच्या बाबतीत असे घडले आहे आणि सुरवातीच्या काळात म्हणजे लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर लोकांचे पैशा अभावी प्रचंड हाल झाले. कित्येकांवर तर त्यांच्या मुला–बाळांना ठार मारून आत्महत्या करण्याची पाळी आली. नोकरी धंदा गेल्याने घरात बसावे लागले. त्यामुळे दोन वेळच्या सोडाच एक वेळच्या जेवणाचे सुद्धा वांदे झाले होते. पैसाच नसल्याने अन्नधान्य आणायचे कुठून? आणि जिथे खायचे वांदे होते तिथे आजारपण आणि इतर गोष्टींसाठी पैसा आणायचा कुठून? त्यामुळे आजारी माणसाला उपचाराविना घरातच तडफडून मरावे लागले होते. कोरोनाचा सगळ्यांनाच फटका बसल्याने कोण कुणाला मदत करणार? अशी परिस्थिती निर्माण झाली होती. म्हणूनच या भयंकर अनुभवातून माणसाने योग्य धडा घ्यावा आणि नव्या वर्षांत वाटचाल करताना आपल्याला काय करायला हवे कोणत्या दिशेने जायला हवे आणि मुख्य म्हणजे घरातील विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हा व्यवस्थित बसवण्यासाठी कशा प्रकारे मेहनत करायला हवी हे ठरवूनच त्या दृष्टीने पावले टाकावीत. शेवटी प्रत्येक माणसाच्या जीवनात काहींना काही संकटे येतातच, पण त्यावर मात करण्यासाठी संकटातून धडा घेणे महत्वाचे असते. कोरोनाच्या संकटातून जग हळूहळू सावरते आहे. मात्र भविष्यात अशी संकटे येऊ नयेत यासाठी काहीतरी कठोर आणि ठोस उपाययोजना करणे खूप गरजेचे आहे.

# प्रवाशांची सहनशीलता संपलीय!



कोरोनाचे कारण पुढे करून लॉकडाऊनच्या काळात बंद करण्यात आलेली लोकल ट्रेन सेवा अद्यापही सर्व सामान्य प्रवाशांसाठी बंद आहे. त्यामुळे मुंबई बाहेरून मुंबईला कामाला जाणाऱ्यांची प्रचंड गैरसोय होतेय. विरार वरून चर्चगेटला आणि कल्याण वरून सीएसटीला एसटीने जाताना किमान साडेतीन तास लागतात. त्यामुळे लोकं वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहचू शकत नाहीत. परिणामी प्रत्येक वेळी लेट मार्क लागून काहींच्या नोकऱ्या गेल्यात. पण केंद्र किंवा राज्य सरकारला त्याच्याशी काहीही घेणेदेणे नाही. लोकल ट्रेन सुरु करण्याबाबत ते एकमेकांकडे बोटे दाखवून वेळ मारून नेत आहेत. त्यामुळे लोकांच्या सहनशीलतेचा अक्षरशः कडेलोट झालाय.

### संध्या स्ट्रोक
**सोनू जाधव**

अशा स्थितीत ज्यांना रोज कामाला जाता येताना त्रास सहन करावा लागतोय ते लोक इतके चिडलेले आहेत की त्यांच्या प्रक्षोभचा केंव्हाही भडका उडून काहीही अघटीत घडू शकते. कारण मुंबईची लोकल ट्रेन ही मुंबईकरांची लाईफ लाईन आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांसाठी ती लवकरात लवकर खुली व्हायला हवी. आणि आता कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला आहे. शिवाय याच महिन्यात कोरोना प्रतिबंधक लस सुद्धा मार्केटमध्ये येणार आहे. तरी सुद्धा सरकार लोकल ट्रेन बाबत निर्णय घ्यायला का घाबरते आहे तेच कळत नाही. संपूर्ण महाराष्ट्रात उध्दव ठाकरे सोडले तर कुणीही कोरोनाला घाबरत नाही. त्यामुळे लोक रस्त्यावर, मार्केटमध्ये, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या संख्येने दिसत आहेत. तर उद्योगधंदे सुरू झाल्यामुळे लोक पोटा पाण्यासाठी रोज घराबाहेर पडत आहेत.

कुणी रिक्षाने, कुणी टॅक्सीने तर कुणी एसटी बसने प्रवास करीत आहेत आणि सार्वजनिक परिवहन सेवेत सोशल डिस्टन्स पाळणे कठीण असल्याने लोक मजबुरीने का होईना एसटी बस किंवा बेस्ट बसेस मधील गर्दीतून प्रवास करीत आहेत. मग बस मधील गर्दीतल्या प्रवाशांना कोरोना होत नसेल तर लोकल ट्रेन मधल्या गर्दीमधून प्रवास करणाऱ्यांनाच कोरोना होणार आहे का? अनलॉक प्रक्रिये अंतर्गत राज्यातील उद्योग धंदे हळूहळू सुरू करण्यात आले. त्यानंतर अत्यावश्यक सेवेतील लोकांसाठी लोकल ट्रेन सुरु झाली आणि अत्यावश्यक सेवेत वैद्यकीय सेवाही समाविष्ट असल्याने या सेवेतील कर्मचाऱ्यांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची परवानगी देण्यात आली आहे. मात्र ही वैद्यकीय सेवा ज्या आजारी लोकांसाठी त्यांना मात्र लोकल ट्रेनच्या प्रवासाला मनाई हा कुठला न्याय? मुंबईच्या सरकारी रुग्णालयांमध्ये मुंबई बाहेरच्या ६० ते ७० टक्के लोकांवर उपचार सुरू होते, पण लॉकडाऊनमध्ये लोकल ट्रेन बंद केल्यापासून ते आजपर्यंत मुंबई बाहेरच्या हजारो लोकांना उपचारासाठी मुंबईत जाता आले नाही. परिणामी त्यांना उपचार मिळू शकले नाहीत. त्यात कित्येक रुग्णांचा मृत्यू झाला, तर काही रुग्ण घरातच मृत्यू शय्येवर तडफडत आहेत. पण सरकारला त्याची फिकीर नाही. सध्या महिलांसाठी काही ठराविक वेळेत लोकल ट्रेन उपलब्ध आहे वकील आणि शिक्षकांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची मुभा देण्यात आलीय. मग गंभीर आजारी रुग्णांनाच लोकल ट्रेनच्या प्रवासाची मुभा का नाही? सरकारच्या या चुकीच्या धोरणाबद्दल गंभीर आजारी रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांमध्ये सुद्धा संताप आहे. कोरोनाच्या भीतीने आणखी किती दिवस लोकल ट्रेन बंद ठेवणार असा संतप्त सवाल लोक करीत आहेत. लोकांचा आता संयम सुटत चालला आहे, तेंव्हा नवीन वर्षांत तरी सरकारने लोकल ट्रेन सुरु करून एसटीने प्रवास करणाऱ्या मुंबई बाहेरच्या कर्मचाऱ्यांची ससेहोलपट थांबवावी. कारण कोरोनाचा प्रादुर्भाव जर आता कमी झालेला असेल आणि लस लवकरच येणार असेल, तर लोकल ट्रेन सर्वसामान्यांसाठी सुरू करायला काय हरकत आहे. कारण मुंबईच्या मध्य, पश्चिम, हार्बर आणि ट्रान्स हार्बर या चार मार्गावरून रोज ९० लाख प्रवासी प्रवास करतात. त्यातील बहुसंख्य हे नोकरदार प्रवासी असल्याने नियमित प्रवास करणारे आहेत. पण सर्वसामान्य प्रवाशांना लोकल ट्रेन प्रवासाची मुभा नसल्याने या सर्वांची प्रचंड गैरसोय होत आहे. कारण एसटी किंवा अन्य वाहनातून रस्ते मार्गाने प्रवास करून वेळेवर कामाला किंवा कामावरून घरी पोचणे गैरसोयीचे ठरत आहे.

या प्रवासात लोकांचे प्रचंड हाल सुरू आहेत. त्यामुळे नेहमी रस्ते मार्गे प्रवास करणारे लोक सरकारच्या शंभर पिढ्यांचा उद्धार करीत आहेत काय करणार लोकांच्या यातना जर सरकारला काळात नसतील, तर त्यांनी सरकारच्या विरूद्ध बोलू नये. सरकारला जर लोकांच्या आरोग्याची एवढी काळजी आहे. तर त्यांनी लोकांना घरी बसवून पोसावे. पण ते शक्य नाही करांजिथे सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार द्यायला सरकारकडे पैसा नाही. तर सरकार घरी बसलेल्या लोकांना काय पोसणार! म्हणूनच सरकारने आता अधिक वेळ न दवडता लोकल ट्रेन सर्वांसाठी खुली करावी.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# नव करोनाचे संकट

### दिशायन



भारतात कोरोना विषाणू प्रसार आटोक्यात असला तरी परदेशात कोरोनाने थैमान घातले आहे. त्यामुळे परदेशातून पुन्हा कोरोनाचा शिरकाव भारतात होऊ नये यासाठी शासनाने निर्बंध लागू केले आहेत. युरोपात या नवकोरोना विषाणूची दुसरी लाट आली आहे, ही दुसरी लाट महाभयंकर असल्याचे आपण माध्यमांमधून ऐकले आहे. या नव्या विषाणूला शास्त्रीय भाषेत म्युटेशन व्हेरिअन्ट असे म्हटले जात आहे. त्यामुळे खूप सावधगिरी बाळगावी लागणार आहे.

२०२० या वर्षभरात कोरोनाचाच कहर पाहायला मिळाला. पण वर्ष संपले तरी कोरोनाचा एक्झिट घेण्याचे काही नाव घेत नाही. कोरोनाला रोखण्यासाठी लस, औषधे आणि उपचार पद्धती शोधण्याचे अतोनात प्रयत्न सुरू आहेत. प्रयत्नांना काही अंशी यशही मिळत आहे. तर दुसरीकडे आपल्या मनातली भीती काही अंशी कमी झाली आहे. शारिरीक दूरी, स्वच्छता आणि मुखपट्टे वापरण्याने कोरोनापासून बचाव करता येऊ शकतो. कुख्यात कोरोना विषाणू माणसाच्या शरीरात शिरतो, त्याच्यातील प्रतिकार क्षमतेवर हल्ला करतो आणि माणसाला कमकूवत बनवतो. सार्स कोव्हिड २ विषाणूंच्या कुटूंबामधून कोरोना येतो. या विषाणूंमध्येसुद्धा जेनेटिक मटेरियल असते. त्यानुसार त्याचे डीएनए आणि आरएनए विषाणू असे वर्गीकरण केले जाते. हे जेनेटिक मटेरियल म्हणजे न्यूक्लिओटाइड्सची विशिष्ट क्रमाने लावलेली रांग असते. चार अमिनो ॲसिड्सचे ठोकळे एका विशिष्ट क्रमात जोडले की या विषाणूंचा जीनोम तयार होतो. समजा, हे चार ठोकळे आहेत अ, ब, क आणि ड. तर जेव्हा 'अ' ला दिलेली जागा उडी मारून 'ड' पटकावतो तेव्हा या ठोकळ्यांचा क्रम बदलतो. त्यामुळे या विषाणूच्या जीनोमवर परिणाम होतो. हा क्रम बदलणे म्हणजे म्युटेशन होय. जेव्हा कोरोना विषाणू माणसाच्या शरीरात शिरतो तेव्हा त्याचे लक्ष असते स्वतःची आरएनए मोकळी करणे, त्याच्या कॉपीज करणे आणि ज्या माणसाच्या शरीरात तो शिरला आहे त्याची प्रतिकार शक्ती निकामी करून आजार पसरवणे. या विषाणूची आरएनए एका पाकिटात असल्याप्रमाणे गुंडाळलेली असते. या पाकिटाचे बाहेरचे आवरण ग्लायकोप्रोटीन्सचे असते. यामध्ये स्पाईक प्रोटिन्स सगळ्यात महत्वाचे असते. या स्पाईक प्रोटिन्सच्या साहाय्यानेच हा विषाणू आपल्या फुफुस्सामधल्या (अल्व्हीओलाय) सेल्सला चिकटतो. या सेल्समध्ये एसीई २ नामक रिसेप्टर असतात, ज्यांच्यावर हे स्पाईक प्रोटीन बांधले जातात. एकदा का हा विषाणू या सेल्सवर जोडला गेला की मग इतर संप्रेरक याच्या पाकिटाचे आवरण फोडतात. एंडोसायटोसीसच्या माध्यमातून कोरोना विषाणूची आरएनए आपल्या शरीरात शिरते. मग आपल्या पेशींमधल्या मशिनरीच्या सहाय्याने कोरोना विषाणू स्वतःच्या आरएनएच्या कॉपीज बनवायला सुरुवात करतात. मग हा आजार आपल्या शरीरात पसरतो. आपल्या सेल्समधील एसीई २ रिसेप्टरच्या रचनेशी साधर्म्य साधणारा सिक्वेन्स या स्पाईक प्रोटिन्सवर आणणे हा या विषाणूचा उद्देश असतो. कोरोना विषाणू सार्स कोव्हिड या विषाणूंच्या जातकुळातील आहे. सार्स विषाणू आपल्या शरीरात शिरतात तेव्हा आपली प्रतिकार शक्तीसुद्धा काम करतच असते. ती या विषाणूंच्या विरोधात अँटीबॉडीज तयार करायला सुरुवात करते. मग फुफुस्सामधल्या एसीई २ रिसेप्टरशी स्पाईक प्रोटिन्सची बाइंड करण्याची क्षमता कमी होते. त्यानंतर हा विषाणू निकामी पडायला लागतो. सर्व्हायव्हल इंस्टिक्टनुसार हा विषाणू आपल्या स्पाईक प्रोटिन्सच्या रचनेमध्ये बदल करायला बघतो. विषाणू अमिनो ॲसिड्सच्या ठोकळ्यांच्या क्रमात बदल करतो. स्पाईक प्रोटिन्सच्या सिक्वेन्समध्ये बदल झाल्यामुळे आपल्या शरीरतल्या अँटीबॉडीज आता या नवीन स्पाईक प्रोटीनला ओळखु शकत नाही. हा विषाणू अधिक जोमाने आजार पसरवण्यासाठी मोकळा होतो. अशा पद्धतीने स्पाईक प्रोटीनमध्ये म्युटेशन होते. आपण नवीन विषाणूचा स्ट्रेन किंवा अवतार आला असे म्हणतो. कोरोना विषाणूची नवी लाट युरोपात आली आहे. कोरोना विषाणूमध्ये आजपर्यंत जवळपास तीस ते पस्तीस छोटेखानी म्युटेशन्स झाले आहेत. कोरोना विषाणू हा जरी स्वतःचा बचाव करण्याकरिता आणि स्वतःला अधिक स्ट्राँग बनवण्याकरिता म्यूटेट होत असला तरीही त्याचं प्रत्येक म्युटेशन म्हणजे मानवजातीला धोका निर्माण करेल असे नाही. आपण या विषाणूमधल्या इटुकल्या पिटुकल्या बदलामुळे दरवेळी घाबरून जायला नको. जेव्हा इन्फ्लुएंझा परिवारातील विषाणूंवर लस बनवली जाते तेव्हा म्युटेशन्सचा अंदाज शास्त्रज्ञांना असतो. स्पाईक प्रोटिन्समध्ये होणारे संभाव्य बदल लस तयार करतांना गृहीत धरलेले असतात. त्यामुळे लगेचच आता या कोरोना विषाणूच्या नवीन स्ट्रेनमुळे घाबरून जाण्याची अजिबात गरज नाही. युरोपातील या नवीन कोरोना विषाणूच्या लाटेमुळे आजार पसरवण्याची, आजाराची लक्षण गंभीर करण्याची किती क्षमता आहे याबाबत ठोस विधान करण्यासाठी लागणारा डेटा आणि विश्लेषण तुर्तास तरी अपुरे आहे. डिसीज स्प्रेडिबिलिटी आणि डिसीज फटॅलिटी किंवा मॉरटॅलीटी रेट या दोन वेगळ्या बाबी आहेत. त्यामुळे म्युटेशनमुळे आजार पसरवण्याची क्षमता जरी वाढली तरीही आरोग्यावर होणारे परिणाम अधिक वाढतील, मॉरटॅलीटी रेट अधिक वाढले असे होत नाही. सार्स या कुटुंबातील विषाणू जे मोस्टली श्वसनाचे आजार पसरवतात, त्याच्यामध्ये म्युटेशन होणे ही अत्यंत नैसर्गिक आणि कॉमन बाब असल्यामुळे कोरोना विषाणूचा नवीन संकरित अवतार आला तरी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. विषाणू इव्हॉल्व्ह होत जाणे हा त्याच्या लाईफसायकलचा भाग आहे.

# जिल्हा आरोग्य यंत्रणेने नॉन कोविड रुग्णसेवेकडे लक्ष देण्याचे आरोग्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागातील पदभरतीसाठीची प्रक्रिया जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण करावी. राज्यात कोरोना रुग्णांची संख्या नियंत्रणात येत असून सार्वजनिक आरोग्य यंत्रणेने नॉन कोविड रुग्णांच्या सेवेकडे लक्ष द्यावे. सेवेचा दर्जा उंचावतानाच सौजन्यपूर्ण वागणूक सामान्यांना द्यावी. आरोग्य विभागाच्या महत्वाच्या योजनांच्या माहितीचा फलक प्रत्येक ग्रामपंचायतीवर लावावा. दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करावी, असे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. या वर्षात नागरिकांसह आरोग्य यंत्रणा कोरोनाशी यशस्वी लढा देत आहे. कोरोना नियंत्रणात असला तरी त्यासाठीचे नियम पाळणे आवश्यक आहे. नवीन वर्ष सर्वांना आरोग्यदायी आणि कोरोनामुक्त जावो अशा शुभेच्छा आरोग्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. विभागातील पदभरतीला गती मिळावी यासाठी आरोग्यमंत्र्यांनी राज्यातील विभागीय आयुक्त, मागासवर्ग कक्षाचे अधिकारी, आरोग्य उपसंचालक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधत आढावा घेतला. यावेळी आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ.प्रदिप व्यास, आयुक्त डॉ. रामास्वामी, संचालक डॉ.साधना तायडे, डॉ.अर्चना पाटील, सह आयुक्त डॉ.सतीश पवार आदी यावेळी उपस्थित होते.

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला आरोग्यमंत्र्यांनी ही बैठक घेत यंत्रणेला अधिक सक्षमपणे आणि सेवेचा दर्जा उंचावण्याचे आवाहन केले. कोरोना काळात सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचे काम चांगले झाले असून आता राज्यात कोरोना स्थिती नियंत्रणात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य यंत्रणेने नॉन कोविड रुग्णसेवेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. अनेक दिवसांपासून मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत त्या तातडीने कराव्यात. मोबाईल सर्जिकल युनिट सुरु करावे, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. आरोग्यविषयक राष्ट्रीय कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज असून राज्य आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांसाठी संनियंत्रणाची प्रणाली विकसित करावी. जेणेकरुन प्रत्येक अधिकाऱ्याचे कार्यमूल्यमापन करता येईल. यासाठी संगणक प्रणाली तयार करण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले. आरोग्य विभागाच्या योजनांची माहिती सामान्यांना व्हावी यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आणि गावातील मुख्य चौकात माहितीचे मोठे फलक लावण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचा प्रभावीपणे प्रचार आणि प्रसिद्धी करावी. त्याचबरोबर या योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात एक रुग्णालय सहभागी होईल यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्रयत्न करावे, असे त्यांनी सांगितले. दिव्यांगांना प्रमाणपत्र देताना त्याची प्रक्रिया अधिक सुलभ करावी. हे प्रमाणपत्र शक्य झाल्यास ग्रामीण रुग्णालय आणि उप जिल्हा रुग्णालय स्तरावर देण्यासाठी प्रयत्न करावेत. दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मानसिक आणि शारीरिक त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी जिल्हा आरोग्य यंत्रणेला दिले. राज्यातील आरोग्य संस्थांचे अर्धवट बांधकाम पूर्ण करण्यावर भर दिला जात असून जिल्हा यंत्रणेने सार्वजनिक आरोग्य संस्थेतील स्वच्छता, परिसर स्वच्छता, भोजनाचा दर्जा याकडे विशेष लक्ष देऊन सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचा चेहरा बदलण्याचे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# आल्पवयीन मुलींना वेश्या व्यवसायास जुंपणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## एमआयडीसी पोलिसांची उत्कृष्ठ कामगिरी

**लातूर/शंकर सोनवणे**

आल्पवयीन मुलीस प्रेमाचा जाळ्यात ओढून तिला वेश्या व्यवसायासाठी कला केंद्रात विक्री केल्याची धक्कादायक घटना लातरच्या एमआयडीसी पोलिस ठाणे हाद्दीतील पाच नंबर चौक परीसरात घडली आहे. या प्रकरणी पडीत मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करून अल्पवयीन मुलीली वेश्या व्यवसायास जुंपणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करीत आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की,लातूर शहरातील पाच नंबर चौक परिसरात एक अल्पवयीन मुलगी वास्तव्यात होती. येथेच एका बांधकामावर मजूर म्हणून काम करीत असलेल्या १७ वर्षीय तरुणाने या मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. एकमेकांनी प्रेमाच्या आणाभाका घेत लग्न करणयाचा निश्चय केला. पण मुलीच्या घरातील लोकांचा विरोध होईल म्हणुन मुलाने पळून जाण्याची कल्पना आखली. कालांतराने या मुलीला पळून जाण्यासाठी तयार केल्यानंतर दोघांनी लातुरातून पळून जाण्याचा निर्णय घेतला. मुलीला सोबत घेऊन प्रियकराने तिला याच परिसरातील एका महिलेच्या हवाली केले. ही महिला मुलीच्या प्रियकराची आई होती. दोन दिवस मुलगी येथे राहिल्यानंतर या महिलेने तिची रवानगी थेट उस्मानाबादच्या 'संस्कृती कला केंद्रात केली. येथे काही दिवस राहिल्यानंतर या कला केंद्रावरील महिलेने मुलीचे आधार कार्ड तपासले असता ती अल्पवयीन असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे सदर मुलीला उस्मानाबादहून परत पुन्हा लातुरात पाठवण्यात आले.

उस्मानाबाद येथून आल्यानंतर या मुलीला काही दिवसातच पुन्हा अंबाजोगाई येथील एका कला केंद्रात विकण्यात आले. ज्या महीलेकडे विकण्यात आले ती महिला देह व्यापारात गुंतलेली आसून ती वेश्या व्यवसायासाठी मुली पुरविण्याचे काम करते. त्यामुळे या मुलीची खरेदीही वेश्याव्यवसायासाठी करण्यात आली. प्रेमाच्या जाळ्यात ओढून या मुलीला वेश्याव्यवसायात उतरवल्यानंतर तिच्यावर दोघांनी बलात्कार केला. देह व्यापाराच्या कचाट्यात अडकलेल्या या मुलीस बाहेर काढणे कठीण असतानाच, इकडे मुलीच्या काकाने एमआयडीसी पोलीसात मुलगी हरवल्याची तक्रार दाखल केली. प्रियकरावर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी या प्रियकराचा शोध घेतला असता, तो लातूरचा आढळून आला. त्याला ताब्यात घेताच, अंबाजोगाई येथील एका महिलेने सदर मुलीला लातुरात, एमआयडीसी पोलिसांच्या हद्दीत आणून सोडले. पोलिसांनी पीडित मुलीस ताब्यात घेऊन चौकशी केली असता, हा सर्व प्रकार समोर आला. पीडीत आल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फि र्यादिवरून एमआयडीसी पोलिसांनी या संदर्भात तातडीने गुरन ५१२/२० कलम ३६६ अ, ३७०,३७६ (२) ( जे) ५०६,३४ भांदवी व बाल लैंगिक अत्याचार अधिनियम कलम ३ अ, ४,६ अन्वये गुन्हा दाखल केला. जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलिस अधिक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी तपासाचे चक्र गतीमान करून पोलिसांचे एक पथक तयार केली. या पथकाने उस्मानाबादच्या संस्कृती कला केंद्रातील दोघांना तर अंबाजोगाई येथील दोन महिलांसह व बलात्कार करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली आहे. यातील प्रियकराची आई वगळता अन्य सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील वेश्या व्यवसायासाठी मूली पूरवणाऱ्या दलाल महीलांची कसून चौकशी सुरू केली असून चमडीच्या दलालीचे मोठे रॉकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.याप्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजीव मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणेश कदम हे करीत आहेत.

# क्षत्रिय मराठा तालुका प्रमुखपदी नवनाथ भोसले



**औसा/प्रतिनिधी**

क्षत्रिय मराठा सेघटनेची औसा तालुका कार्यकारणी नुकतीच जाही करण्यात आल असून औया तालुका प्रमुखपदी नवनाथ भोसले तर औसा शहरप्रमुखपदी बळी पवार यांची एकमुखाने निवड करण्यात आली. यावेळी क्षत्रिय मराठा संघटनंचे जिल्हाप्रमुख गणेश भाऊ माडजे, नवनाथ भोसले, शाहजी पाटील, बळी पवार अदी मान्यवर उपस्थित होते. नियुक्तीचे पत्र क्षत्रिय मराठा जिल्हाप्रमुख गणेश भाऊ माडजे यांच्या हास्ते प्रदान करण्यात आले. या वेळी नुतन पदाधिकारी व जिल्हाप्रमुखांचा समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. नवनाथ भोसले यांची औसा तालुका प्रमुख पदी व बळी पवार यांची औसा शहरप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल औसा तालुक्यासह औसा शहरात सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी क्षत्रिय मराठा जिल्हाप्रमुख गणेश भाऊ माडजे, नवनाथ भोसले व ईतर जणांनी आपले मनोगत व्यक्त केले. येणाऱ्या काळात मराठा समाजाचे काम जोमाने करून न्याय हक्कासाठी सदैव तत्पर राहणार आशी ग्वाही नुतन तालुका प्रमुख नवनाथ भोसले यांनी दिली.

# शक्ती फौजदारी कायद्यातील सुधारणांसाठी महिला संघटना, तज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्थांना सूचना करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात लागू असलेल्या लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण या अधिनियमात सुधारणा करण्याकरिता विधेयकातील विषयांमध्ये स्वारस्य असलेल्या व्यक्तींकडून (महिला संघटना, स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रातील विधिज्ञ) सुधारणा अथवा सूचना मागविण्यात येणार असून त्यानुसार इच्छूकांनी आपल्या सुधारणा व सूचना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्याचे आवाहन विधानमंडळाचे सचिव राजेन्द्र भागवत यांनी केले आहे. सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक गृह मंत्री तथा समितीचे प्रमुख अनिल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले आहे. या विधेयकातील विषयांमध्ये स्वारस्य असलेल्या व्यक्तींकडून (महिला संघटना, स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रातील विधिज्ञ) सुधारणा, सूचना मागविण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. त्यानुसार ज्या व्यक्ती सुधारणा, सूचना पाठवू इच्छितात त्यांनी आपल्या सुधारणा/ सूचना तीन प्रतीमध्ये निवेदनाच्या स्वरुपात महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे शुक्रवार, दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत राजेन्द्र भागवत, सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे पाठवाव्यात किंवा al.assembly. mlsgmail.com या इमेलवर पाठविण्यात याव्यात, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकान्वये करण्यात आले आहे. विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय ग्रंथागार, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर आणि व्यवस्थापक, प्रकाशने, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४ यांचेकडे विक्रीसाठी तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.



# कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक जयस्तंभास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिवादन!

पुणे : कोरेगाव भीमा येथील जयस्तंभास अभिवादन करुन त्या ऐतिहासिक लढाईतील वीरांच्या स्मृतींना उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आदरांजली वाहिली आहे. कोरेगाव भीमा जयस्तंभास अभिवादन करण्यासाठी दरवर्षी येणाऱ्या नागरिकांच्या भावनांबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी आदर व्यक्त केला आहे. मात्र कोरोनाच्या संकटामुळे यंदा सर्वांनी आपापल्या घरुनच जयस्तंभाला व शूरवीरांना अभिवादन करावे. कोरोनासंसर्ग रोखण्यासाठी प्रशासनाने केलेल्या सूचना व नियमांचे पालन करावे, असे आवाहनही अजित पवार यांनी केले आहे.

# चोरी गेलेली स्विफ्ट कार स्थानिक गुन्हे शाखेने काढली शोधून!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर येथील सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आढळून आलेल्या संशयित स्विफ्ट कारचा तपास करून सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणली आहे. ती कार कोथरूड येथून चोरून आणल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी सागर उर्फ अभिजित धानप्पा सोलापुरे यास सोलापूर ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक सोलापूर ते हैदराबाद रस्त्यावर गस्त घालत असताना सोलापूर येथील सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात एका स्विफ्ट कारचा नंबर संशयास्पद वाटल्याने जवळ जाऊन स्विफ्ट कारच्या चालकाकडे चौकशी केली असता त्याने सदर कारची कागदपत्रे नसल्याचे सांगितले. तसेच त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यास स्विफ्ट कारसह ताब्यात घेण्यात आली आहे, त्याची अधिक विश्वासात घेऊन चौकशी केली असता कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून स्विफ्ट कार (एमएच १२ जेसी ८२३०) चोरी केल्याची कबुली दिली आहे. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने कोथरूड पोलीस ठाण्याकडे संपर्क केला असून, सदरची स्विफ्ट कारही कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ७ जानेवारी २०१८ रोजी सहा वाजता यातील फिर्यादी हे दुकान बंद करून त्यांच्या ताब्यातील स्विफ्ट कार क्रमांक एमएच १२ जेसी ८२३० ही त्यांच्या राहत्या बिल्डिंग समोर रस्त्यावर उभे करून घरात गेले होते. ते ८ जानेवारी २०१८ रोजी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास त्यांची कार चोरीस गेली असल्याचे लक्षात आल्यावरून त्यांनी चोरीबाबत फिर्याद दाखल केली होती. त्याबाबत कोथरूड पोलीस ठाण्यात गुरनं १०/२०१८ भादंविक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे माहिती मिळाली आहे. स्विफ्ट कार व संशयित व्यक्तीस संबंधित पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्याची कार्यवाही उशिरापर्यंत सुरू होती. ही सदर कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, शिवाजी घोळवे, पोलीस हवालदार प्रकाश कारटकर, नारायण गोलेकर, राजेश गायकवाड, धनाजी गाडे, पोलीस कॉन्स्टेबल धनराज गायकवाड, अक्षय दळवी आदींनी केली आहे.

# मित्र नगर भागात पालकमंत्र्यांच्या हस्ते विकास कामांचा शुभारंभ

**लातूर** : लातूर शहरातील मित्र नगर भागात लातूर शहर महानगपालिकेकडून सुरू करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचा शुभारंभ राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आज शुक्रवार दिनांक १ जानेवारी रोजी सायंकाळी करण्यात आला. यावेळी महापौर विक्रांत गोजमगुंडे, आयुक्त देविदास टेकाळे, अशोक गोविंदपुरकर, मोईज शेख, किरण जाधव, अभय साळुंके, सपना किसवे, गोरोबा लोखंडे, असिफ बागवान, कुणाल वांगज, तबरेज तांबोळी,रविशंकर जाधव, सुंदर पाटील, संजय ओहोळ, महेश काळे, मनपाचे थोरात यांच्यासह मित्र नगर भागातील व्यावसायिक, नागरिक उपस्थित होते.


PUBLIC WORKS DEPARTMENT PWD MAHARASHTRA

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**ठाणे विघुत विभाग, सा.बां. विभाग, सा. बां. परिसर,**
**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) पिन कोड-४०० ६०१.**

दूरध्वनी क्र : (०२२) २५३३ ३१४४ / (०२२) २५३० ४५१४
वेबसाइट : www.mahapwd.com ई-मेल : elthane.ee@mahapwd.com
जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-१/२७३९/सन २०२० दिनांक २४ डिसेंबर २०२०

**निविदा सूचना क्र. ३८ सन २०२०-२०२१**

**संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८**

**कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४** हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता **ब-१** नमुन्यातील टक्केवारी दर (Pereentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीव्दारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **https://mahatenders.gov.in** येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रुपये | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Estimate No. KESD/OW/Corona/ Dapchari/ 463/2020-21.Providing Renovation of Internal Electrical Installation For isolation ward of Quarantine patients due to COVID-19 CORONA at Boys Hostel of Industrial Training Institute, Jawhar, Tal. Jawhar, Dist. Palghar. | रु. ७,४८,००१/- | दिनांक ०५/०१/२०२१ वाजेपासून दिनांक १९/०१/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ड व त्यावरील नोंदणीकृत विघुत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. ७,५००/- निविदा शुक्ल रु. ५००/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक २३/०१/२०२१ सकाळी ११.०० |
| ०२ | Est. No. OW/TESD/TRS/230/ of 2020 Providing Airconditioning split wall mounting type in VIP Suit (old Vaitarna Surya) on ground at Govt. Rest House Palghar. | रु. ३,४९,६३०/- | दिनांक ०५/०१/२०२१ वाजेपासून दिनांक १९/०१/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ड व त्यावरील नोंदणीकृत विघुत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. ३,५००/- निविदा शुक्ल रु. ५००/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक २३/०१/२०२१ सकाळी ११.०० |
| ०३ | Est no : OW/TESD/TRS /1321/2019-20 Providing internal Electrical Installation, Computer wiring LAN & Teliphone Exchange Facility with alied cabling Accessories, split type Aircondtioning units in server room, pump at Newly Bandhakam Bhawan Building Bhoisar Road Palghar. | रु. ३१,२६,६९८/- | दिनांक ०५/०१/२०२१ वाजेपासून दिनांक १९/०१/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-अ नोंदणीकृत विघुत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. ३१,३००/- निविदा शुक्ल रु. ५००/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक २३/०१/२०२१ सकाळी ११.०० |
| ०४ | Est.no.OW/TESD/TRS/5196/2018-19 (R evised-2020) Providin Electrical Installation, street light, wall mounting, Gate Light fitting, Switchgears and protection, water pumps in Aurogypathak, primises, Assistant professor (AP) shifted in the Building (G+1) of Boys Hostel Tal. Palghar, Dist. Palghar.el Tal-Palghar, Dist. Palghar. | रु. १८,०४,४५०/- | दिनांक ०५/०१/२०२१ वाजेपासून दिनांक १९/०१/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ब त्यावरील नोंदणीकृत विघुत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु. १८,१००/- निविदा शुक्ल रु. ५००/- अधीक वस्तु व सेवा कर | दिनांक २३/०१/२०२१ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https:// mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, सा.बा. परिसर,ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सुचना फलक.
४. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये योग्य त्या वर्गातील नोंदणीधारक (वर्ग -अ) विघुत अनुज्ञाप्तीधारक ठेकेदार तत्सत काम यशस्वीपणे पुर्ण केलेले अनुभवी कंत्राटदार वरील नोंदीप्रमाणे ई-निविदा सादर करु शकतात.

सही/-
**(प्र.अ. दोडे)**
कार्यकारी अभियंता (विघुत)
ठाणे विघुत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

**विमाका/कोवि/२०२०-२०२१/१४३**

04 JAN TO 10 JAN 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 02/01/2021 9:26 PM Page 1



पान १ वरून....

## बाईलवेडा विवाहितेच्या मागे लागून...

रुपाकडे खिळून रहात असे. वास्तविक कंगना एक विवाहिता होती. तिला पतीरुपी समाजमान्य कुंपण लाभले होते. मात्र त्या कुंपणापलीकडून दिपकची भिरभिरती नजर कंगनाच्या रुपाचा ठाव घेत होती. काही फळे खुप उंच असतात. ती फळे सहजासहजी कुणाच्या हाती लागत नसतात. उंचावरील फळे बुद्धीच्या वापराने हस्तगत करावी लागतात हे दिपक जाणून होता. कंगनारुपी सौंदर्याचे फळ आपल्या सहज हाती कसे लागेल याचाच विचार दिपक मनाशी करत असे. एके दिवशी कंगना रामप्रहरी स्नानसंध्या अर्थात अंघोळ करत होती. ग्रामीण भाग म्हटला म्हणजे तेथील बाथरुम कमी अधिक प्रमाणात उघडे असतात. कंगनाच्या दिनचर्येचा आणि जिवनशैलीचा दांडगा अभ्यास असलेल्या दिपकने तिच्या अंघोळीचा प्रसंग आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपला. ती स्नानसंध्या करत असतांना अचानक दिपकची भिरभिरती नजर तिच्याकडे गेली. त्यामुळे त्याने क्षणाचाही विलंब न करता तिच्या अंघोळीचा क्षण टिपण्यात त्याने अजिबात वेळ दवडला नाही. बस.. हा व्हिडीओ म्हणजे आपल्यासाठी हुंडी नाही तर बेअरर चेक झाला असे मनातल्या मनात म्हणत त्याने सुखद अनुभव घेतला. गावातील दिपक आपल्या रुपावर कायम नजर ठेवून असल्याचे एव्हाना कंगनाच्या लक्षात आले होते. सुरुवातीला स्मित हास्य करुन तिच्यासमोरुन जाणारा दिपक आता भलताच डेअरिंगबाज झाला होता. तो तिच्याशी खुले आम बोलू लागला. बोलता बोलता त्याने तिला त्या व्हिडीओ बाबत देखील सांगण्याचे काम पुर्ण केले. आपला अंघोळीचा प्रसंग त्याने मोबाईलमध्ये कैद केला असल्याचे समजताच ती काही वेळ विचारमग्न झाली. हा व्हिडीओ व्हारयरल करण्याची गर्भित धमकी त्याने तिला दिली होती. त्यामुळे तिला त्याच्यासोबत बोलणे भाग पडत होते. त्या व्हिडीओची टांगती तलवार त्याने तिच्या डोक्यावर ठेवली होती. त्यामुळे हसतमुखाने परंतू नाईलाजाने ती त्याच्याशी संभाषण करत होती. दिपकचे गावातील कंगनासोबत हसणे खिदळणे बघून त्याचे वडील भगवान सपकाळे यांना शंका आली होती. भगवान सपकाळे यांनी काळाची पावले ओळखून आपल्या मुलाला सावध केले. त्यांनी आपल्या मुलात झालेला बदल लक्षात घेतला. त्यांनी त्याला वेळीच समज दिली. तुझ्या वागण्यात व बोलण्यात बदल झाल्याचे माझ्या लक्षात आले असून हे योग्य नाही असे भगवान सपकाळे यांनी मुलगा दिपक यास बजावले. मात्र आपल्या वडीलांच्या बोलण्याकडे दिपकने दुर्लक्ष केले. एके दिवशी कंगनाने आपल्या मनातील व्यथा तिच्या पतीजवळ कथन केली. तिने पतीला म्हटले की गावातील दिपक सपकाळे हा मला त्रास देत आहे. त्याने माझ्या नकळत मी अंघोळ करत असतांना एक व्हिडीओ काढला आहे. त्या व्हीडीओच्या बळावर तो मला शरीरसंबंध ठेवू देण्यास सक्ती करत आहे. तसे केले नाही तर तो अंघोळीचा व्हिडीओ व्हायरल करण्याची व पर्यायाने बदनामीची भिती दाखवत आहे. आपल्या पत्नीचा अंघोळ करतांना तयार केलेला व्हिडीओ गावातील दिपकजवळ असल्याचे समजताच कंगनाच्या पतीला राग आला. मात्र त्याने हा राग व्यक्त केला नाही. त्याने काही प्रमाणात बुद्धीचा वापर करत पत्नीला एक सल्ला दिला. त्याने पत्नी कंगनाला म्हटले की तु मुद्दाम गावातील दिपकसोबत प्रेमाचे नाटक सुरु ठेव. त्याला व्हिडीओ व्हायरल करण्यापासून थोपवून ठेव. पतीने दिलेल्या सल्ल्यानुसार कंगना त्या दिवसापासून दिपकसोबत गोड बोलू लागली. ती त्याच्यासोबत प्रेमाचे नाटक करु लागली. रस्त्यात दिपक दिसला म्हणजे त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलू लागली. हा प्रकार दिपकच्या वडीलांच्या लक्षात आला. त्यांनी मुलगा दिपक यास वेळीच सावध केले. बेटा तुझे हे वागणे बरे नव्हे असे भगवान सपकाळे यांनी मुलगा दिपक यास समजावून सांगीतले. मात्र दिपकने वडीलांच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. त्याने डेअरींग करत विवाहित कंगनासोबत खुलेआम बोलणे सुरुच ठेवले. आपल्या मुलाची पावले चुकीच्या दिशेने पडत असल्याचे भगवान सपकाळे यांच्या लक्षात आले होते. दिपकला जाळ्यात अडकवण्यासाठी कंगनाच्या पतीने रचलेला तो एक सापळा होता. दिपकला एकटे गाठून कायमची अद्दल घडवण्याचे नियोजन कंगनाच्या पतीने मनाशी केले होते. मात्र दिपक एकटा सापडत नव्हता. दरम्यानच्या काळात पतीच्या सल्ल्यानुसार दिपकसोबत प्रेमाचे नाटक पार पाडत होती. ती त्याला स्माईल देत प्रेमाचे नाटक करतच होती. विवाहीत कंगनाचा दिवाना झालेला दिपक मात्र हवेत उडत होता. आपल्याजवळ कंगनाचा व्हिडीओ म्हणजे जणू काही बेअरर चेक असल्याच्या थाटात तो वावरत होता. आपण केव्हाही संधी साधून तिचा उपभोग घेवू शकतो असे त्याला वाटत होते. मात्र काही फळे ही खुप उंचावर असतात. ती फळे तोडण्यासाठी हात पुरत नसतो. दगड मारला तर नेम बसत नाही. नेम बसला तरी तुटत नाही अशी अवस्था या उंचावरील फळांची असते. चढाई केली तर तोल जावून पडून जखमी होण्याची देखील भिती असते. दरम्यानच्या काळात पतीच्या सल्ल्यानुसार कंगना स्माईलवर काम भागवून दिपकसोबत प्रेमाचे नाटक करत होती. त्याला एकटे गाठून जिवे ठार करण्याचे नियोजन कंगनाचा पती करत होता. मात्र तो एकटा सापडत नव्हता. सरत्या २०२० या वर्षात २७ डिसेंबर रोजी कंगनाच्या माहेरी यावल तालुक्यातील एका नातेवाईक तरुणाचे लग्न होते. त्या लग्नाला हजेरी लावण्यासाठी एक दिवस अगोदर २६ डिसेंबर रोजी कंगना पतीसोबत दुचाकीवर डबलसीट बसून आली होती. दिपक मात्र कंगनाला आपली प्रेयसी समजत होता. आपली प्रेयसी माहेरी गेल्याचे दिपकला माहिती होते. कंगनाला त्रास देणाऱ्या दिपकला अद्दल घडवण्याची मोहीम कंगनाचा पती मनातल्या मनात आखत होता. त्याने मनातील नियोजन आणि खदखद सासरी दोघा शालकांजवळ कथन केली. कंगनाचा पती व दोघे शालक अशा तिघांनी मिळून दिपकचा गेम करण्याचे नियोजन केले. कंगनाच्या माध्यमातून दिपकला एकटेच मध्यरात्री बोलावून त्याला या जगातून कायमचे हद्दपार करण्याचा प्लान तिघांनी आखला. कंगनाच्या पतीने तिला तसे समजावून सांगीतले. त्यानुसार तिने तिच्या भावाच्या मोबाईलवरुन सायंकाळी सात वाजता दिपक यास फोन केला. रात्री अकरा वाजेनंतर तिने त्याला भेटण्यास बोलावले. कंगनाने तिच्या माहेरी केवळ आपल्याला व ते देखील रात्रीच्या वेळी बोलावल्याचे ऐकून दिपक मनोमन खुश झाला. आता ती आपल्याला संधी साधून शरीरसुख देणार या विचारानेच दिपक मनोमन खुश झाला. मात्र आपले वडील भगवान सपकाळे मध्यरात्री आपल्याला घराबाहेर जावू देणार नाही याची देखील दिपकला जाणीव होती. त्यामुळे यातून मार्ग कसा काढायचा याबाबत त्याने विचार सुरु केला. याकामी त्याने त्याचा जवळचा मित्र यज्ञेश सुर्वे यास हाताशी धरले. त्याने यज्ञेश यास एक कानमंत्र दिला. त्या कानमंत्रानुसार यज्ञेश रात्री ठिक आठ वाजता दिपकच्या घरी धापा टाकत टाकत आला. अगोदरच ठरल्यानुसार यज्ञेश याने दिपक यास खोटे खोटे सांगीतले की माझ्या मित्राच्या वडिलांचा अपघात झाला असून त्यांना पाहण्यासाठी आपल्याला तात्काळ जायचे आहे. खोटा अपघात व तो देखील रात्रीच्या वेळी झाला असल्याचे यज्ञेश याने सांगीतल्यामुळे दिपकच्या वडीलांनी त्याला यज्ञेशसोबत जावू दिले. अशा प्रकारे दिपकने यज्ञेशच्या मदतीने घरातून वडीलांच्या तावडीतून सुटका करुन घेतली. आज आपल्याला कंगनासोबत सुख घेण्याची संधी मिळणार या विचारानेच तो मनातल्या मनात खुश होता. मात्र पुढे नियतीने काय वाढून ठेवले आहे हे त्याला माहीतीच नव्हते. यज्ञेशच्या मदतीने खोटे बोलून दिपक घरातून बाहेर पडला. त्याने यज्ञेशला दुचाकीवर सोबत घेत अगोदर मस्कावद या गावी नेले. मस्कावद येथे गेल्यावर दिपकने त्याचा मित्र प्रशांत तायडे याला देखील सोबत घेतले. अशा प्रकारे तिघे मित्र एकत्र आल्यानंतर दिपकने आपल्या मनातील खरी गोष्ट दोघांजवळ कथन केली. दिपकने दुचाकीवरील दोघा मित्रांना सांगितले की माझे गावातील कंगनावर प्रेम असून ती आता तिच्या माहेरी गेली आहे. तिने मला तिच्या माहेरी बोलावले आहे. अशा प्रकारे बोलत बोलत तिघे मित्र सावदा या गावी आले. सावदा येथे दिपकने दुचाकीत पेट्रोल भरले. कंगनाचा पुन्हा फोन येण्याची दिपक वाट बघत होता. तोवर दिपकने सोबतच्या दोघा मित्रांना कंगनाच्या माहेरी असलेल्या एका मित्राच्या जिमवर नेले. त्याचवेळी दिपक यास कंगनाचा फोन आला. दिपकच्या मोबाईलवर पलीकडून कंगनाचा फोन येताच दिपक मनातून हुरळून गेला. मात्र पलीकडून कंगनाने त्याला सांगितले की माझा भाऊ अजून घरीच आहे. तुम्ही परत घरी निघून जा. फोनवरील कंगनाचे बोलणे ऐकून इकडे दिपकचे मन उदास झाले. मोठ्या उत्साहाने स्फुर्ती घेवून तो इथपर्यंत कसाबसा आला होता. चौफेर उधळलेला दिपकचा अश्व परतीच्या मार्गाला जाण्याची तयारी करु लागला. पलीकडून कंगनाचा नकारात्मक सुर ऐकून दिपक नाराज झाला. मात्र ही कंगना व तिच्या पतीसह भावांची एक खेळी होती. नाराज झालेला दिपक दोघा मित्रांसह परतीच्या मार्गाला लागला असतांना वाटेत कंगनाचा त्याला पुन्हा फोन आला. तिने पलीकडून त्याला म्हटले की तुम्ही मागे या. आता पुन्हा बोलावणे आल्यावर दिपकचा वारु पुन्हा उधळला. तो मनातल्या मनात पुन्हा एकवेळ खुश झाला. त्याने सोबतच्या दोघा मित्रांना दुचाकीवरुन वाटेत खाली उतरवून दिले. दिपकने प्रशांतच्या फोनवरुन कंगनाला फोन केला. त्याने तिला दहा मिनीटात येतो असे म्हणत तयार राहण्यास सांगीतले. दिपक आता एकटाच दुचाकीने तिच्या माहेरी जाण्यास निघाले. दरम्यान त्याचे दोघे मित्र यज्ञेश व प्रशांत त्याची वाट बघत रस्त्यात अंधारात चाचपडत बसून राहिले. दिपक दहा मिनीटात येत असल्याचे नक्की झाल्यानंतर इकडे कंगनासह तिचा पती व दोघे भाऊ दिपकचा गेम करण्यासाठी सतर्क झाले. कंगनाचा पती व दोघे भाऊ असे तिघे जण खोलीत लाईट बंद करुन लपून बसले. कंगना घराच्या बाहेर एकटीच उभी राहीली. कंगना घराबाहेर एकटीच उभी असल्याचे बघून दिपकच्या मनात खुश झाला. आता कंगनाला भोगण्याची संधी मिळणार असे त्याला वाटले. मात्र ही त्याची फसवणूक होती. कंगनाने दिपकला घरात जाण्याचा इशारा केला. दिपक आत जाताच कंगनाने घराचा दरवाजा बाहेरुन बंद करुन घेतला. कंगना बाहेर असतांना आत लपून बसलेल्या कंगनाच्या पती व दोघा भावांनी तयारीनिशी दिपकला पकडले. दिपक व त्याच्या शालकाने दिपकच्या गळ्यात सुती दोर टाकला. दोराचे एक टोक दिपकने व दुसरे टोक मोठ्या शालकाने आवळण्यास सुरुवात केली. मात्र तो दोर सुटून गेला. दोर सुटल्यामुळे तिघांनी दिपकच्या अंगावर गोधडी टाकून त्याला मारण्याची तयारी सुरु केली. गोधडीखाली श्वास गुदमरल्यामुळे दिपकने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. दिपकने आरडाओरड करु नये म्हणून कंगनाच्या पतीने त्याच्या डोक्यात तिन वेळा कु-हाड मारली. तिन वेळा कु-हाडीचे घाव बसल्यामुळे दिपक जागीच भान हरपून बेशुद्ध झाला. त्यानंतर कंगनाच्या पतीने चाकू बाहेर काढला. तो चाकू त्याने दिपकच्या गळ्यावर दोन वेळा चालवला. त्यानंतर तो चाकू त्याने गळ्यात खुपसूनच दिला. या सर्व थरारक प्रसंगानंतर दिपकचे जिवंत राहणे शक्यच नव्हते. तो रक्तबंबाळ होवून कोसळला होता. त्याने स्वत:हून मृत्यूच्या दिशेने वाटचाल केली होती. कंगनाच्या पतीने कंगनाला दार उघडण्यास सांगितले. दार उघडल्यानंतर तो बाहेर आला. त्याने बाहेरुन एक पोते, सिमेंटचे तिन पोते व एक प्लास्टीकचा काळा कागद आणला. दिपकचा मृतदेह पोत्यात टाकण्यात आला. मात्र दिपकच्या शरीरातून सुरु असलेला रक्त प्रवाह थांबण्याचे नाव घेत नव्हता. त्याच्या रक्ताचा प्रवाह कसाही करुन थांबवण्यासाठी पोत्यांसह गोधड्यांचा वापर करण्यात आला. कसेबसे घरात पसरलेले रक्त कपड्याने पुसून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर रातोरात गाते या गावी लावलेली ओमनी कार आणली गेली. त्या ओमनी गाडीत प्लास्टीकचा काळा कागद अंथरुन दिपकचा मृतदेह ठेवण्यात आला. कंगनाचा पती व त्याचा मोठा शालक असे दोघे जण व्हॅनमधे बसले. लहान अल्पवयीन शालकाने दिपकने आणलेली मोटार सायकल ताब्यात घेतली. त्यावेळी रात्रीचा पाऊन वाजला होता. दिपकचा मृतदेह एखाद्या रेल्वे लाईनवर टाकून द्यायचा व तेथेच त्याची मोटार सायकल उभी करुन द्यायची असे सर्वाचे नियोजन होते. दिपकने दुचाकीवर येवून धावत्या रेल्वेखाली आत्महत्या केल्याचा देखावा निर्माण करण्याचे त्यांनी नियोजन सुरु केले होते. दरम्यान इकडे दिपकसोबत आलेले त्याचे दोघे मित्र यज्ञेश सुर्वे आणि प्रशांत तायडे कंटाळून गेले होते. दोघे जण दिपक परत येण्याची वाट बघत बसले होते. बराच वेळ झाला तरी दिपक परत येत नसल्यामुळे त्यांनी दिपकला फोन लावला असता तो बंद येत होता. त्यामुळे रात्री एक वाजता त्यांनी थेट कंगनाला फोन लावला असता पलीकडून कुणीतरी फोन उचलला. त्याने फोनवर सांगितले की आम्ही जळगावला जात आहोत तुम्ही परत निघून जा. अखेर यज्ञेश सुर्वे याने त्याच्या भावाला फोन लावला व घरुन दुचाकी मागवून घेतली. यज्ञेशच्या भावाने त्याच्या मित्रासह गाडीवर येवून कंटाळलेल्या यज्ञेश व प्रशांत या दोघांना गाठले. अशा प्रकारे चौघे मित्र एकाच मोटार सायकलवर बसून घरी परत गेले. दरम्यान दिपकचा मृतदेह ओमनीद्वारे घेवून कंगनाचा पती व त्याचा मोठा शालक असे दोघे जण निघाले होते. दिपकने सोबत आणलेली दुचाकी घेवून कंगनाचा लहान अल्पवयीन भाऊ रात्रीच्या वेळी निघाला होता. पुढे पुढे ओमनी व त्यामागे मोटार सायकलवर कंगनाचा लहान भाऊ अशा पद्धतीने सर्वजण दिपकच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी निघाले. महामार्गावरील जळगाव खुर्द फाट्यावरील रेल्वे उड्डानपुलाजवळ दिपकचा मृतदेह आणला गेला. तेथेच त्याचा मृतदेह खाली उतरवण्यात आला. दिपकच्या खिशातील मोबाईल आवर्जून काढून घेण्यात आला. त्याला गुंडाळलेली गोधडी व पोते देखील काढून घेण्यात आले. त्यावेळी रात्रीचा दिड वाजून गेला होता. त्यावेळी भुसावळ कडून जळगावच्या दिशेने कोणतीतरी भरधाव ट्रेन त्यांना येतांना दिसली. ट्रेन येत असल्याचे दिसताच तिघांनी मिळून दिपकचा मृतदेह रेल्वे लाईनवर घाईघाईत ठेवण्यात आला. ट्रेन तेथून जाण्यापुर्वीच तिघे जण पटकन बाजूला उभे राहिले. भरधाव ट्रेनखाली दिपकचा मृतदेह चिरडला गेला. त्यात दिपकचा उजवा हात व उजवा पाय कापला गेला. कंगनाच्या अल्पवयीन भावाने चालवत आणलेली दिपकची मोटारसायकल तेथेच झाडाझुडूपात लावून देण्यात आली. अशा प्रकारे दिपकने मोटारसायकलने येवून धावत्या रेल्वेखाली आत्महत्या केल्याचा बनाव करण्यात आला. त्यानंतर सर्व जण ओमनीने आपल्या घरी यावल तालुक्यात निघून गेले. घरी येतांना वाटेत दिपकला मारण्यासाठी वापरण्यात आलेला चाकू, त्याचा मोबाईल, रक्ताने माखलेली गोधडी व पोते तसेच प्लास्टीकचा कागद अशा सर्व वस्तू तापी नदीच्या पाण्यात फेकून देण्यात आल्या. गाडीच्या आतील बाजूस लागलेले रक्ताचे डाग पुसून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुसऱ्या दिवशी २७ डिसेंबर रोजी सकाळी पाच वाजेच्या सुमारास रेल्वे रुळावर एका तरुणाचा मृतदेह पडून असल्याची माहिती रेल्वे प्रशासनास मिळाली. याप्रकरणी मनोजकुमार वर्मा (उप स्टेशन प्रबंधक भादली रेल्वे स्टेशन) यांनी दिलेल्या खबरीनुसार नशिराबाद पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. सदर नोंद सीआरपीसी १७४ नुसार ३८/२० या क्रमांकाने घेण्यात आली. त्यानंतर लागलीच नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गणेश चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देत मृतदेहावर इंक्वेस्ट पंचनामा केला. मयत दिपक हा पोलिसांसह सर्वाच्या दृष्टीने अनोळखी होता. हा मृतदेह कुणाचा आहे? हा घातपात आहे की आत्महत्या आहे या सर्व बाबींचा उलगडा होणे गरजेचे होते. याप्रकरणी नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गणेश चव्हाण यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केला. जळगाव खुर्द शिवारात रेल्वे ट्रॅक परिसरात मोटरसायकल (एमपी ०९ बीजी ४२६९) काटेरी झाडाझुडपात पोलिस पथकाला आढळून आली. या मोटार सायकलच्या मदतीने पुढील तपासाला दिशा मिळणार होती. पोलिस पथकाने या मोटार सायकलच्या क्रमाकांवरुन तिच्या मुळ मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तपासाअंती ती मोटारसायकल आशिष सुधाकर (रा. इंदोर मध्य प्रदेश) याची असल्याचे निष्पन्न झाले. आशिष सुधाकर याने ती मोटार सायकल अनिल फुटकरे यास दिली होती. अनिल फुटकरे याने ती गाडी गहाण ठेवून नीलेश कोळी यास वापरण्यासाठी दिली होती. पोलीस हवालदार विजय पाटील यांनी निलेश कोळी याची भेट घेत त्याला मयताचा फोटो दाखवला. मयताचा फोटो दाखवल्यानंतर त्याने तो ओळखला. हा फोटो आपला शालक दिपक भगवान सपकाळे याचा असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. दरम्यान रात्री घरातून गेलेला दिपक सकाळपर्यंत घरी परत आला नाही म्हणून त्याचे वडील भगवान सपकाळे हवालदिल झाले होते. दिपक यास रात्री बोलावण्यास आलेल्या यज्ञेश सुर्वे याची त्यांनी चौकशी केली. त्यावेळी यज्ञेश सुर्वे याने त्यांना रात्रीचा सर्व घटनाक्रम कथन केला. त्याने दिलेल्या माहितीनुसार भगवान सपकाळे यांनी कंगनाचे माहेर गाठत तिच्या पतीला विचारपुस केली. तिच्या पतीने त्यांना खोटेच सांगितले की दिपक मला रात्री दहा वाजता पानटपरीवर भेटला होता. मात्र त्यानंतर तो कुठे गेला हे मला माहिती नाही. त्यानंतर कुणातरी तरुणाचा मृतदेह नशिराबाद पोलिस स्टेशन हद्दीत रेल्वे लाईनवर मिळून आला असल्याची माहिती त्यांना समजली. तो तरुण कदाचीत आपला मुलगा असू शकतो असे लक्षात घेत त्यांनी तो मृतदेह पाहण्यासाठी धाव घेतली. तो मृतदेह आपला मुलगा दिपक याचा असल्याची त्यांची खात्री झाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरणकुमार बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली मयत दिपकच्या मोबाईल क्रमांकाचे कॉल डीटेल्स विजय पाटील व नरेंद्र वारुळे यांनी काढण्यास सुरुवात केली. दिपक कुणाकुणाच्या संपर्कात होता हे जाणून घेण्यासाठी सर्व डाटा संकलीत करण्यात आला. कॉल डिटेल्स नुसार मयत दिपक हा सर्वाधिक वेळा संबंधीत विवाहितेसोबत बोलला असल्याचे निष्पन्न झाले. त्याचा शेवटचा मोबाईल बंद होण्यापुर्वी देखील तो तिच्याशीच बोलला असल्याचे तांत्रीक तपासात पुढे आले. या माहितीच्या आधारे पोलिस नशीराबाद पोलिसांच्या पथकाने थेट विवाहित कंगनाचे यावल तालुक्यातील माहेर गाठले. नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गणेश चव्हाण यांनी सर्वप्रथम विवाहितेची चौकशी केली. तिने दिलेल्या माहितीनुसार सर्व घटनाक्रम समोर आला. या प्रकरणी मयत दिपक सपकाळे याचे वडील भगवान रघुनाथ सपकाळे यांनी नशिराबाद पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. सदर फिर्याद भाग ५ गु.र.न. २१५/२० भा.द.वि. ३०२, २०१, १२० ब नुसार दाखल करण्यात आली. या प्रकरणी कंगनासह तिचा पती व दोघा भावांना ( एक अल्पवयीन) ताब्यात घेत अटक करण्यात आली. मयत दिपक भगवान सपकाळे याने विवाहितेचे अंघोळ करतांना चित्रीकरण केले होते. त्या चित्रीकरणाच्या बळावर तो तिला बदनामीचा धाक दाखवून शरीरसंबंध ठेवण्याची इच्छा बाळगत होता. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन गोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सोमनाथ वाकचौरे, नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र साळुखे, प्रवीण ढाके, किरण बाविस्कर, लीना लोखंडे, रवींद्र इंधाटे यांच्यासह स्थानिक गुन्हा शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील नाईक, विजय पाटील, जितेंद्र पाटील, प्रीतम पाटील, नितीन बाविस्कर, राहुल पाटील, राजेंद्र पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, इश्वर चव्हाण, भुसावळ शहर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब ठोंबे आदींनी खुनाचा उलगडा करण्याकामी परिश्रम घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास नशिराबाद पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक गणेश चव्हाण व त्यांचे सहकारी प्रविण ढाके करत आहेत.

पान ८ वरून....

## लातूर शहर मनपा आयोजित 'माझी ...

फिल्म फेस्टीवल लातुरात घेण्याचा सांस्कृतिक विभागाचा मानस असल्याची माहिती ना.अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलताना दिली. पुढे बोलताना ना. अमित विलासराव देशमुख म्हणाले की, या उद्यानात आणखी विद्युत रोषणाई, लहान मुलांना खेळण्यासाठी प्ले जिम्स, फ्लोरा फाऊंटन सुरू करावे अशा सूचना मनपा प्रशासनाला दिल्या. तसेच लातूर शहर मनपा व जिल्हा प्रशासनाने शहराच्या क्षेत्रफळाच्या किमान ३३ टक्के भाग हरित करण्यासाठी कामाला लागावे यासाठी लागणारे सर्व पाठबळ देण्याचे आश्र्वासन दिले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ज्या अपेक्षा लातूर वासियांना आहेत त्या पेक्षाअधिकाधिक काय देता येईल यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे अभिवचन देत उपस्थितांना नवं वर्षाच्या त्यांनी शुभेच्छा दिल्या. कोरोना १९ पासून बचाव यात २०२० वर्ष गेले ज्यात सर्वांनी आपापल्या परीने उत्तम काम केले असल्याचे सांगत २०२१ मध्ये कोरोना लसीकरण मोहीम राबविण्यास प्रयत्नशील असून महविकास आघाडी सर्वतोपरी कटिबद्ध आहे. पाश्र्चात्य देशातील सध्याची कोरोना लाट पाहता येत्या काळात आपल्याला खबरदारी घ्यावी लागेल आणि जोपर्यंत लस येणार नाही तोपर्यंत मास्क हीच आपल्यासाठी लस आहे असे समजून आपल्या जीवन शैलीत लसीकरण सुरू होई पर्यंत बनवावी लागेल असे म्हणत काळजी घेण्याचे आवाहन केले. दरम्यान यावेळी लातूर मनपा कडून राबविण्यात आलेल्या स्वच्छ सर्व्हेक्षण अभियान अंतर्गत आयोजित विविध स्पर्धात विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना गौरविण्यात आले. यात स्वच्छ सोसायटी अंतर्गत लातूर शहरातील आयोध्या सोसायटी, द्वारका नगर सोसायटी,साई धाम सोसायटी यांना स्वछ शाळा स्पर्धेत नारायण लाल लाहोटी स्कूल, जिजामाता शाळा, खुब्बा इंग्लिश स्कूल यांना स्वच्छ हॉस्पिटल या स्पर्धेत सदासुख हॉस्पिटल, शिवपुजे हॉस्पिटल, विवेकानंद हॉस्पिटल, स्वच्छ हॉटेल स्पर्धेत ग्रांट हॉटेल, वन अँड ओन्ली हॉटेल, संजय क्वालिटी, हॉटेल ब्रीज, स्वच्छ कार्यालय स्पर्धेत बँक ऑफ इंडिया, लातूर शहर मनपा तर ब्रँड अंबेसिडर म्हणून मारुती पवार, स्वामिनाथ गवंडी, महादेव पवार यांच्यासह उत्कृष्ट स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, कर्मचारी सविता मस्के लातूर वृक्ष च्या सर्व टीमला ना. अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनपा सहउप आयुक्त मंजुषा गुरमे यांनी करताना भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश या घटकाची माझी वसुंधरा अभियानाशी कशी सलग्नता आहे याची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी बोलताना मनपा महापौर विक्रांत गोजमगुंडे म्हणाले की, कोरोना काळात महाविकास आघाडी सरकार आणि पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या कामाचे कौतुक करीत सरकार आणि पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्या वर्षपूर्ती बद्दल शुभेच्छा देत लोकनेते विलासराव देशमुख उद्यानच्या रुपात लातूरकरांना मिळालेल्या देखण्या उद्यानाची साक्ष देत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी मनपा महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, किरण जाधव, अशोक गोविंदपुरकर, मोईज शेख, रेहाना बासले, सपना किसवे, आसिफ बागवान, रघुनाथ मदने, तबरेज तांबोळी, अभय साळुंके, रविशंकर जाधव, आयुक्त देविदास टेकाळे, सहउप आयुक्त मंजुषा गुरमे, वसुधा फड, संजय ओहोळ, महेश काळे, डॉ. पवन लड्डा, हकीम शेख, शरद देशमुख, इम्रान सय्यद, प्रमोद जोशी, अविनाश बट्टेवार, विजयकुमार साबदे, दीपक गटागट, सिकंदर पटेल, मोहन सूरवसे, अब्दुल्ला शेख, राज क्षीरसागर, यांच्यासह मनपा सदस्य, अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, वृक्ष मित्र, बचत गट महिला भगिनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माझी वसुंधरा शपथ अभियान अंतर्गत स्वाक्षरी मोहीमेची स्वाक्षरी करून तसेच उद्यानात उभारलेल्या सेल्फी पॉइंट वर सेल्फी काढून ना.अमित विलासराव देशमुख यांनी स्वाक्षरी मोहीम व सेल्फी पॉइंट ची सुरुवात केली. शेवटी कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार रमाकांत पिडगे यांनी मानले.

## वाडा आणि विक्रमगडमध्ये भात...

करण्याचा फतवा दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप. फेडरेशन लि. मुंबई यांनी जारी केला आहे. वाडा, विक्रमगड या तालुक्यासह पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ८० टक्के शेतकऱ्यांकडे मोबाईल नाही. ज्यांच्याकडे आहेत, त्या मोबाईल मध्ये ग्रामीण भागात चार, चार दिवस नेटवर्क नसते. ऑनलाईन नोंदणी करणे, माहिती भरणे हे सर्व आदिवासी, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना समजण्या पलिकडचे आहे. गेले अनेक वर्षे महामंडळाच्या खरेदी केंद्रांवर काटा (तराजु) लावून भाताची खरेदी करून वजनाची पावती दिली जायची, व झालेल्या वजनाप्रमाणे आधारभुत दराप्रमाणे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पैसे जमा केले जायचे. मात्र अचानक ही पद्धत बंद करून शेतकऱ्यांवर सरकारी संकट लादले गेले आहे. या ऑनलाईन खरेदी पद्धतीमध्ये एका शेतकऱ्याला प्रती एकरी फक्त ५.८५ क्विंटळ भात विकणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्या व्यतिरिक्त भात घेतले जाणार नसल्याची अट ठेवण्यात आली आहे. या अटीमुळे अनेक शेतकऱ्यांना आपले उर्वरित भात खाजगी व्यापाऱ्यांना मातीमोल भावाने विक्री करावे लागेल. वाडा, विक्रमगड या दोन तालुक्यांत दरवर्षी डिसेंबर अखेरपर्यत दिड लाख क्विंटलहुन अधिक महामंडळाच्या विविध भाताची खरेदी होत असते, मात्र या तीन महिन्यांत या दोन्ही तालुक्यात अजुनपर्यंत १५ हजार क्विंटल खरेदी झालेली नाही. गेली अनेक वर्षे भात लागवड केली जात असलेल्या येथील अनेक शेतकऱ्यांच्या सात बारा उताऱ्यावरीर क्षेत्रावर वरकस (ओसाड) अशी नोंद आहे. हे सात बारा भाताची खरेदी करताना ग्राह्य धरले जात नाहीत. मोजक्याच अशा बिगर शेतकऱ्यांची बोगस भात विक्री रोखण्यासाठी लाखो शेतकऱ्यांवर जास्त प्रमाणात भात विक्रीचे बंधन घालून सरकारने येथील शेतकऱ्यांवर अविश्वास दाखवला आहे.

## आलमान बंधाऱ्याला गळती; पाणी...

ज्यातील पिंगेमान व आब्जे या गावांच्यामध्ये असलेल्या आलमान येथील बंधाऱ्यातुन सध्या मोठ्या प्रमाणात पाण्याच्या विसर्ग होताना दिसत आहे. बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी मागील वर्षी काही खर्च करण्यात आला मात्र त्यात केवळ पायापुरते काम करण्यात आले आहे. बंधारा सध्या चांगलाच भरला असला तरी बंधाऱ्याला पाणी अडविण्यासाठी टाकलेल्या फायबरच्या प्लेट वाकवून पाणी यातून बाहेर वाहत असून याबाबत तातडीने लक्ष न दिल्यास हा बंधारा काहीच दिवसांत कोरडा पडेल अशी भीती आहे. या बाबत राजकौर पाटील, उप विभागीय अभियंता, पंचायत समिती वाडा यांना विचारले असता मागील वर्षी केलेल्या खर्चात पाया पर्यंत दुरुस्ती झाली असून उर्वरित यंदा निधी उपलब्ध झाल्यास तातडीने केला जाईल, प्लेटमधून पाणी जात आहे याबाबत ठेकेदारास सांगून तात्काळ उपाययोजना केली जाईल अशी माहिती दिली.

## युवकांनी रक्तदान चळवळीत सक्रिय...

रासेयो स्वयंसेवक आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पोलीस अधिक्षक यांच्या स्वेच्छा रक्तदानाचा आदर्श घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले. प्रातिनीधिक स्वरूपामध्ये शेतकरी सय्यद मुक्तार, पत्रकार कलीम पठाण, N.C.C. विद्यार्थी सुग्रीव कोकाटे यांच्यासह २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार संपादित विचारशलाका ग्रंथ मान्यवरांना भेट देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक मनोहर कबाडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला रेड्डी, प्रा. गुणवंत बिराजदार, पत्रकार संघाचे महादेव डोंबे, लिंबराज पन्हाळकर, अरुण कांबळे, असिफ पटेल, हरून मोमीन, रत्नाकर निलंगेकर, बापू देडे, नितीन भाले, प्रदीप कवाळे, महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक, एनसीसी चे विद्यार्थी यांनी अथक परिश्रम केले.

## आयपीएस अधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे...

विचाराने एकत्र येवून ग्रामपंचायत बिनविरोध काढणे गरजेचे आहे हे लोकांना पटवून दिले. या विचारात सर्व गावकरी सहमत झाले व ग्रामपंचायत बिनविरोध निघाली. या बैठकीस प्राचार्य रामचंद्र इप्पर, अच्युत इप्पर, डॉ रावसाहेब इप्पर, निवृत्ती इप्पर, नागनाथ इप्पर, हनुमंत इप्पर, व्यंकट इप्पर, प्रल्हाद इप्पर, बालाजी इप्पर, अनंत इप्पर, गंगाधर इप्पर, ज्ञानोबा इप्पर, नामदेव सुर्यवंशी, श्याम सुर्यावंशी, प्रकाश इप्पर, अंकुश अल्हापुरे, गंगाधर नकुले, उध्दव इप्पर आणि गावातील सर्व सुजाण नागरिक यांच्या सहकार्याने नागझरी ग्रामपंचयत बिनविरोध निघाली. शेवटी इप्पर म्हणाले की तालुक्यातील इतर ग्रामपंचायत ने सुद्धा नागझरी प्रमाणेच बिनविरोध काढणे गरजेचे आहे. कारण गावचा सर्वांगीन विकास होण्यासाठी ग्रामपंचायत बिनविरोध अतिशय महत्वाचा भाग आहे.

## शासनाच्या योजनाची माहिती देण्यासाठी ...

उध्दव मलिशे, संपर्क प्रमुख शिवाजी होसुरे, सदस्य हभप ज्ञानोबा कारभारी, बंडुप्पा वडले, ज्ञानोबा गौडगावे, सुर्यकांत कोनाळे महाराज, प्रभाकर हिप्पळगे, बंकट बिराजदार, माधव गरड, माधव बिराजदार, सुधाकर गायकवाड, पांडुरंग भोसले, मारुती कोनाळे, शिवाजी कोरे, माधव महाराज, गणेश पुरे, चक्रपाणी सुरवसे, प्रकाश पाटील, बालिका गौळी, रंजना पोलकर, रतन स्वामी, महेश पाटील, परमेश्वर माने, गोविंद सावळे, वैजनाथ बिराजदार, संतोष धामनगावे, विष्णु बिराजदार, संजय मादलापुरे, सुभाष चपटे, जीवन बिराजदार, प्रभू वाघमारे, बाबुराव सुर्यवंशी, गोवर्धन भोसले, मोहन बिराजदार, बापुराव बिराजदार, ज्ञानोबा बिराजदार, राजकुमार पाटील, राम भोसले अशा एकुण ४० वारकऱ्यांना देवणी तालुक्याचे प्रतिनिधी म्हणुन नियुक्ती प्रमाण पत्र देण्यात आले.

## पालघर जिल्हातील १६ अनाथ बालकांना ...

(मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाअंतर्गत मान्यता प्राप्त संस्थामध्ये दाखल असलेल्या बालकांना व समाजातील अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबत सुचना दिलेले आहे त्या नुसार जिल्हातील पात्रताधारक अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता जिल्हा स्तरावर दि.१४ ते ३० नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये पंधरवडा राबविण्यात आला होता. सदरचा पंधरवडा दरम्यान पालघर जिल्हातील नारायण चंद्र ट्रस्ट नालासोपारा येथील बालगृहातील एकुण १६ अनाथ बालकांना मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी, पालघर यांच्या हस्ते अनाथ प्रमाणपत्र वाटप करण्यात आले अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी दिली.

## मच्छिमारांनी कायद्याचे उल्लंघन केल्यास...

मारण्याचा हल्ला केला. या हल्ल्याच्या प्रकारामुळे नौकेचे ४ ते ५ लाखाचे नुकसान झाले असुन बोटीवरील खलाशी मोजेस संज्याव अलिबाग (वय वर्ष ४९) हे जखमी झाले आल्याचे वसई मच्छिमार सर्वोदय सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी मत्स्यव्यवसाय कार्यालयास कळविले आहे. मत्स्यव्यवसाय विभागाकडून नौकेची पहाणी करण्यात आली असून बोटीच्या नालेचा व गनवेलच्या भागाचे धडक बसल्याने नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. झालेल्या प्रकाराबाबत नौका मालक नितिन नाझरेथ बुदुल रा.पाचुबंदर, ता.वसई, जि.पालघर यानी वसई पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी एलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे. समुद्रात घडलेल्या या प्रकाराची गंभीर दखल पालघरचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी घेतली असून मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करताना कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे व आपापसात तेढ निर्माण होऊ नये याची दक्षता घ्यावी. कोणीही कायद्याचे उल्लंघन केल्यास सागरी कार्यद्यांतर्गत तसेच फौजदारी कायद्यान्वये संबंधीतावर कडक कारवाई करण्यात येईल अशा सूचना दिल्या आहेत. याबाबत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय. ठाणे (पालघर) आनंद पालव यांनी घडलेल्या प्रकाराबाबत वरीष्ठ कार्यालयास योग्य ती माहीती अवगत करुन दिली असून जिल्हाधिकारी, पालघर यांच्या सूचने प्रमाणे जिल्हातील सर्व सागरी मच्छिमार सहकारी संस्थांना मासेमारी करताना कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी व आपापसातील सलोख्याने मासेमारी व्यवसाय करावा असे आवाहन केले आहे.

## स्वर्गीय प्रणाली गवई हिला उमेद ...

नगरसेवक गजानन शेळके, माजी नगरसेवक शांताराम निकम, सामाजिक कार्यकर्ते गौतम ढोके, रामेश्वर गवई, अंबादास पालवे, भारत आहिरे शिवाजी रगडे पत्रकार प्रफुल केदार अरुण अहिरे, माणिक वानखडे गौरव धावारे, प्रभात दास, राजदेव गुप्ता, रवि कदम, जीवन निकम, प्रमोद घनबहादुर, निलेश ढोके, गौतम गायकवाड, कैलास म्हात्रे, इंगळे गुरुजी यांनी प्रणालीबाबतच्या आठवणींना उजाळा दिला. तर यापुढे उमेद सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रणालीच्या स्मरणार्थ प्रत्येक वर्षी एका गरीब होतकरू विद्यार्थिनीच्या शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेदच्या अध्यक्षा नेहा पवार यांनी केले.

## मराठी पत्रकार परिषदेची पालघर जिल्हा...

पी. एम. पाटील, अच्युत पाटील, मंगेश तावडे, शरद पाटील यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. तर पालघर तालुकाध्यक्षपदी प्रमोद पाटील आणि तालुका सरचिटणीसपदी नावेद शेख यांचीही निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस संजीव जोशी यांनी काम पाहिलं. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना उपस्थित पत्रकारांनी शुभेच्छा दिल्या.

# कव्हेकरांच्या पुढाकारातून छत्र हरवलेल्या माणस कन्येचा विवाह सोहळा थाटात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**

समाजामध्ये जीवन जगत असताना सर्वसामान्य वंचीत,पिढीत घटकांचा संबंध आपणाला येत असतो. अशा पिडीतांना आधार देण्याचे काम अनेक लोकप्रतिनिधी करतात. तसेच एका आर्थिक परिस्थितीमुळे खचलेल्या व वडीलांचे छत्र हरवलेल्या विद्या पवार या पदवीधर माणसकन्येचा संसार जुळविण्याचा संकल्प भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी केला मुंबईतील एका कंपनीत काम करणार्या रोहीत शिंदे या मुलाशी लग्नाचा योग जुळूनही आला.त्याचा हा विवाह सोहळा नवीन वर्षाच्या आदल्या दिवशी गुरूवारी ११.३० वाजण्याच्या सुमारास स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कूलच्या परिसरात कव्हेकर परिवारांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.त्यांनी सामाजिक बांधिलकीतुन स्वखर्चातून करून दिलेला आदर्श विवाहसोहळ्याचा आदर्श इतर लोकप्रतिनिधी व समाजसेवी वृत्तीच्या नागरीकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.खिश्चन समाजातील विद्या पवार या मुलीच्या घरची परिस्थिती हालाखीची अचानक वडीलांचे छत्र हरवले अशा परिस्थितीतही मुंबईसारख्या मोठ्या शहराच्या ठिकाणी मिळेल ते काम करून आई आणी छोट्या भावाला सांभाळत पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवीनंतरही



चांगली नोकरी मिळेल या प्रयत्नामध्ये बर्याच ठिकाणी मुलाखतीही दिल्या. परंतु चांगल्या नोकरीचा काही योग आला नाही. त्यामुळे आईच्या समोर मुलीचा लग्नाचा विषय आलेला होता. परंतु गरीबीमुळे चांगला व होतकरू मुलगा मिळेल की नाही. या विचारात आई होती. परंतु योगायोग घडून आला. भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या संपर्कातील रोहीत शिंदे हा तरूण एका कंपनीमध्ये इंजिनियर पदावर काम करीत असल्याची माहिती त्यांना मिळाली आणि त्यांनी मुलीच्या घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे लग्नाचा पूर्ण खर्च उचलून माणस कन्या विद्या पवार व मुलगा इंजिनियर रोहीत शिंदे याचा विवाह लावून देण्याचा संकल्प केला. त्या विवाहाला आज मुर्तरूप आलेले आहे. हा विवाह सोहळा नवीन वर्षाच्या आदल्या दिवशी गुरूवारी सकाळी ठिक ११.३० वाजण्याच्या सुमारास स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कूलच्या परिसरात भाजपाचे जेष्ठ नेते शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी जि.प.अध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर, श्रीमती. प्रमोदिनी पाटील कव्हेकर, ॲड.आर.आर. गरड, युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर, आदीतीताई अजितसिंह पाटील कव्हेकर, रणजीतसिंह पाटील कव्हेकर,जेष्ठ पत्रकार रामेश्वर बद्दर यांच्या उपस्थितीत सपंन्न झाला. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून घडवून आणलेला विवाह सोहळा इतर लोक प्रतिनिधीसाठी व सामाजिक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. कोरोणाच्या संकटामुळे गाव, तालुका, जिल्ह्यासह राज्याच्या राजधाणीचेही आर्थिक चित्र घसरले असल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीतही सामाजिक बांधीलकी लक्षात घेवून भाजपा नेते तथा माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी अकाली वडीलांचे छत्र हरवलेल्या ख्रिश्चन कुटुंबातील विद्या पवार या मुलीच्या विवाह सोहळ्याच्या खर्च उचलला या विवाह सोहळ्याला मुर्तरूप आले असून हा विवाह सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अशा प्रतिकुल परिस्थितीत दिलेल्या आर्थिक आधारामुळे पवार कुटुंबियांना दिलासा मिळालेला आहे.त्याचा हा सामाजिक बांधीलकीचा आदर्श सध्याच्या परिस्थितीत दिशादर्शक ठरणार आहे. धार्मिक क्षेत्रामध्ये काम करीत असताना मानवता हीच जात समजून हा माणस कन्येचा हा विवाह सोहळा घडून आणला ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. माझी अमेरिकास्थित कन्या आश्विनी हीची मैत्रिण विद्या असल्यामुळे माझ्याकडेच तिचे शिक्षण झालेले आहे.

त्यामुळे माझ्या मुलीप्रमाणे लळा लागला तिच्या घरची परिस्थिती हालाखीची असतानाही तिने पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. आणि कंपनीमध्ये इंजिनियर पदावर नोकरीवर असणारा मुलगा निवडला. याची माहिती मला मिळताच मानवता हीच जात समजून आम्ही विद्याचे लग्न लावून देण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय आज रोजी पूर्णही झाला. याचे समाधान वाटते. त्यामुळे त्यांच्या वैवाहीक वाटचालीस शुभेच्छा अशी भावनाही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांनी माणसकन्येच्या विवाह सोहळ्यात व्यक्त केली.

# देवणीतील कमालवाडी ग्रामपंचायत बिनविरोध



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील कमालवाडी ग्रामपंचायत निवडणूकीसाठी भरण्यात आलेले ११ पैकी ५ उमेदवारी अर्ज मागे घेऊन शुक्रवारी दि. १ जानेवारी रोजी कमालवाडी ग्रामपंचायत बिनविरोध काढून तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या प्रमुख उपस्थिती पेढे भरवून नुतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी विजयी आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

याबाबत बाबत अधिक वृत्त असे की कमालवाडी येथील सात सदस्य असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अकरा उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननीनंतर सर्व अर्ज मंजूर पण झाले होते. निवडणुकीसंदर्भात ग्रामस्थांनी एक व्यापक बैठक घेऊन गाव एकसंघ ठेवण्यासाठी व गावातील राजकीय कटुता टाळण्यासाठी ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करण्याचा संकल्प केला आणि त्यानुसार शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी अकरा उमेदवारांपैकी पाच उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले यामुळे आता सहा अर्ज शिल्लक राहिल्याने सदर सहा उमेदवार हे बिनविरोध विजय ठरले आहेत. सातवी एक जागा अनुसूचित जमाती तथा एसटी या संवर्गासाठी राखीव असून या जागेवर एक ही उमेदवारी अर्ज दाखल झाला नसल्याने सदर जागा ही आता रिक्त राहणार आहे मात्र उर्वरित सहा जागा आज बिनविरोध पणे निघाल्या आहेत. बिनविरोध निवड करण्यात आलेल्या सदस्यांत बालाजी प्रताप गणापुरे, श्रीमती भारत बाई सूर्यभान, वि त पल सय्यद अहमद मोहम्मद, श्रीमती लताबाई रामचंद्र येरमे, गणेश भिमराव हक्के, व श्रीमती अनिता गोविंद कांदनगिरे यांचा समावेश आहे. निवडणुका बिनविरोध पार पडल्याबद्दल तहसीलदार सुरेश घोळवे व निवडणूक निर्णय अधिकारी एसआर. एडले व बी.पी. गुडसूरकर यांनी ग्रामस्थांचे अभिनंदन केले आहे निवडणुका बिनविरोध झाल्यानंतर ग्रामस्थांतर्फे आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

पान १ वरून....

## पालकमंत्री अमित देशमुखांनी फिरवली...

कामे करताना फक्त कंत्राटदारांचा विचार केला. त्यामुळे बाभळगाव ते निलंगा, औसा ते निलंगा, लातूर ते रेणापूर आणि निलंगा ते शहाजानी औराद या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झालीत. निलंगा ते शहाजानी औराद या रस्त्याचे ६५ टक्के काम पूर्ण झाले असून ३५ टक्के काम बाकी आहे. पण सिमेंटच्या या रस्त्याला तब्बल एक किमीची मोठी चीर पडलेली असून त्यात भरधाव मोटार सायकलचे टायर गेल्यास मोठा अपघात होऊन मोटार सायकलस्वराचा मृत्यू होऊ शकतो. अजून रस्त्याचे ३५ टक्के काम बाकी आहे. उर्वरित कामाला फक्त एक वर्ष झालेले असताना जर रस्त्याची हि हालत असेल तर पुढे काय? कारण या वर्षभरात या रस्त्यावर अपघात होऊन काहींचे यात बळी गेले आहेत. त्यामुळे अमित देशमुख आणि अशोक चव्हाण या महापुरुषांनी या रस्त्यावरून एकदा मोटार सायकलने प्रवास करून दाखवावा म्हणजे त्यांना कळेल कि कंत्राटदाराने सरकारला कसा चुना लावलाय. या कंत्राटदाराने शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केली आहे. या मार्गावर हलगारा, जवळगा, सावरी, सागर्खेडा आदी गावे आहेत. कंत्राटदाराने या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीतील मुरुंमाचे बेकायदेशीर उत्खनन करून सरकारचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवला आहे. तसेच हे उत्खनन करताना शेतकऱ्यांना सांगितले कि या मुरुमांच्या बदल्यात तुमच्या शेतात काळी कसदार माती आणू टाकू, पण प्रत्यक्षात माती ऐवजी रॅबिट, दगड धोंडे आणि डांबराचे मोठे ढेकळे आणून टाकली आहेत. त्यामुळे त्या गरीब अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे जी एक-दोन हेक्टर जमीन होती तीही नापीक झाली. माने जवळगा येथील शेतकरी संजय दिगंबर पवार या शेतकऱ्याला कंत्राटदाराने असेच फसवल्याने त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, पण सुदैवाने तो बचावला. मात्र प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. उलट पोलिसांकडून त्याला दमदाटी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतातले मुरंम रस्त्याच्या कामासाठी नेताना केवळ साधी नोटरी केलेली ॲग्रीमेंट करण्यात आली होती. पण प्रत्यक्षात मात्र या उत्खननासाठी महसूल खात्याची परवानगी घ्यावी लागते, त्याची रोयाल्टी भरावी लागते, पण कंत्राटदाराने तसे काहीही केलेले नाही. त्यामुळे सरकारचा कोट्यावधीचा महसूल बुडाला. जर उद्या तलाठ्याने या जमिनीचे मोजमाप केले आणि इथे उत्खानन करून महसूल न भारता बेकायदेशीर माती उत्खनन केल्याचे त्यांच्या लक्षात आले तर तो सरळ कंत्राटदाराने बुडवलेला महसूल शेतकऱ्याच्या सातबारावर बोजा चढवेल आणि ते पैसे त्या बिचाऱ्या शेतकऱ्याला भरावे लागतील. म्हणजे एका निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या बांधकामासाठी बिचाऱ्या शेतकऱ्याला केवढी मोठी किमत चुकवावी लागणार आहे आणि तसे झाले तर अगोदरच या दुष्काळग्रस्त जिल्ह्यात अन्नाच्या एकेका दाण्याला मोहताज असलेल्या शेतकऱ्यांचे काय हाल होतील याचा विचार या जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी करावा! या फसवणुकीप्रकरणी शेतकऱ्यांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी सर्वांना निवेदने दिली, पण गरीब शेतकऱ्यांची कुणीही दाद घेतली नाही. शेतकरी पोलिसांकडे गेले पण पोलिसांनी शेतकाऱ्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. शहजाद औराद पोलीस ठाण्याचे सहा. पो. निरीक्षक सूर्यवंशी यांनी फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना मदत करायची सोडून तुम्ही रस्त्याच्या कामात अडथळे आणीत असल्याने तुमच्यावर गुन्हे दाखल करीन! अशी धमकी दिल्याचे तिथल्या शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी केवळ त्या परिसरातील रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर कंत्राटदार सामान घेऊन जात असताना त्याला अडवले व अगोदर आम्हाला दिलेला शब्द पूर्ण कर एवढेच कंत्राटदाराला सांगितले आणि तेवढ्यासाठी सूर्यवंशी साहेब शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करायला निघाले. कारण कंत्राटदाराने इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे सुर्यवंशी साहेबांचाही खिसा गरम केलेला असावा, म्हणून ते कंत्राटदारावर कारवाई करण्याऐवजी पिडीत शेतकऱ्यांवर कारवाई करण्याची भाषा करीत आहेत. या प्रकरणी आता काँग्रेसच्या अनुसुचित जाती जमाती सेलचे प्रदेश उपाध्यक्ष राजाराम मल्लाळ यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ठेकेदाराच्या विरुद्ध आक्रमक भूमिका घेण्याचे ठरवले आहे. तेंव्हा आता तरी अमित देशमुख साहेब आणि अशोक चव्हाण राज्यात तुमचे सरकार आहे, तेंव्हा या गरीब शेतकऱ्यांना न्याय द्या! या रस्त्याच्या बांधकामाची सखोल चौकशी करून कंत्राटदार शिंदे अण्ड कंपनीवर कारवाई करा आणि सरकार व शेतकऱ्यांना फसवणाऱ्या या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाका अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## सोशल मिडियावरच्या मैत्रीमुळे नशिबच...

तो नेहमीच सोशल मीडीयावर ऑनलाईन रहात असल्यामुळे त्याने अनेकांशी ऑनलाईन मैत्री केली होती. मुंबई येथील एका तरूणीसोबत इंस्टाग्राम या सोशल मीडीयावर त्याची मैत्री झाली होती. दोघांमध्ये चॅटींग सुरु झाले होते. चॅटींगचे रुपांतर मैत्रीत झाले. दोघांनी एकमेकांना आपले मोबाईल क्रमांक देखील दिले व घेतले होते. त्यानंतर त्यांच्यात व्हॉटस् पद्वारे चॅटींग व बोलणे देखील सुरु झाले. हळूहळू त्यांच्यत व्हॉटस् ॲपवर व्हीडीओ कॉलिंग वर बोलणे सुरु झाले. ती देखील त्याच्यासोबत कधीही ऑनलाईन गप्पा करु लागली. त्याने तिला बोलता- बोलता एके दिवशी सहज 'आय लव्ह यू' म्हटले. तिने देखील त्याला लाजून प्रतिसाद दिला. तिला वाटले की आपल्याला एक हॅण्डसम जोडीदार मिळाला आहे. मात्र त्याच्या मनात एक पोरगी पटल्याच्या एका विकृत भावनेने घर केले होते. त्याने तिला लग्नाचे आमिष दिले. 'तू मुझे मिलने औरंगाबाद आ सकती हे क्या' असे त्याने तिला विचारले. माझा खूप मोठा व्यवसाय असल्याने मला वेळ कमी असतो, नाहीतर मी तुला भेटायला आला असतो अशी थाप त्याने तिला मारली. तिला वाटले त्याचे खरंच तिच्यावर प्रेम आहे, त्यामुळे तिने औरंगाबादला येण्याची त्याला तयारी दाखवली. तिने घरी आई व भावांना सांगितले की, 'औरंगाबाद येथे माझे ब्युटीशियनचे काम असून मला जाणे गरजेचे आहे.' तिच्या आई, भाऊ, चुलते यांनी तिला औरंगाबाद येथे जाण्यास सहमती दर्शवली. ती औरंगाबाद येण्यासाठी मुंबई येथून निघाली. तेंव्हा तिने त्याला व्हॉटस् ॲप कॉलींग करून मुंबई येथून रेल्वेने औरंगाबाद येथे येत असल्याचे सांगितले. ती खरोखरच येत असल्याचे त्याला समजल्यानंतर त्याने पुढची खेळी खेळण्यास सुरुवात केली. 'औरंगाबाद येथे माझे नातेवाईक माझ्यावर कायम लक्ष ठेवून असतात. त्यामुळे आपण औरंगाबाद येथे न भेटता जालना येथे भेटू असे तो तिला म्हणाला. तिने देखील त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. तो औरंगाबाद येथून येणार असे तिला वाटत होते. तो खरे तर जालना येथेच होता. त्याने सांगितल्यानुसार ती जालना रेल्वे स्टेशनवर उतरली व त्याची वाट बघू लागली. तिला अपेक्षा होती की तिचा प्रियकर महागडया फोर व्हिलर गाडीने तिला घेण्यासाठी येईल. मात्र तो मोटर सायकलने रेल्वेस्टेशनवर तिला घेण्यासाठी आला. तिने त्याला विचारले की, मोटर सायकलवर का आलास?' त्यावर 'मुझे मोटर सायकल बहोत पसंद है, मेरी कार मेरा ड्रायव्हर उसके किसी रिश्तेदार को लेकर हॉस्पीटल गया है,' अशी थाप त्याने मारली. त्याच्या बोलण्यावर तिचा विश्वास बसला होता. ती त्याच्या मोटरसायकलवर डबलसीट बसली. तो तिला जिंदल मार्केट येथे त्याच्या नोकरीच्या ठिकाणी घेवून गेला. या ठिकाणी तो ऑपरेटर म्हणून कामाला होता. तेथे दोघांमध्ये प्रेमाच्या गप्पा-गोष्टी झाल्या. मला तू खूप आवडतेस, मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, अशा भुलथापा त्याने तिला दिल्या. त्याच्या बोलण्यामुळे ती पार हुरळून गेली. तो तिला घेऊन एका फ्लॅटमध्ये गेला. तू माझी बायकोच आहेस, असे म्हणत त्याने तिला मिठीत घेतले. तिनेही त्याला अलिंगन दिले. जीवनाचा सोबती मिळाल्याने तिलाही स्वर्ग दोन बोटावर राहिला होता. 'तू माझ्यासाठी इतक्या लांब आलीस, मी तुला नाराज करणार नाही असे म्हणत त्याने तिच्या ओठावर ओठ टेकले. ती बावरली, पण तिचेही त्याच्यावर प्रेम असल्याने तीने त्याला प्रतिसाद दिला. तसे त्याने पुढचे पाऊल टाकले. त्याचे हात आता तिच्या विशीष्ट अवयवांवर फिरत होते. हा प्रकार तिला अपेक्षित नव्हता. तिने त्याच्या मिठीतून सुटण्याचा प्रयत्न केला. ती बाजूला होऊ लागली. तसे त्याने तिला आवळून घेतले. तू माझी बायको आहेस. आज आपल्याला सुहागरात करायची असे म्हणत तो तिच्या शरीराला मिठीत घेवू लागला. तिला काय करावे हेच सुचेनासे झाले होते. तो जबरदस्तीने तिच्या शरीराचे मर्दन करु लागला. ती अगतिक झाली होती. या परक्या शहरात ती ज्याच्यावर विश्वास ठेऊन आली होती तोच गैरवर्तन करत होता. त्यामुळे विरोध कसा करावा हे तिला सुचत नव्हते. त्याची बळजबरी सुरुच होती. त्याने हळूहळू तिला विवस्त्र केले. आता लग्न करायचेच आहे, तर नकार कशाला द्यायचा असा विचार करत तिने त्याला साथ देण्यास सुरुवात केली. त्याने तिच्या शरीराचा मनसोक्त आस्वाद घेतला. त्याने डाव साधला होता. तो लग्न करेल या भावनेने तिने त्याला सर्वस्व दिले होते. मात्र तिने एका नराधमावर विश्वास ठेवला होता. त्यानंतर ती मुंबईला निघून गेली. एकमेकांचे नेहमी फोन कॉलींग व व्हॉटस् अप कॉलींग सुरुच होते. आता ती त्याला वारंवार लग्नाबाबत विचारत होती. तो तिला, 'मेरा अभी जॉब ठिक से नहीं चल रहा थोडा रुको असे तो तिला म्हणत होता. त्याचाही काहीतरी प्रॉब्लेम असेल अशी मनाची समजूत करत ती गप्प बसत होती. तो मात्र तिला वारंवार कॉल करत होता. व्हीडीओ कॉल करायला लावत होता. मला तुला नग्न बघायचे आहे असे सांगून तो तिला कपडे बाजूला करून अंग दाखवायचा आग्रह करत होता. कधी-कधी त्याने तिला नग्न अंगाचे दर्शन द्यायला लावले. ती त्याच्यावर विश्वास ठेऊन कॅमेऱ्यासमोर कपडे उतरवत होती. मात्र तो या व्हीडीओ कॉलींगचे स्क्रिनशॉट काढून ठेवत होता. एकदा तो तिला म्हणाला, 'मेरा बर्थ डे है तुम्हे जालना आना पड़ेगा.' त्याचा वाढदिवस असल्यामुळे ती बसने येण्यास तयार झाली. ती जालना बस स्थानकावर उतरताच तो तिला एका लॉजवर घेवून गेला. तेथे बर्थ डे सेलिब्रेशन करत असतांना त्याने तिला नग्न होण्यास भाग पाडले. तो देखील विवस्त्र झाला. दोघांनी नग्नावस्थेत बर्थ डे सेलिब्रेशन केले. दोघेही नग्न असल्यामुळे साहजीकच त्याची वासना पेटली होती. त्याने तेथेही तिच्याओबत समागम केले. तिने गिफ्ट म्हणून आणलेली रक्कम तिच्याकडून काढून घेतली. ती त्याच्या भुलथापांना भुलली होती. तो तिला वाट्टेल तेव्हा भोगत होता व पैसेही मागत होता. अशा प्रकारे दुहेरी लुट तो करत होता. आता त्याने आपला खरा रंग तिला दाखवण्यास सुरुवात केली. तिचे अश्लील फोटो व व्हिडीओ त्याने तिला व्हाटस ॲपवर पाठवले. तु मुझे पैसे भेज नही तो तेरे फोटो और व्हिडीओ सारे रिश्तेदारोको भेज दुंगा अशी तो तिला धमकी देवू लागला. त्याच्या धमकीला घाबरुन ती त्याला फोन पे च्या माध्यमातून पैसे पाठवू लागली. त्यामुळे दिवसेंदिवस नासीरला पैशांची खुप हाव सुटली. तो तिला वारंवार पैसे मागू लागला. इंस्टाग्राम वरुन त्याने तिच्या नातेवाईकांचे मोबाईल क्रमांक मिळवले. या क्रमांकावर सर्व फोटो आणि व्हिडीओ पाठवण्याची धमकी देण्याचा त्याने सपाटाच लावला. तिचा ब्युटीपॉर्लरच्या व्यवसायाला लॉकडाऊन व कोरोनामुळे मंदी आली होती. त्यामुळे ती त्याला पैसे पाठवू शकत नव्हती. पैसे मिळत नसल्यामुळे अखेर नासेरने ते फोटो तिच्या नातेवाईकांना पाठवले. त्याने तिच्या नातेवाईकांना धमकी दिली की तुम्हारे लडकीके यह फोटो नही देखना चाहते तो मुझे पैसे भेज दो. आपल्या मुलीचे विवस्त्र फोटो बघून तिच्या आई वडीलांना धक्काच बसला. आपल्या मुलीला फसवणाऱ्या नासेरला धडा शिकवण्यासाठी त्यांनी ओशिवारा पोलिस स्टेशन (पश्चिम मुंबई) गाठले. त्यांनी सर्व हकीकत फिर्यादीच्या रुपात दाखल केली. सदर गुन्हा जालना येथे घडला होता. त्यामुळे हा गुन्हा शुन्य क्रमांकाने नोंद करुन तो जालना येथे पुढील तपासकामी रवाना करण्यात आला. सदर बाजार जालना पोलिस स्टेशनला सदर गुन्हा भाग ५ गु.र.न.७०८/२० भा.द.वि. ३७६(२), (एन), ३५४ (अ), (क), ५०९, ५०६, ४०६, ४१७, ६६ अ आयटी ॲक्ट नुसार दाखल करण्यात आला. पो.नि. संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु करण्यात आला. संशयीत नासेर खान अफसर खान याला सापळा रचून ताब्यात घेण्यात आले.

## नववर्ष साजरे करण्यासाठी नवी मुंबईत...

संशय आल्याने व ती या शहरात एकटीच असल्याने समाजकंटकांच्या हाती लागू नये म्हणून खबरदारी म्हणून त्या टिसीने या तरूणीला चाईल्ड हेल्प लाईनच्या सदस्यांच्या ताब्यात दिले. त्यांनी तिला सखी सेंटर होम या मुलीच्या होम मध्ये दाखल केले. इथेपर्यत सर्व ठिक होते. यानंतर या अल्पवयीन तरूणीवर भयंकर प्रसंग ओढवला. मुंबई, नवी मुंबई या शहराच्या आकर्षणापोटी हि तरूणी एकटीच आली होती. याचाच फायदा एका नराधमाने घेत या तरूणीला दगडाने ठार मारण्याची धमकी देत या तरूणीवर बलात्कार केला. आपला हेतू साध्य झाल्या आरोपी पळून गेला होता. हि तरूणी या शहरात अनोळखी आहे, आपण हि तिच्यासाठी अनोळखी आहोत असा विचार करून आरोपीने घटनास्थळावरून पलायन केले होते. हा नराधम कोण होता? हि तरूणी त्याच्या जाळ्यात कशी फसली? या गुन्ह्याचा कोणताही धागादोरा नसताना पनवेल शहर पोलीसांनी या नराधम अनोळखी आरोपीचा कसा शोध लावला.? हे पाहू. २६ डिसेंबर २०२० रोजी हि तरूणी पनवेल रेल्वे स्थानकावर सकाळी उतरल्यानंतर त्या दिवशी ती शिवा नावाच्या आपल्या ओळखीच्या इसमाबरोबर राहिली होती. २७ डिसेंबर रोजी ती नावाच्या घरातून बाहेर पडली. पनवेल रेल्वे स्थानकाजवळ शिवाचे घर आहे. तिथून ती बाहेर रस्त्यावर येताच तिने एका रिक्षाला हात दाखवला. ती रिक्षा थांबताच तिने त्या रिक्षावाल्यास गांधी गार्डन जवळ सोडण्यास सांगितले. ती रिक्षात बसल्यानंतर याची रिक्षाने वेग घेतला. रिक्षा चालवत त्या नराधमाने पिडीत तरुणी बरोबर गोड गोड बोलत तिच्याकडून सर्व माहिती काढून घेतली. तेंव्हा त्याला कळाले की हि तरूणी इकडे अनोळखी आहे. तिला या शहराची काहीच माहिती नाही.आपण रिक्षा कुठेही फिरवली तरी हिला काहीच कळणार नाही.आता हे सावज आपल्या जाळ्यात अलगत फसले आहे. हा विचार करीत त्या नराधमाने एक भयंकर कुटील डाव आखला. तरूणीचे सौंदर्य पाहून त्याची नियत फिरली. आता हिचा जबरदस्तीने उपभोग घ्यायचा कट त्याने रचला. यानंतर जे होईल ते होऊ दे पण आता हिला सोडायचे नाही. असा त्या नराधमाने निश्चय केला होता. हा सर्व कुकर्माचा विचार करीत तो रिक्षा चालवत होता.तो निर्मनूष्य जागा शोधत होता. त्याची रिक्षा आडमार्गाने जात असताना पिडीत तरूणीला त्याचा संशय आला.तेंव्हा तिने त्याला हटकले ही पण त्याने पिडीत तरूणीला समजावून सांगण्याच्या सुरास सांगितले की मॅडम आपण शॉर्टकट मार्गाने जात आहे. तरीही पिडीत तरूणीच्या डोक्यात धोक्याची घंटा वाजत होती. रस्ता निर्मनूष्य असल्याने ती कुणाकडे मदत हि मागू शकत नव्हती. आता त्याची रिक्षा वडघर नदिच्या किनारी आली होती.तेथे रिक्षा थांबवून आरोपीने तरूणीला दगडाने ठेचून ठार मारेन अशी धमकी देत तिला फरफटत स्मशानभूमी जवळील झुडपात नेऊन तिच्यावर जबरीने बलात्कार केला. आपले काम आपला हेतू साध्य झाल्यानंतर आरोपी नराधम घटनास्थळावरून पळून गेला. पिडीत तरूणीने स्वतःला कसेबसे सावरत तिने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठले.तिथे पिडीत तरूणीने सहाय्यक पोलीस निरीक्षक मोनाली चौधरी यांची भेट घेऊन आपल्यावर घडलेला सर्व प्रसंग सांगितला. नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंग, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. बी जे शेखर, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त रविंद्र गड्डे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजयकुमार लांडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संजय जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक मोनाली चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सुनिल तारमाळे आणि तपास पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरु केला. गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने या गुन्ह्याच्या तपासावर सर्व उच्चपदस्थ पोलीस अधिकारी लक्ष ठेऊन होते. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी सुनिल तारमाळे, पोलीस हवालदार विजय आहिरे, वाघमारे, पोलीस अंमलदार राजू खेडकर,विनोद पाटील, सुनिल कर्दनमाने, यादवराव घुले, पंकज पवार, परेश म्हात्रे आणि गणेश चौधरी यांनी या तपासाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. पिडीत तरूणी ज्या ठिकाणाहून रिक्षात बसली होती त्या ठिकाणी तपास पथकाने लक्ष केंद्रित करून त्या रिक्षाचा शोध पोलीसांनी सुरू केला.स्थानिक झोपडपट्टी त्या आसपासच्या सोसायटीच्या सीसीटिव्ही फूटेज हे सर्वच पिंजून काढले. तपास पथकाने थोडीही उसंत न घेता वेगाने तपासाला सुरुवात केली होती. तेंव्हा पोलीसांच्या तांत्रिक तपासाला यश आले. तो संशयित रिक्षा चालक कोण होता हि महत्त्वाची माहिती पोलीसांच्या हाती लागली. संशयीत नराधम रायगड जिल्ह्यातील पनवेल शहरातील बारवाई गावचा राहणारा आहे. पोलीसांनी लागलीच त्या गावात जाऊन सचिन लालूप्रसाद शर्मा (वय २६) यास ताब्यात घेतले. आरोपी सचिन शर्मा यास पनवेल पोलीस ठाण्यात आणून त्याची प्राथमिक चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. पिडीताचे सौंदर्य त्यात ती एकटी व नवखी असल्याने आपल्या हातून हा गुन्हा घडल्याचे आरोपीने पोलीसांना सांगितले. या गुन्ह्याचा कोणताही धागादोरा नसताना पोलिसांनी अवघ्या १२ तासांत या गुन्ह्याची उकल करून आतील आरोपीच्या मुसक्या आवळून त्याला पोलीस कोठडी दाखवली.

04 JAN TO 10 JAN 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 02/01/2021 9:27 PM Page 1



# लातूर शहर मनपा आयोजित 'माझी वसुंधरा अभियान'

**लातूर/प्रतिनिधी**



आपण या कार्यक्रमाच्या निमित्ताने जी पर्यावरण संवर्धन व वृक्ष लागवड यासाठी शपथ घेतलेली आहे ती पाळली तर येत्या काळात हरित लातूरची एक आगळी वेगळी प्रतिमा सर्वांसमोर आदर्श निर्माण करेल व हरित लातूर हा नवा पॅटर्न आपण निर्माण करू शकू अशी अपेक्षा राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली. पालकमंत्री ना. देशमुख यांच्या उपस्थितीत लातूर शहर महानरपालिकेकडून राबविल्या जाणाऱ्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत आयोजित वसुंधरा शपथ कार्यक्रम लातूर शहरातील लोकनेते विलासराव देशमुख स्मृती उद्यान या ठिकाणी पार पडला यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या सुरवातीस पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण व सखी महिला बचत गट यांच्या कडून सुरू करण्यात आलेल्या पहिल्या मल निःसरण करण्यास उपयोगी ठरणाऱ्या सक्षम मशीनचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण यासाठी प्रत्येक लातूरवाशीय कटिबद्ध राहण्याची वसुंधरा शपथ घेण्यात आली. यावेळी बोलताना पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर शहर महानगपालिकेने हरित संवर्धन करता जे काम केले आहे ते कौतुकास्पद असून लातूर शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम लातूर मनपाने हाती घेतले ते आपण लातूरशीय आज पाहतोय. स्वच्छता अभियानात लातूर शहरातील आज जनजागृती पाहायला मिळते ते विलक्षण आहे. हे करताना कचरा डेपोवर कचरा टाकताना विरोध झाला, आंदोलने झाली, प्रकरण न्यायालयात गेले, हरित लवादाने याची दखल घेत कचरा विल्हेवाट लावण्याच्या सूचना केल्या आणि कचरा डेपो परिसरात लातूर शहर मनपाने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सुरुवात केली, कचरा संकलन व वर्गीकरण करण्यासाठी अतिशय उत्तम काम मनपा कडून करण्यास सुरुवात आता झालीय याचा मनस्वी आनंद होत असून आज लातूर सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनत आहे. यामुळे आज लातूर मध्ये शिक्षणास येणाऱ्या मुला मुलींचे प्रमाण वाढले, शिक्षणासह उद्योग व्यवसाय, लातूरच्या शासकीय कार्यालयात नोकरी साठी विनंती बदलीचे वाढते प्रमाण ही उदाहरणे आज आपल्या समोर आहेत.लोकनेते विलासराव देशमुख स्मृती उद्यान आणि परिसर आणखी विकसित कसा करता येईल या साठी नवा आराखडा तयार केला जाईल, तसेच या उद्यानात आठवड्यातून एक वेळा आऊटडोअर चित्रपट प्रदर्शित करून सांस्कृतिक विभागा आणखी चालना देता येईल यासाठी राज्याच्या सांस्कृतिक विभागाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. येत्या मार्च महिन्यात इंटरनॅशनल ...पान ६ वर

# वाडा आणि विक्रमगडमध्ये भात खरेदीवर सरकारी संकट!

## ऑनलाईन खरेदीच्या आदेशाने शेतकरी संतप्त

**वाडा/प्रतिनिधी**




आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून दरवर्षी पालघर व ठाणे जिल्ह्यात हमी भाव व आधारभूत पद्धतीने विविध ठिकाणी दिवाळी नंतर खरेदी केंद्र सुरु करुन शेतकऱ्यांकडून भाताची खरेदी केली जाते. मात्र ऑनलाईन नोंदणी, भाताची मर्यादित विक्रीची अट असे नवनवीन नियम पुढे केल्याने गेले दोन महिने झाले तरी अजुनपर्यत येथील भात खरेदी केंद्र सुरु झालेली नाही. यामुळे येथील शेतकरी संतप्त झाले आहेत. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून बारदाना (पोती) अभावी रखडलेली भात खरेदी आता येथील शेतकऱ्यांना भाताची विक्री आदिवासी विकास महामंडळाच्या केंद्रांवर करावयाची असेल तर प्रत्येक शेतकऱ्याने आपली नोंदणी संबंधित भात खरेदी केंद्राकडे आपल्या मोबाईलवरुन ऑनलाईन पद्धतीचा अवलंब करून करावी. नोंदणी केल्यानंतर मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीवर संबंधित शेतकऱ्याला खरेदीची तारिख कळविण्यात येईल, त्यानंतरच या शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर भात विक्रीस आणता येईल. २४ डिसेंबर पासुन ऑनलाईन भात खरेदी ...पान ६ वर

# आलमान बंधाऱ्याला गळती; पाणी टंचाईची शक्यता



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातुन एकूण चार नद्या वाहत असून ठिक ठिकाणी पाणी अडविण्यासाठी लहान मोठे बंधारे बांधले असून यांद्वारे शेतकऱ्यांना व एकंदर पाणीव्यवस्थेला मोठा आधार यामुळे मिळत असतो. असे असतांना तालुक्यातील बंधाऱ्यांची अवस्था मात्र दुर्लक्षाने बिकट झालेली असून आलमान या बंधाऱ्यातून अशाच प्रकारे पाण्याची मोठी नासाडी होत आहे. वाडा तालुक्यात वैतरणा व पिंजाळ नदीवर सर्वात अधिक बंधारे असून तानसा व देहर्जे या नद्यांवरही अनेक ठिकाणी बंधारे आहेत. ऑक्टोबर महिन्यात या बंधाऱ्यांचे गेट बंद केले जाते ज्यामुळे पावसाळ्या पर्यत पाणीसाठा नदीत थांबून राहील व ज्याचा फायदा शेतकरी व नदीकाठी असलेल्या लोकांना विविध प्रकारे होईल असे अपेक्षित असते.

चार नद्यांचा सहवास ही वाडा तालुक्याला लाभलेली खरंतर एक देणगी असून योग्य नियोजन केल्यास तालुक्यात एकही गाव तहानेने व्याकुळ होणार नाही व शेतकरी सुजलाम सुफलाम होईल यात शंकाच नाही. अनेक वर्षात तालुक्यातील पाण्याचे हे नियोजन करणे शासनाला शक्य झाले नसून नद्यांमध्ये खडखडाट येथील लोकांचे भाग्य भिजवत असतो असा अनुभव आहे. तालुक्यातील वैतरणा नदीवर गांधरे येथे असलेला कोकाकोला कंपनीला पाणी पुरविणारा बंधारा अपवाद वगळता तर इतर बंधाऱ्यातून पाणी बाहेर धावतानाच दिसते. वाडा पंचायत समिती लघु पाटबंधारे विभागाकडे उचाट, गुहिर, कोणसई, मेट आलमान असे जवळपास ११ बंधारे आहेत, ...पान ६ वर

# युवकांनी रक्तदान चळवळीत सक्रिय सहभागी व्हावे!

## पोलिस अधिक्षक निखिल पिंगळेंचे प्रतिपादन



**लातूर/प्रतिनिधी**

कोविड -१९ जागतिक महामारी सुरू आहे त्यामुळे संपूर्ण देशामध्ये रक्ताचा तुटवडा भासत असल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांनी युवकांना रक्तदान चळवळीत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्या दृष्टिकोनातून लातूरमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर व महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व हिरेमठ पेट्रोलियम, साखरा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या संस्कृतिक सभागृहामध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी विचार मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, विभागीय उपाध्यक्ष दयानंद जडे, मराठवाडा सचिव दीपरत्न निलंगेकर, हिरेमठ पेट्रोलियमचे संचालक श्रीकांत हिरेमठ, शासकीय रक्तपेढीचे डॉ. के. टी. दळवी, पर्यवेक्षक प्रा.मनोहर कबाडे, डॉ. श्रीकांत गायकवाड, N.C.C.ऑफिसर कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ. संजय गवई, प्रा. टी घनश्याम व पत्रकार अशोक हनवते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. पुढे बोलताना निखिल पिंगळे म्हणाले की, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. भारतीय संस्कृती ही दातृत्व वृत्तीची आहे त्यामुळे युवकांनी मानवतेच्या उदात्त भावनेने रक्तदान चळवळीमध्ये सक्रिय सहभागी होणे ही एक काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे म्हणाले की, महाविद्यालयीन युवकांनी रक्तदान चळवळीमध्ये स्वच्छेने सहभागी होऊन मा.मुख्यमंत्री साहेबांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अशोक देडे म्हणाले की, आज रक्तदान चळवळ गतिमान करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे असे सांगून या शिबिरा बाबत समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आजचा रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आमच्या महाविद्यालयात पत्रकार संघाच्या सहकार्याने संपन्न होत आहे याचा अत्यानंद होत आहे. या चळवळीला समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकार, ...पान ६ वर

# आयपीएस अधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे नागझरी ग्रामपंचायत बिनविरोध!




**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर तालुक्यातील नागझरी येथील ग्रापंचायत बिनविरोध निघाली असुन ग्रामपंचायत बिनविरोध काढण्यासाठी पिंपरी चिंचवडचे उपायुक्त आयपीएस अधिकारी मंचक इप्पर यांनी महत्वपुर्ण भूमिका बजावत एक आगळा वेगळा आर्दश समाजापूढे निर्माण केला आहे.

स्वप्नातील आदर्श गाव करण्यासाठी व आपले गाव स्मार्ट व्हीलेज कसे करता येईल यासाठी आयपीएस अधिकारी मंचक इप्पर हे सतत प्रयत्नशिल असतात. याच उद्देशाने त्यांनी आपल्या गावात वाद विवाद होऊ नयेता गावात भाईचारा टिकून असावा, गावचा सर्वांगीण विकास व्हावा, खास करून मतदान प्रक्रियेत तरुण पिढी नशेच्या आहारी जाण्यापासुन वाचावे व आपल्या गावासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात विकास निधी आनला पाहीजे. निवडणूका आल्या की वाद तंटे आलेच ते कसे टाळता येतील यासाठी एक ...पान ६ वर

# शासनाच्या योजनांची माहिती देण्यासाठी वारकरी मंडळाची गरज –हभप लालासाहेब

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील लासोना येथे दि.२९ रोजी शासनाकडून वारकऱ्यांसाठी राबवायच्या योजना व वेळोवेळी शासनाकडून वारकऱ्यांना सोयी सुविध्दांची माहीती होण्याकरिता अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप प्रकाश बोधले महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार देवणी तालुका नियुक्ती पत्र देताना लातूर जिल्हाध्यक्ष हभप लालासाहेब देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप करतांना सांगीतले. प्रमुख अतिथी मंडळाचे प्रदेश मार्गदर्शक गोविंदराव भोपनीकर, विभागीय सदस्य शंकरराव पाटील, राज्य सदस्य रामविलास बंग, मंडळाचे लातूर जिल्हा उपाध्यक्ष हभप दिलीप वलसे, मुख्य सचिव हभप गोविंद दोडके, प्रसिध्दी प्रमुख राजकुमार सोमवंशी व संपर्क प्रमुख वैजनाथ कोरे उपस्थित होते.



हभप देशमुख यांनी देवणी तालुका पदाधिकारी व वारकऱ्यांना मार्गदर्शन करताना अखिल भारतीय वारकरी मंडळाची गाव तेथे शाखा स्थापन करणार असल्याचे सांगून वारकरी मंडळ अध्यात्मिक व सामाजीक कार्याबरोबरच नविन पिढीतील तरुणांवर सुसंस्कार व व्यसनमुक्त तरूण बनवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले. वारकऱ्यांकरिता शासना मार्फत विविध योजना राबविताना जिल्ह्यातील गायक, वादक, किर्तनकार, भजनी करणाऱ्या वारकऱ्यांस शासनाकडून मानधन मिळवून देण्याचा प्रयत्न अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष हभप प्रकाश बोधले महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे सांगीतले. कार्यक्रमात नियुक्ती पत्र देण्यात आले.देवणी तालुकाध्यक्ष हभप दत्ता माने, उपाध्यक्ष हभप सुभाष मोरे, कोषाध्यक्ष हभप आनंद शिंदे, सचिव हभप ...पान ६ वर

# पालघर जिल्हातील १६ अनाथ बालकांना अनाथप्रमाणपत्र वाटप



**पालघर/प्रतिनिधी**

अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विशेष पंधरवडयाचे आयोजन १४ ते ३० नोव्हेबर २०२० दरम्यान पालघर जिल्हातील १६ अनाथ बालकांना मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी, पालघर यांच्या हस्ते अनाथप्रमाणपत्र वाटप करण्यात आले. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत शासकीय, स्वंयसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेतुन बाहेर पडतांना त्यांच्या जवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्या कारणाने, त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती, अनुदान व विशेष लाभ मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे महिला व बाल विकास विभाग निर्णय दि.०६ जुन २०१६ अन्वये बाल न्याय ...पान ६ वर

# मच्छिमारांनी कायद्याचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करणार –जिल्हाधिकारी





**पालघर/प्रतिनिधी**

दि.२८ डिसेंबर २०२० रोजी संध्याकाळी ६.३० वाजताच्या सुमारास दमण (गुजरात) समारीन ८५ सागरी मैल अंतरावर वसई, जि.पालघर येथील 'विश्वराजा' क्र.IND-MH-6-MM-168 या नौकेच्या खलाशावर जीवघेणा हल्ला झाला असल्याची माहिती वसई मच्छिमार सर्वोदय सहकारी संस्था मर्या., वसई या संस्थेचे अध्यक्ष यांनी दिली आहे. दि.२५/१२/२०२० रोजी वसई येथील विश्वराजा हि नौका मासेमारीसाठी गेली होती. सदरची नौका वसई पासून ८५ सागरी मैल अंतरावर आपली मासेमारीची जाळी पाण्यात सोडत असताना दमण येथील DD/03/MM/0338 या पर्ससीन मासेमारी नौकेवरील खलाशी यांचेशी मासेमारीच्या जागेबाबत मज्जाव केल्याने इतर ७ ते ८ दमण येथील पर्ससीन नौकाधारक यांचे सोबत भांडण झाले व दमण येथील या मासेमारी नौकेवरील खलाशांनी वसई येथील विश्वराजा या नौकेस चारी बाजूने घेरुन सदरच्या नौकेस ठोकर मारुन बुडवण्याचा प्रयत्न केला व त्याचेवर जिवे ...पान ६ वर

# स्वर्गीय प्रणाली गवई हिला उमेद सामाजिक प्रतिष्ठानची श्रद्धांजली!

**उल्हासनगर/प्रतिनिधी**



प्रतिकूल परिस्थितीतुन आयटी अभियंता झालेल्या व उमेद सामाजिक प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा प्रणाली रामेश्वर गवई यांचे २० एप्रिल २०२० रोजी अल्पशा आजाराने निधन झाले होते. लॉकडाऊन व संचार बंदीमुळे अभिवादन सभा घेता आली नव्हती. म्हणून उमेद सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने प्रणालीच्या सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सम्राट अशोक नगर, रमाबाई आंबेडकर विद्यालया जवळ उल्हासनगर ३ येथिल समाज मंदिरात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने, प्रणालीच्या शैक्षणिक, सामाजिक व व्यक्तिगत संघर्षावर प्रकाश टाकणारे मनोगतं व्यक्त करण्यात आली. माजी उपमहापौर पंचशीला पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या अभिवादन सभेत प्रणालीची जुळी बहीण हर्षाली रामेश्वर गवई, आरपीआय (आठवले)चे प्रदेश सचिव नाना पवार, ...पान ६ वर

# मराठी पत्रकार परिषदेची पालघर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी हर्षद पाटील तर सरचिटणीसपदी वैभव पालवे



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यकारिणीची मुदत संपल्याने २०२१ ते २०२३ या दोन वर्षाच्या कालावधीकरिता नव्याने कार्यकारिणीची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी झी २४ तासचे प्रतिनिधी हर्षद पाटील तर सरचिटणीसपदी ए एम न्यूजचे प्रतिनिधी वैभव पालवे यांची एकमताने निवड करण्यात आली. पालघर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेची वार्षिक सभा शनिवारी (दि. २६) पालघर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यमान जिल्हाध्यक्ष नीरज राऊत यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणीची मुदत येत्या ३१ डिसेंबरला संपत असल्याने नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी परिषदेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी भगवान खैरनार, उपाध्यक्षपदी हेमेंद्र पाटील, जयेश शेलार, दिनेश यादव सहसरचिटणीसपदी जतिन कदम, खजिनदारपदी संदीप जाधव, संघटकपदी शशिकांत कासार तर कार्यकारी सदस्यपदी नितीन बोंबडे, बाबा गुंजाळ, गजानन मोहिते, संजय लांडगे यांची निवड करण्यात आली. परिषदेचे राज्य प्रतिनिधी म्हणून पंकज राऊत यांची निवड करण्यात आली असून सल्लागारपदी ज्येष्ठ पत्रकार ...पान ६ वर